सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. ०७ जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ६६ पाने : ८ किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# जगातील सर्वात उंच रेल्वे पुलावर तिरंगा

श्रीनगर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे उद्घाटन केले. चिनाब रेल्वे पूल हा जगातील सर्वात उंच रेल्वे पूल आहे. या पुलाचे उद्घाटन केल्यानंतर पंतप्रधान मोदींनी तिरंगा घेऊन पुलावरुन चालत एक फेरी मारली.

अतिरेक्यांची दहशत असताना मागील काही दशके जम्मू काश्मीरमध्ये सार्वजनिक ठिकाणी तिरंगा हाती घेऊन वावरणे अशक्य होते. पण मोदी सरकारच्या नेतृत्वात संसदेने बहुमताने जम्मू काश्मीरमधील कलम ३७० हटवले. यानंतर अतिरेक्यांविरोधात भारताने कठोर पवित्रा घेतला आणि हळू हळू वातावरण बदलण्यास सुरुवात झाली. आज (शुक्रवार ६ जून २०२५) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चिनाब रेल्वे पूल या जगातील सर्वात उंच रेल्वे पुलावर तिरंगा हाती घेऊन चालत एक फेरी मारली. पंतप्रधान मोदींनी चिनाब पुलाची पाहणी केली. तसेच पंतप्रधान मोदींनी अंजी पुलाचेही उद्घाटन केले. अंजी पूल हा भारतातील पहिला केबल



रेल्वे पूल आहे. त्यानंतर पंतप्रधान मोदींनी कटरा-श्रीनगर वंदे भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवला, जी खोऱ्याला उर्वरित भारताशी जोडणारी पहिली ट्रेन आहे. कटरा रेल्वे स्थानकावर कटरा-श्रीनगर वंदे भारत ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यापूर्वी पंतप्रधानांनी ट्रेनमधील प्रवाशांशी आणि क्रू सदस्यांशी संवाद साधला.

पंतप्रधान मोदी व्ह्यू पॉइंटवर

पंतप्रधान मोदी चिनाब नदीवरील जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाजवळील 'व्ह्यू पॉइंट'वर पोहोचले आणि त्यांना काश्मीरला उर्वरित देशाशी रेल्वेने जोडण्यासाठी महत्त्वाच्या प्रकल्पाची माहिती देण्यात आली. पंतप्रधानांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव , जितेंद्र सिंह आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासह प्रतिष्ठित पुलाजवळ उभारलेल्या रेल्वे संग्रहालयाला भेट दिली. पंतप्रधान 'व्ह्यू पॉइंट' वर गेले आणि त्यांना चिनाब पुलाची माहिती देण्यात आली, जो नदीपासून ३५९ मीटर उंचीवर वसलेला अभियांत्रिकी चमत्कार आहे, जो पॅरिसमधील आयफेल टॉवरपेक्षा ३५ मीटर उंच आहे.

कामगारांशी संवाद

पंतप्रधान मोदींनी जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे उद्घाटन केल्यानंतर अभियंते आणि कामगारांशी संवाद साधला.

# कसं असेल पुढील चार आठवडे राज्याचे हवामान?

मुंबई : हवामान विभागाने पुढील चार आठवड्यांतील महाराष्ट्रामधील हवामानाचा विस्तृत अंदाज जाहीर केला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, येत्या ६ ते १२ जून दरम्यान पावसाला सुरुवात होणार आहे.या काळात राज्यात बहुतांश भागांमध्ये पावसाची स्थिती सामान्य राहण्याची शक्यता असून राज्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे .मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल, तर कोकण आणि विदर्भात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

बंगालच्या उपसागरात १२-१३ जूनच्या सुमारास पावसासाठी पोषक वातावरण तयार होण्याचा अंदाज आहे. ज्यामुळे महाराष्ट्र, मध्य भारत आणि दक्षिण द्वीपकल्पीय भारतात जोरदार पाऊस पडण्याची अपेक्षा आहे. खासगी हवामान संस्था स्कायमेट वेदर सर्व्हिसेसने बंगालच्या उपसागरात पावसासाठी पोषक वातावरण तयार होण्याबाबत ठाम विश्वास व्यक्त केला. स्कायमेटचे अध्यक्ष जी. पी. शर्मा म्हणाले, १० जूनपर्यंत पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात चक्रीवादळीय स्थिती विकसित होईल, जे ४८ तासांत बळकट होईल. यामुळे ११ जूनपासून आंध्र प्रदेश, तमिळनाडू, तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रात पावसाचा प्रभाव दिसेल. स्कायमेटने मॉन्सून पुनरुज्जीवनाचा कालावधी १२ ते १७ जून असा अंदाज वर्तवला आहे. १९ जून पर्यंत पूर्व विदर्भ आणि कोकणचा काही भाग सोडला तर राज्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. या आठवड्यात मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय होण्यासाठी वातावरण अनुकूल असण्याची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे.वायव्य भारत, पूर्व भारत, ईशान्य भारतात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि केरळमध्ये सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे.

यानंतर २० ते २६ जून दरम्यान दक्षिण भारत आणि वायव्य भारतात पाऊस सामान्यापेक्षा कमी असण्याची शक्यता आहे. गुजरात, ओडिशा, दक्षिण छत्तीसगड, पश्चिम मध्यप्रदेश, गुजरात आणि विदर्भ येथे सरासरीपेक्षा जास्त पाऊसाचा अंदाज आहे. चौथ्या आठवड्यात २७ जून ते ३ जुलै दरम्यान भारतातील बहुतेक भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस असण्याची शक्यता आहे. गुजरात, कर्नाटकच्या किनारपट्टीवरील प्रदेश, महाराष्ट्रमध्ये सरासरीपेक्षा कमी असण्याची शक्यता आहे.

या चार आठवड्यांच्या अंदाजानुसार कोकण वगळता इतर भागात चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहे. या कालावधीत कोकणात पावसाचा फारसा जोर नसेल. मात्र, इतर भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. राज्यात काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. यानुसार ठाणे, रायगड, मध्य महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, लातूर, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, गडचिरोली जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज असल्याने सतर्कतेचा इशारा (यलो अलर्ट) देण्यात आला आहे. दरम्यान, मोसमी वारे मंदावलेलेच नैऋत्य मोसमी वाऱ्यांची वाटचाल आठवडाभरापासून मंदावली आहे.

# एम.एफ. हुसेन यांच्या मुंबईतील चित्रांच्या लिलावावर बंदी घाला - हिंदु जनजागृती समिती

**अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा**

मुंबई, ६ जून - १४० कोटी भारतियांचे श्रद्धास्थान असणाऱ्या भारतमातेचे 'रेप ऑफ इंडिया' नावाने अत्यंत विकृत, बिभत्स, नग्न व अश्लील चित्र रेखाटणारे वादग्रस्त चित्रकार एम.एफ. हुसेन यांच्या अन्य २५ चित्रांचा लिलाव १२ जून 2025 रोजी मुंबईतील हॅमिल्टन हाऊस येथील 'पांडोल आर्ट गॅलरी'द्वारे होणार आहे. या पार्श्वभूमीवर हिंदु जनजागृती समितीने आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री, मुंबईचे पोलीस आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन या लिलावावर तात्काळ बंदी घालावी व हुसेन यांच्या गुन्हेगारी कृत्याचे उदात्तीकरण बंद करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा समितीने दिला आहे.

या निवेदनात हिंदु जनजागृती समितीने म्हटले आहे की, एम.एफ. हुसेन यांनी २६/११ च्या वेळी 'रेप ऑफ इंडिया' नावाच्या चित्रात भारतमातेचा नग्न व अपमानास्पद चित्र साकारून त्यांनी देशद्रोहाची परिसीमा गाठली आहे. तर दुसऱ्या एका चित्रात भारतमातचे नग्न चित्रण काढून त्यावर विविध शहरांची नाव लिहिलेली दाखवली आहेत. अन्य चित्रांमध्ये नग्न हनुमंताच्या शेपटीवर बसलेली नग्न सीता; एका चित्रात नग्न हनुमान, नग्न राम व नग्न सीता यांना एकत्र दाखवले आहेत; श्री गणेशांना एका नग्न स्त्रीच्या मांडीवर बसवलेले; तर एका चित्रात भगवान हनुमानांना एका नग्न स्त्रीला हातात घेऊन उडताना दाखवलेले आहे. अशा प्रकारे माता सरस्वती, माता पार्वती, माता गंगा, माता यमुना आदी देवीदेवतांचे जाणीवपूर्वक विकृत, नग्न व अश्लील चित्रण करून कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचा घोर अपमान केला आहे. या अपमानास्पद चित्रांच्या विरोधात हुसेनवर देशभरात १२५० हून अधिक पोलीस तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यामुळेच देशभरात त्यांच्या प्रदर्शनांना विरोध झाला आणि अखेर हुसेन यांनी भारतातून पलायन करून कतारचे नागरिकत्व स्वीकारले होते.

# रेपो दरात 0.५0 टक्क्यांनी कपात सर्वसामान्यांचे कर्जाचे होणार स्वस्त,११ महिने पुरेल इतके विदेशी चलनसाठा

प्रतिनिधी: आताची सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. अखेर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (ठइख) ने रेपो दरात ०.५० टक्क्यांनी कपात केली आहे. त्यामुळे रेपो दर ६ टक्क्यांहून घटत ५.५० टक्क्यावर पोहोचला आहे. त्यामुळे आता सर्वसामान्यांसाठी कर्जाचा हप्ता स्वस्त होणारच आहे याशिवाय गृहकर्ज देखील स्वस्त होण्याची शक्यता आहे. आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी प्रसारमाध्यमांसमोर वर्चुअल पत्रकार परिषद घेऊन आरबीआयची भूमिका स्पष्ट केली आहे. याशिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारताच्या अर्थव्यवस्थेत मजबूती असून आगामी काळात धोरणात्मक विकासाबरोबरच महागाई नियंत्रण व अर्थव्यवस्थेत स्थिरता यास आरबीआयचे प्राधान्य असल्याचे यावेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर मल्होत्रा यांनी सांगितले आहे.

याशिवाय या निर्णयाने अर्थव्यवस्थेला खूप मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे. या आरबीआयच्या निर्णयाचे बहुतेक अर्थतज्ज्ञांनी स्वागत केले आहे. तसेच यंदा आरबीआय ०.२५ बीपीएसने व्याजदरात कपात करेल अशी सगळ्यांनी अर्थविश्वात अपेक्षा केली होती मात्र आरबीआयने आश्चर्याचा धक्का देत ०.५० बीपीएस दराने व्याजदरात कपात केली ज्याचा फायदा केवळ कर्ज नाही तर विविध एनबीएफसी, इतर आर्थिक संस्था व लघु कर्ज व लघू उद्योग यांना होण्याची शक्यता आहे.

# स्टारलिंकला भारत सरकारची मंजुरी

नवी दिल्ली : एश्रेप चींझ च्या स्टारलिंक कंपनीला सॅटेलाइटच्या मदतीने इंटरनेट सेवा पुरवण्यासाठी भारत सरकारने मंजुरी दिली आहे. यासाठी कंपनीला सरकारने आवश्यक तो परवाना दिला आहे. दूरसंचार विभागाने (ऊढ) स्टारलिंकला ग्लोबल मोबाइल पर्सनल कम्युनिकेशन बाय सॅटेलाइट (ऋच्वझउड) लायसन्स दिले आहे. स्टारलिंक आता भारतात सॅटेलाइट इंटरनेट सेवा सुरू करू शकते. भारती एअरटेल-यूटेलसॅटची वनवेब आणि रिलायन्स जिओनंतर स्टारलिंक ही सॅटेलाइटच्या मदतीने इंटरनेट सेवा पुरवणारी भारतातील तिसरी कंपनी आहे. दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी ही माहिती दिली. लवकरच सॅटेलाइट इंटरनेट सेवेसाठी स्पेक्ट्रमचे वाटप होईल. त्यानंतर मोठ्या प्रमाणात सेवा सुरू होऊ शकेल, असे त्यांनी सांगितले. ॲमेझॉनचा प्रोजेक्ट कुइपर देखील भारतात सॅटेलाइट इंटरनेट सेवा देण्यासाठी लायसन्स मिळवण्याच्या प्रयत्नात आहे.

पृथ्वीच्या खालच्या कक्षेत अनेक सॅटेलाइट अर्थात कृत्रिम उपग्रह लावून त्यांच्या मदतीने इंटरनेट दिले जाईल. यासाठी वापरले जाणारे सॅटेलाइट




अर्थात कृत्रिम उपग्रह पृथ्वीच्या जवळ असल्यामुळे इंटरनेटचा वेग वाढण्यास मदत होणार आहे. हे तंत्रज्ञान प्रामुख्याने दुर्गम भागात प्रभावी ठरणार आहे. भारतातील स्टारलिंकच्या ग्राहकांना २५ ते २२० एमबीपीएस पर्यंत डाउनलोड स्पीड असलेले इंटरनेट मिळेल, असे कंपनीकडून सांगितले जात आहे. भारतात स्टारलिंकचा अनलिमिटेड डेटा प्लॅन साडेआठशे ते नऊशे रुपयांत उपलब्ध होईल असा प्राथमिक अंदाज आहे.

# पाण्याच्या बादलीत पडून बालकाचा मृत्यू

नाशिक, ६ जून : खेळता खेळता पाण्याच्या बादलीमध्ये पडल्याने दहा महिन्यांच्या बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने परिसरामध्ये हळहळ व्यक्त होत आहे देवळाली गावातील रोकडोबावाडी येथील मशिदीजवळ राहणारे अजय तायडे यांचा दहा महिन्यांचा मुलगा रोशन काल रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास घरात खेळत असताना पाण्याने भरलेल्या बादलीमध्ये तो पडला. यावेळी त्याची आई स्वयंपाक करत होती आणि बाळ खेळत असल्याचे समजून ती आपल्या कामात होती. मात्र काही वेळाने रोशन कुठे दिसत नाही, म्हणून शोध घेतला असता घरातच ठेवलेल्या पाण्याच्या भरलेल्या बादलीमध्ये रोशन आढळून आला.

# पतीसह गेली राजगड फिरायला; पाय घसरला अन् थेट १५० फूट दरीत कोसळली

पुणे : पुण्यातील राजगडावर एक दुर्दैवी घटना घडली आहे. पावसाळा सुरु होताच अनेकांनी गाद किल्ले फिरायला सुरुवात केली आहे. पुण्यातील वेल्हे येथील राजगडावर फिरायला आलेल्या महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पतीसोबत पर्यटनासाठी आलेल्या या विवाहित महिलेचा १५० फूट खोल दरीत पडून मृत्यू झाल्याचो घटना घडली आहे.

कोमल सतीश शिंदे (वय वर्षे २०) राहणार आळंदी, ता. खेड पुणे असे मृत महिलेचे नाव आहे, याचाबत अधिक माहिती देताना पोलिस म्हणाले, कोमल ही पतीसह राजगडावर पर्यटनासाठी आली होती. ही घटना राजगडावर काल गुरुवारी (दि.०५) घडली आहे. संध्याकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास बालेकिल्ला पाहून झाला होता. त्यानंतर बालेकिल्ल्यावरुन उतरत असताना ती कोसळल्याची प्राथमिक माहिती मिळाली होती. यानंतर मृतदेह गडावरून खाली आणण्यासाठी पोलीस जवान युवराज सोमवंशी यांच्यासह आपत्ती व्यवस्थापन टीमचे सदस्य तानाजी भोसले, गणेश सपकाळ, संजय चोरघे, निलेश जाधव, संदीप सोळसकर, सनी माने, यांनी गडावर धाव घेत स्ट्रेचरच्या साह्याने मृतदेह गडावरून खाली आणला. दुपारी पाऊस पडल्याने गडावरील वाट निसरडी झाली होती. यामुळे मृतदेह खाली आणण्यास मोठा अडथळा निर्माण झाला होता.

उपचारापूर्वी मृत घोषित

दरम्यान, रात्री ११.३०च्या सुमारास वेल्हे येथील ग्रामीण रुग्णालयाचे डॉक्टर शिवाजी कुरणकर यांनी कोमल हिचा उपचारापूर्वी मृत्यू झाल्याची माहिती दिली. रात्री उशिरा वेल्हे ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. शिवाजी कुरणकर यांनी महिलेचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले असल्याची माहिती वेल्हे पोलिसांनी दिली आणि याबाबत अधिक तपास वेल्हे पोलिस करत आहेत.

# आयसीआयसीआय बँकेत ४.५८ कोटींची फसवणूक, महिला मॅनेजरला अटक

जयपूर : बँकेत आपले पैसे सुरक्षित आहेत असं प्रत्येक ग्राहकाला वाटत असतं. पण, एका धक्कादायक प्रकरणात, राजस्थानच्या कोटा शहरात आयसीआयसीआय बँकेच्या महिला रिलेशनशिप मॅनेजर साक्षी गुप्ताने तब्बल ४ कोटी ५८ लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. तिने ४१ ग्राहकांच्या ११० हून अधिक खात्यांमधून ही रक्कम अनधिकृतरित्या काढून शेअर बाजारात गुंतवली होती.

आयसीआयसीआय बँकेच्या रिलेशनशिप मॅनेजर असलेल्या साक्षी गुप्ता ही फसवणूक टाळण्यासाठी ग्राहकांचे मोबाईल क्रमांक बदलत होती आणि त्या जागी तिच्या कुटुंबातील सदस्यांचे नंबर नोंदवत होती, जेणेकरून ओटीपी आणि व्यवहारांची माहिती मूळ खातेदारांपर्यंत पोहोचू नये. तिने वैयक्तिक ३ लाख ४० हजारांचे कर्ज मंजूर करून घेतले, तसेच ३१ एफडी वेळेच्या आधीच बंद करून १ कोटी ३४ लाखांहून अधिक रक्कम स्वतः च्या खात्यात वळवली. तिने डिजिटल बँकिंग, इंस्टा किओस्क आणि चार ग्राहकांच्या डेबिट कार्डचा वापर करत व्यवहार केले आहेत.

या प्रकरणाची चौकशी सुरू असताना बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तिच्यावर संशय आला असता. तपासात हे स्पष्ट झाले की, तिने २०२० ते २०२३ दरम्यान ही फसवणूक केली असून, एका प्रकरणात ३ कोटी २२ लाख रुपये एका वरिष्ठ महिला ग्राहकाच्या खात्यातून गायब करण्यात आली होती. साक्षी गुप्ताला ३१ मे रोजी अटक करण्यात आली आहे. तिच्या कुटुंबीयांचेही व्यवहार तपासाच्या केंद्रस्थानी असून, या फसवणुकीत आणखी कोणी सहभागी होते का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

एका ग्राहकाने त्याच्या एफडीबद्दल विचारपूस करण्यासाठी बँकेत आल्यावर हा घोटाळा उघडकीस आला. त्यानंतर बँकेने १८ फेब्रुवारी रोजी पोलिसात गुन्हा दाखल केला. व्यवहाराच्या संदेशांची माहिती त्यांना मिळू नये म्हणून महिलेने खात्यांशी जोडलेल्या ग्राहकांचे मोबाईल नंबरही बदलले. तिने तिच्या कुटुंबातील सदस्यांचे फोन नंबर या खात्यांशी जोडले आणि ४ कोटींहून अधिक रुपये काढले. खातेधारकांना फसवणुकीची कल्पना येऊ नये म्हणून तिने तिच्या सिस्टमवर ओटीपी मिळवण्यासाठी एक प्रणाली देखील तयार केली, असे तपास अधिकारी इब्राहिम खान म्हणाले. आयसीआयसीआय बँकेने एका निवेदनात म्हटले आहे की त्यांनी एफआयआर दाखल केला आहे आणि कर्मचाऱ्याला निलंबित केले आहे.

# भारताच्या आजी - माजी खासदारांचा जर्मनीत विवाह

बर्लिन : तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा आणि बिजू जनता दलचे माजी खासदार पिनाकी मिश्रा यांनी लग्न केले. भारताच्या या आजी - माजी खासदारांचा विवाह सोहळा जर्मनीत झाला. खासगी समारंभात निवडक पाहुण्याच्या उपस्थितीत त्यांनी लग्न केले. हे लग्न ३ मे रोजी झाले. पण त्याची बातमी महिनाभर लपवण्यात आली. अखेर महुआ मोईत्रा यांनी एक फोटो एक्स पोस्ट केल्यावर सर्वांनाच या लग्नाची माहिती मिळाली. पिनाकी मिश्रा चार वेळा बिजू जनता दलाकडून खासदार झाले आहेत. ते १९९६ मध्ये पहिल्यांदा खासदार म्हणून निवडून आले. त्यानंतर ते २००९ ते २०१९ पर्यंत खासदार होते.

महुआ आणि पिनाकीच्या लग्नाच्या व्हायरल झालेल्या फोटोंमध्ये दोघांनी एकमेकांचे हात



धरलेले दिसत आहेत. महुआने सोनेरी आणि हलक्या गुलाबी रंगाची साडी परिधान केल्याचे फोटोत दिसत आहे. लग्नाबाबत दोघांनी अधिकृत घोषणा केलेली नाही. पण केक कापत असतानाच फोटो एक्स पोस्ट करुन अभिनंदन करणाऱ्या अनेकांचे महुआ यांनी आभार मानले आहेत. यामुळे खासदार महुआ मोईत्रा आणि माजी खासदार पिनाकी मिश्रा यांनी लग्न केल्याची बातमी व्हायरल झाली आहे. महुआ यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९७४ रोजी आसाममध्ये झाला. त्या आता ५० वर्षांच्या आहेत. इन्व्हेस्टमेंट बँकर म्हणून कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या महुआ यांनी २०१० मध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. महुआ २०१९ मध्ये पहिल्यांदा आणि २०२४ मध्ये दुसऱ्यांदा खासदार म्हणून निवडून आल्या.संसदेतील तृणमूल काँग्रेसचा आवाज अशी महुआ मोईत्रा यांची ओळख सांगितली जाते. महुआ पश्चिम बंगालमधील कृष्णनगर येथून सलग दुसऱ्यांदा खासदार झाल्या आहेत. महुआ मोईत्रा यांचे पती पिनाकी मिश्रा हे बिजू जनता दलचे नेते आहेत. त्यांचा जन्म २३ ऑक्टोबर १९५९ रोजी झाला. ते ६५ वर्षांचे आहेत. पिनाकी मिश्रा १९९६ मध्ये पहिल्यांदा खासदार झाले. त्यांनी तत्कालीन केंद्रीय मंत्री ब्रजेश किशोर त्रिपाठी यांचा पराभव केला. पिनाकी हे सर्वोच्च न्यायालयातले वरिष्ठ वकील आहेत. त्यांची तीन दशकांची दीर्घ राजकीय आणि वकिलीतली कारकीर्द आहे. ते अनेक उच्चस्तरीय समित्यांचे सदस्य देखील राहिले आहेत.

# तहव्वुर राणाच्या कोठडीत ९ जुलैपर्यंत वाढ

नवी दिल्ली, ०६ जून : दिल्लीच्या पटियाला हाऊस न्यायालयाने मुंबईतील २६/११च्या हल्ल्याचा सूत्रधार दहशतवादी तहव्वूर राणाच्या न्यायालयीन कोठडीत ९ जुलैपर्यंत वाढ केली.

तहव्वूरच्या न्यायालयीन कोठडीची मुदत संपल्यानंतर त्याला तिहार जेलमधून दूरदृश्य प्रणाली (व्हिडिओ कॉन्फरन्स) द्वारे पटियाला हाऊस कोर्टात हजर करण्यात आले होते. यावेळी राणाच्या वकिलाने प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त केली. त्यानंतर विशेष न्यायाधीश चंदरजीत सिंह यांनी त्याच्या न्यायालयीन कोठडीत ९ जूनपर्यंत वाढ करण्याचे निर्दे श दिलेत. तसेच तहव्वूरच्या प्रकृतीबद्दल स्थिती अहवाल मागितला.

# बकरी ईद निमित्त पुण्यातील 'हे' रस्ते बंद

पुणे : मुस्लिम बांधवांसाठी बकरी ईद हा एक महत्वाचा सण आहे. देशभरात ७ जून रोजी बकरी ईद मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार आहे. पुण्यातील गोळीबार मैदानात बकरी ईद निमित्त परिसरात असणाऱ्या ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज पठण केले जाणार आहे. त्यामुळे पुण्यातील वाहतुकीत महत्वाचे बदल करण्यात आले आहेत. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

पुण्यातील गोळीबार मैदान परिसरात असणाऱ्या ईदगाह मैदानावर होणाऱ्या नमाज पाठणामुळे वाहतूक कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे. या काळात वाहतूक सुरळीत राहण्यासाठी पोलिस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी वाहतुकीत तात्पुरते बदल करण्याचे आदेश दिले आहेत. उद्या (७ जून) कोणते रस्ते बंद राहणार आणि पर्यायी मार्ग कोणते असणार ते जाणून घेऊयात.

भैरोबानाला ते गोळीबार मैदान

शहरातील भैरोबानाला ते गोळीबार मैदान हा रस्ता सकाळी ६ ते ११.३० वाजेपर्यंत बंद राहणार आहे. या काळात स्वारगेटकडे जाणारी जड वाहने प्रिन्स ऑफ वेल्स रस्त्याने-लुल्लानगर चौकाकडे वळविली जाणार आहे. तसेच पुणे स्टेशनकडे वाहने एम्प्रेस गार्डन रस्त्याने मार्गस्थ केली जाणार आहेत.

मम्मादेवी चौक ते गोळीबार मैदान

मम्मादेवी चौक ते गोळीबार मैदान हा मार्गही उद्या सकाळी बंद राहणार आहे अशी माहिती वाहतूक पोलीसांनी दिली आहे. त्यामुळे या मार्गाने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी बिशप स्कूल मार्ग/कमांड हॉस्पिटल मार्ग ते नेपिअर रस्त्याने पुढे सीडीओ चौकातून इच्छित स्थळी जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

जुनी सोलापूर बाजार चौकी ते गोळीबार चौक

जुनी सोलापूर बाजार चौकी ते गोळीबार चौक हा रस्ता शनिवारी सकाळी बंद राहणार आहे. या रस्त्याने प्रवास करणारे लोक खाणे मारुती चौक-पुलगेट डेपो-सोलापूर बाजार चौक-नेपिअर रस्ता-खटाव बंगला चौका मार्गे इच्छित स्थळी जाऊ शकतात. तसेच लुल्लानगर चौकातून गोळीबार चौकाकडे जाताना जड वाहनांना प्रवेश बंद असणार आहे. दरम्यान वाहतूक पोलीसांनी उद्या सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.सीडीओ चौक ते गोळीबार चौक हा रस्ताही सकाळी ६ ते ११.३० वाजेपर्यंत बंद राहणार आहे.

# दिर्ध प्रतिक्षेनंतर अमृतेश्वर महादेव मंदिर ते शनी मंदिर चौक रस्त्याचे आ.खोतकर यांच्या हस्ते भूमिपूजन!

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जुना जालना परिसरातील नागरिकांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेला पूर्णविराम देत, अमृतेश्वर महादेव मंदिर ते शनी मंदिर चौकापर्यंतच्या सिमेंट काँक्रिट रस्त्याचे भूमिपूजन आज जालन्याचे आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

या रस्त्याची अवस्था गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत खराब होती. पावसाळ्यात खडयातील जलसाचल्यामुळे व दुभाजकांच्या अभावामुळे नागरिकांना व वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा ही मागणी लावून धरली होती.

या भूमिपूजन कार्यक्रमात आमदार अर्जुन खोतकर म्हणाले, नागरिकांची गैरसोय ही माझ्यासाठी विकासाच्या दिशेने वाटचाल करण्याची जबाबदारी असते. हा रस्ता केवळ मंदिरांना जोडणारा नसून, हजारो नागरिकांच्या दैनंदिन जी- वनातील एक महत्त्वाचा मार्ग आहे. हा



सिमेंट काँक्रिट रस्ता लवकरात लवकर पूर्ण करून नागरिकांच्या सेवेत आणण्यात येईल. या रस्त्याचे काम देखील दर्जेदार करण्यात येईल यासाठी संबंधिताना सुचणा करण्यात आलेल्या आहेत.

कार्यक्रमास प्रमुख उप- स्थिती जनार्दन खोतकर,माजी सभापती पांडुरंग डोंगरे, कार्यक्रमाचे संयोजक गोपीकिशन गोगडे माजी नगरसेवक, महेश निकम नगरसेवक,वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक सेवाळे, दिव्यांग महिला आघाडी प्रमुख लक्ष्मिबाई भुतडा , डॉ.भताने, युवासेनेचे कुणाल जाधव, शैलेश कक्कड,विजय हजारे, भगवान खरात याच्यासह स्थानिक पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी कामाचा प्रारंभ वेळेत आणि गुणवत्त- ेसह करण्याचे आश्वासन दिले. हा रस्ता पूर्णत्वास गेला की, जुना जालना परिसरातील वाहतूक व्यवस्था सुलभ होईल तसेच धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांनाही चालना मिळेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केले. या रस्त्याचा कामाला आमदार अर्जुनराव खोतकर यांनी निधी उपलब्ध करून द्यायला व मंजूर मिळून दिली याबद्दल या प्रभागाचे नगरसेवक गोपीकिशन गोगडे यांनी प्रभागातील नागरिकांच्या वतीने त्यांचे शाल व पुष्पहार आणि स्वागत करुन त्यांचे आभार व्यक्त केले.

## संक्षिप्त

### बोगस बियाणाविरुद्ध कारवाई करा -आमदार संतोष दानवे



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

बोगस बियाणे विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कृषी विभागाने कडक कारवाई करण्याचे निर्देश आ. संतोष दानवे यांनी दिले. भोकरदन येथे बोगस बियाणे व खतांच्या आलेल्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. गहिनीनाथ कापसे, उपविभागीय कृषी अधिकारी, प्रशांत पवार, भोकरदनचे तालुका कृषी अधिकारी रामेश्वर भुते तसेच जाफराबादचे कृषी अधिकारी अमोल शिंदे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना दानवे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या घामाचा फायदा घेणाऱ्या कुठल्याही विक्रेत्याला पाठीशी घातले जाणार नाही. शेतकरी केंद्रबिंदू आहे आणि त्याची फसवणूक खपवून घेतली जाणार नाही. आपल्याकडे आलेल्या तक्रारींमध्ये काही ठिकाणी चांगल्या कंपनीच्या बियाण्यांचा कृत्रिम तुटवडा दाखवून दुकानदार जास्त दराने बियाणांची विक्री करीत आहेत तर काही ठिकाणी शेतकऱ्यांना बनावट माल देऊन त्यांची फसवणूक केल्याचे समोर येत आहेत. त्यासाठी कृषी विभागाने तत्काळ फिरती तपासणी पथके स्थापन करून कृषी सेवा केंद्रांवर अचानक तपासण्या सुरू कराव्यात. अशा आ. संतोष दानवे यांनी कृषी अधिकाऱ्यांच्या बैठकीत निर्देश देण्यात आले.

### सातबारावर चुकीची नोंद करुन फसवणूक केल्याप्रकरणी ; दोन जणांसह तलाठ्यावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

येथील गट क्रमांक ५५ ब च्या जमिनीचा हस्तलिखित व डिजिटल सातबाऱ्याच्या चुकीच्या नोंदी घेऊन फिर्यादीची फसवणूक केल्या प्रकरणात तत्कालीन तलाठी व दोघांविरुद्ध भोकरदन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कमलाबाई दादाराव तळेकर (रा मासनपूर रोड भोकरदन) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, प्रवीण जाधव व दीपक जाधव यांनी तत्कालीन तलाठी अविनाश देवकर यांच्याशी संगनमत करून चुकीच्या नोंद घेऊन फसवणूक केली व अडथळा निर्माण केला अशी तक्रार दिली. त्यावरून भोकरदन पोलिसांनी ४ जून रोजी उशिरा रात्री फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. तलाठी अविनाश देवकर यांना जालना येथून अटक केली असून, त्यांना बदनापूर न्यायाल्यात हजर केले असता न्यायालयाने सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिस निरीक्षक किरण बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक पवन राजपूत हे तपास करीत आहे.

### ग्रा.प.लिपिक दिलीप राठोड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

खोराड सावंगी ता.मंठा येथील दिव्यांग नागरिक भुरा रावसू पवार यांनी ग्रामपंचायत मधील लिपिक दिलीप अमरसिंग राठोड यांना सेवेतून बडतर्फ करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे मा.आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे केली आहे.निवेदनात पुढे म्हटले की,माजी सरपंच अमरसिंग चंदू राठोड यांनी आपला मुलगा दिलीप अमरसिंग राठोड लिपीक पदासाठी अपात्र असतांना व याला ४ अपत्य व २ पत्नी असताना देखील त्याची लिपीक म्हणून नेमणूक करून शासनाची फसवणूक केली आहे.तसेच जनगणनेनुसार २०१० मध्ये पुरेशी लोकसंख्या नसतांना देखील निवड २०१० व २०१९ ला अशी दोनदा लिपिक म्हणून नेमणूक केली आहे.२०१० ला निवड झाली असली तरी तत्कालीन सरपंच गुणाबाई बाबुराव राठोड यांनी व ग्रामसेवक वसंत जाधव यांनी नियुक्तीपत्र व मानधन दिलेले नाही असे ग्रामसेवक वसंत जाधव यांचे म्हणत असेल तरी आहे.दिलीप राठोड २७/०१/२०१० तारखेचे खोटे नियुक्तीपत्र

ग्रा.पं. लिपीक निवडीचा खोटा ठराव व नियुक्ती आदेश तयार केला आहे. तसेच या बाबत प्रशासकीय कार्यवाहीचा आदेश मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जालना यांनी काढलेले असतांना या आदेशाची अंमलबजावणी अद्याप पर्यंत करण्यात आलेली नाही.विशेष म्हणजे गटविकास अधिकारी पं.स.मंठा यांनी या प्रकरणाची स्वतः चौकशी केली असता संबंधित लिपीक श्र दिलीप अमरसिंग राठोड यांना दोनपेक्षा जास्त अपत्य आहेत व ते लिपीक पद धारण करण्यास अपात्र आहेत असा चौकशी अहवाल मा. उपमुख्यकार्यकारी अधिकारी (पं.) यांना सादर केलेला आहे.त्या नुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार संबंधित लिपीक यांना १५ दिवसात ग्रामपंचायत सेवेतून काढून टाकणे आदेश पारित केले आहेत. या आदेशानुसार गटविकास अधिकारी पं.स. यांच्या पत्रानुसार .२८/०८/२०२३ ला या. पं. मासिक सभा आयोजित करून समेत २२/०८/२०२३ रोजीच्या आदेशाचे वाचन करून दिलीप अमरसिंग राठोड यांना लिपीक पदावरून बडतर्फ करण्याचा ठराव सभेपुढे मांडण्यात आला.या वेळी ग्रामपंचायतने बहुमताने ठराव मंजूर केला असतांनाही ग्रा. पं.ने वरिष्ठांच्या आदेशाचे पालन केलेले नाही.तर उलट तत्कालीन सरपंच प्रयागबाई सीताराम राठोड व ग्रामसेवक श्री खेडकर यांनी त्याला मासिक वेतन देऊन पाठीशी घालण्याचा प्रकार केला आहे.त्या मुळे तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांची सखोल चौकशी करून संबंधित ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर देखील गुन्हा नोंद करण्यात यावा.असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## चौरीवाडीचा पूल मोजतोय अंतिम घटका

### चौरी वाडी ते पारधच्या तातडीने नव्या पुलाची गरज; दोन वर्षा अगोदरच बनवला होता पूल

**तभा वृत्तसेवा**
**पारध / प्रतिनिधी**



पारध ते चौरी वाडी जोडणाऱ्या रस्त्यावर असलेला जवळपास २ वर्षांपूर्वीचा पूल कालबाह्य झाला असून अंतिम घटका मोजत आहे. या रस्त्यावरून गाड्या, ट्रॅक्टर, मोटारसायकल, बैलगाडी ये-जात असते. मोठा अनर्थ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या ठिकाणी नवीन पूल कधी होणार, असा सवाल नागरिकांतून व वाहनधारकांतून केला जात आहे.

चौरी वाडी जाण्यासाठी सोयीचा आहे. वाडी वरचे सर्व विद्यार्थी गावामध्ये शाळेमध्ये येतात, हाच एकमेव रस्ता आहे चौरीवाडी ते पारदला येण्यासाठी त्यामुळे या रस्त्यावर नेहमी वाहनांची वर्दळ असते.या रस्त्यावरील पुलाला जवळपास २ वर्षे झाली आहेत. या पुलावरून जीव मुठीत घेऊन वाहने चालवावी लागत आहेत. या पुलाची दिवसेंदिवस दुरवस्था होत चालली आहे. पुलाला लोखंड वापरलेलं दिसतंच नाही, त्यामुळे शिवाय येथील संरक्षक भितीही तुटल्या आहेत. पूल धोकादायक बनला आहे.

त्यामुळे शासनाने याकडे त्वरित लक्ष देऊन या जुन्या पुलाच्या जागी नवीन पूल उभारावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

» चौरेवाडी ते पारध हा पूल मागच्या दोन वर्षे पुरी बनवण्यात आला होता, पुल हा पूर्णपणे तुटला गेलेला आहे केव्हाही अपघात होऊ शकतो, या पुलावरूनच आमचे लेकर शाळेमध्ये जातात शासनाने याकडे लक्ष देऊन पुलाचा दर्जेदार असं काम करावं.

**-प्रकाश भुते (चौरी वाडी ग्रामस्थ )**

» आम्हाला शेतात जाण्यासाठी हाच रस्ता आहे, हा पूल जवळपास ५०% तुटलेला आहे पण यावेळेस पाणी पडल्यानंतर हा पूर्णपणे वाहून जाण्याची शक्यता आहे,पूल हा खराब झाल्यामुळे केव्हा ही अपघात होऊ शकतो,त्यामुळे शासनाने या पूलाकडे लक्ष देऊन तातडीने काम पूर्ण करावे, अन्यथा शिवसेना स्टाईल ने आंदोलन करण्यात येईल. **- अमोल श्रीवास्तव (शिवसेना शिंदे गट )**

## रेणुकादेवी पतसंस्थेतर्फे एक पेड माँ के नाम

**जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते शुभारंभ**



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

पंतप्रधान, महाराष्ट्र शासन व सहकार खात्याच्या आवाहनाला अनुसरून रेणुकादेवी नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या एक पेड माँ के नाम या अभियानाचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्याहस्ते वृक्ष लागवड लागवडीने करण्यात आला.

रेणुकादेवी नागरी सहकारी पतसंस्थेने एक पेड माँ के नाम या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून पारशी टेकडी या ठिकाणी जागतिक पर्यावरणदिन दिनानिमित्त ५० वृक्षांची लागवड केली. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमामुळे निश्चितच जन्मदात्या आईची आठवण या वृक्षारोपणातून होणार आहे.आई आपल्या लेकरासाठी कष्ट घेते व त्याचे भरण- पोषण करते, तसे त्या वृक्षातील आईसुद्धा येणाऱ्या- जाणाऱ्यांना सावली, शुद्ध ऑक्सिजन व फळे देईल. झाडे लावून थांबू नका तर त्याचे संवर्धन करा आणि या वृक्षामध्ये आपल्या आईला बघा. तुकाराम महाराजांनी सांगितल्याप्रमाणे वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या संतोक्तीनुसार या झाडाचे संवर्धन करावे , असे आवाहन त्यांनी यानिमित्ताने केले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ विठ्ठल पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र घोगरे, व्यवस्थापक राहुल शाहिवाले, ओमप्रकाश चाटे, दीपक खरवणे, दीपक मराठे, बाबासाहेब क्षीरसागर, अनिल बिल्ला, श्रीकांत संदुपाटला, मंगेश कामे, गणेश चुंबळे, महेश जिगे, निखिल गवते, गजानन जोशी, संदिपान देवडकर, एकनाथ चव्हाण, हनुमान मोरे, जयंतराव पुरी, भाग्यवान भगवानराव, सय्यद माजिद हुसेन, सौरभ भाले, योगेश काकडे व कर्मचारी उपस्थित होते.

## अमोल बांगड यांच्यावर कारवाई करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

दैनिक सूर्योदय चे संपादक गणेश दिलीप जाधव यांना फोनवरुन कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद जालना व इतर अधिकाऱ्यांना माहिती का विचारता असे म्हणत शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी देणार्या अमोल बांगड यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी अंबड तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने केली आहे. यासंदर्भात अंबड पोलीस ठाण्यात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दैनिक सूर्योदय चे संपादक गणेश जाधव यांना बुधवार दि. ०४ बुधवार रोजी अमोल बांगड या व्यक्तीने फोन वर कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद जालना यांना फोन का केला म्हणत शिवराळ शिवीगाळ केली व तुला पाहतो म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली. पत्रकाराला धमकी देणार्या अमोल बांगड यांच्यावर कठोर कारवाई करून संबंधीत पत्रकाराला व त्याच्या परिवाराला पोलीस सरंक्षण देण्यात यावे व संबंधितावर पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनावर पत्रकार नाजीम सय्यद,बळीराम राऊत,श्रीधर कापसे,आकाश जळके,गोविंद खरात बाळासाहेब गावडे यांच्यासह आदींच्या सह्या आहेत

## आ.लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून लिंबे वडगाव पाटोदा साठवण तलावास २६६ कोटी रुपये

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



२०२४ मध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री माननीय श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे जलसंपदा मंत्री या खात्याचा कारभार असताना त्यांच्याकडे विशेष पाठपुरावा करत लिंबे वडगाव पाटोदा हा साठवण तलाव पूर्णतःवास जाण्याकरिता सुमारे २६६ कोटी रुपये निधी मंजूर करून घेतला होता. मोठ्या प्रमाणावर हा निधी उपलब्ध झाल्याने माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे जाहीर आभार मानले आहे. लिंबे वडगाव पाटोदा साठवन तलाव प्रकल्प आता पूर्ण होणार असून पाटोदा सर्कल मधील गाव गावातील शेतकरी आता सुजलाम सुफलाम होणार असून केळी तशीच फळबागाची मोठ्या प्रमाणावर लागवड या परिसरात होत असल्याचा मानसिक आनंद होत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री परतुर विधानसभा मतदारसंघाची कर्तव्यदक्ष लोकप्रिय आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. काल दि. ०३/०६/२०२५ रोजी माजी मंत्री व विद्यमान आमदार श्री. बबनराव लोणीकर साहेब यांचे शुभ हस्ते पाटोदा साठवण तलाव, ता. मंठा जि. जालना येथे विधीवत जलपुजन करण्यात आले. या प्रसंगी सर्व अभ्यागतांचे स्वागत पुष्प देउन करण्यात आले.

या प्रकल्पाची साठवण क्षमता ८.६०द.ल.घ.मी. ईतकी असुन प्रकल्पामुळे ११९९ हे. ईतके क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. अशी माहिती मा. श्री. शिंगाडे साहेब, अधिक्षक अभियंता, छ. संभाजीनगर पाटबंधारें मंडळ, छ. संभाजीनगर यांनी उपस्थितांना दिली. या प्रसंगी बोलताना मा. आमदार लोणीकर साहेब यांनी प्रकल्पा संदर्भातील शेतकर्यांचे प्रश्न मार्गी लावावेत, तसेच लिंबेवडगाव गावाचे पुनर्वसन व मोबदला या दोन्हि बाबी तातडीने मार्गी लावाव्यात अशा सुचना दिल्या. त्या संदर्भात मा. अधिक्षक अभियंता यांनी येत्या काही दिवसात लिंबेवडगाव येथिल प्रकल्प बाधीतांना मोबदला मिळेल असे आश्वासन दिले. तसेच व्यासपिठावर उपस्थित मा. पंजाबराव बोराडे जि.प. सदस्य यांनी प्रकल्पा अंतर्गत येणारे बाह्य वळण रस्ते व संरक्षक बंधारा ईत्यादि कामे तातडीने मार्गी लावणे बाबत सुचना केल्या. या प्रसंगी मा. गायकवाड साहेब उपविभीय अधीकारी परतुर, मा. तहसिलदार मंठा मा. गणेश चव्हाळ, सरपंच पाटोदा, बंडु नाना खरात सरपंच लिंबेवड्गाव, श्री. कैलाश राव बोरडे, नागेश राव घारे, आनंद जाधव, विलास घोडके, माउलि घोडके, अशोक बोराडे, माजी सरपंच मुस्तफ़ा पठाण , सोपानराव खरात, अविनाश खरात, अमोल गाजरे, ओंकार खरात, मुरलिनाना खरात, तसेच कंत्राट्दार मे. शिंदे एन्ड सन्स, यांचे प्रतीनिधी तसेच राहुल शेळके साहेब उपविभागीय अधिकारी ल.पा. उपविभाग मंठा व्यासपिठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन मा. देशमुख साहेब कार्यकारी अभियंता जालना लघु पाटबंधारे विभाग जालना यांनी केले. कार्यक्रमाअंती सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## सन्मान, विश्वास आणि जबाबदारीची नवी सुरुवात!

### राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीच्या प्रदेश सरचिटणीसपदी धैर्यशिल चव्हाण तर प्रदेश सचिवपदी अर्शद बागवान

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. अजितदादा पवार यांच्या आदेशाने व पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. खा. श्री. सुनील तटकरे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीसपदी धैर्यशील अरविंदराव चव्हाण तर सचिवपदी अर्शद रज्जाक बागवान यांची नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रवादी युवक संघटना वाढीसाठी व सर्व ध्येय धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण कायम सजग आणि तत्पर असाल याची पक्षाला खात्री आहे.

यावेळी, प्रदेश सरचिटणीस मा. आ. श्री. शिव- ाजीराव गर्जे, मुख्य प्रवक्ते मा. श्री. आनंद परांजपे, युवक प्रद- ेशाध्यक्ष मा. श्री. सुरज चव्हाण, माजी आमदार मा. श्री. अरविंद चव्हाण, अल्पसंख्यांक प्रदेश सरचिटणीस मा. श्री. कय्युम खान यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसची विचारसरणी, ध्येय- धोरणे ग्रामीण भागातल्या शेवटच्या माणसापर्यंत पोहचविण्याबरोबरच, युवकांचे विधायक विचारांचे संघटन उभारुन पक्ष मजबुत करण्यासाठी



प्रयत्नशिल राहणार असल्याचे त्यांनी नियुक्ती दरमयान नवनिर्वाचीत प्रदेश सरचिटणीस धैर्यशील चव्हाण प्रदेश सचिव अर्शद रज्जाक बागवान यांनी बोलतांना व्यक्त केले. गेल्या काही वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विस्त- ारासाठी दिलेले योगदान, तसेच युवकांचे संघटन पाहता ही जबाबदारी देवून त्यांचा पक्षाने सन्मान केला आहे. राज्यात युवकांचे संघटन अधिक मजबुत करण्यासाठी आपण येत्या काळात अथक परिश्रम घेवून ही जबाबदारी यशस्वी रित्या पार पाडण्याचा विश्वास त्यांनी यावेळी दिला. अंगी युवा नेतृत्व गुण असलेल्या धैर्यशील चव्हाण व अर्शद रज्जाक बागवान यांनी युवकाचे मोठे संघटन उभे केले आहे. धैर्यशील चव्हाण यांनी आपल्या वकृत्वाच्या जोरावर तर अर्शद बागवान यांना कुठलिही राजकीय पार्श्वभुमी नसतांना त्यांनी स्वकर्तृत्वावर पक्षात आपली वेगळी आणि स्वच्छ प्रतिमा तयार करून आणी त्यांचे अस- लेले पक्षासाठी योगदान पाहुन त्यांच्यावर पक्षाने राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीच्या महाराष्ट्र सचिव पदाची जबाबदारी



सोपविली आहे. यावेळी प्रदेश सरचिटणीस आ. शिवाजीराव गर्जे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण , जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण, प्रदेश सरचिटणीस अमर पाटील, अल्पसंख्यांक प्रदेश सरचिटणीस खय्युम खान, जालना तालुका अध्यक्ष संतोष ढेंगळे, सेवादलाचे जिल्हा उपाध्यक्ष सिद्धेश्वर शिंदे , गणेश भुतेकर, संभाजी भुतेकर,लखन तुरे,आकाश शिंदे यांनी नवनिर्वाचीत राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सचिव अर्शद बागवान यांचे अभिनंदन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## एन्व्हायर्नमेंट मंथ २०२५ ची सुरुवात

छत्रपती संभाजीनगर : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज एन्व्हायर्नमेंट मंथ २०२५ अर्थात पर्यावरण महिना ची सुरुवात केली असून, सस्टेनेबल रिसोर्स मॅनेजमेंट ड्राईव्ह या थीमच्या माध्यमातून टिकाऊपणा (सस्टेनेबिलिटी) या दिशेने आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली आहे. हा उपक्रम टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज २०५० आणि ग्लोबल थीम इन्हानसिंग अवेयरनेस टूवर्ड्स रियलायजिंग टोयोटा ग्लोबल व्हिजन २०५० सोबत सुसंगत आहे. या मोहिमेचा उद्देश कंपनी आणि तिच्या मूल्यसाखळीत (व्हॅल्यू चेन) शाश्वततेची संस्कृती(सस्टेनेबिलिटी कल्चर) अधिक बळकट करणे आहे. यावर्षीचा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'झिरो-बेस थिंकिंग' या धोरणाचा अवलंब - ज्यामध्ये सर्व संसाधनांचे मूल्यमापन नव्याने करून, केवळ खरे मूल्य निर्माण करणारीच संसाधने कायम ठेवली जातात. यामुळे रिफ्युज, रिसायकल (सर्क्युलर इकॉनॉमी), रियूज आणि रिड्यूस (४ठ) यामार्गे दीर्घकालीन टिकाऊ कार्यक्षमतेला चालना मिळते.

## नारायण सेवा संस्थान रविवारी मुंबईत ४१९ अपंगांना मोफत कृत्रिम अवयव प्रदान करणार

मुंबई,-. अपंग आणि मानवतेच्या सेवेसाठी ओळखले जाणारे उदयपूरचे नारायण सेवा संस्थान, रविवार, ८ जून रोजी मुंबईतील अपंगांसाठी मोफत नारायण लिंब आणि कॅलिपर्स फिटिंग कॅम्प आयोजित करणार आहे. हे शिबिर ८ जून रोजी सकाळी ८:०० ते सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत निको हॉल, नायगाव क्रॉस रोड, वडाळा उद्योग भवनाजवळ, दादर (पूर्व), मुंबई -४०००१४ (महाराष्ट्र) येथे आयोजित केले जाईल. ज्यामध्ये पूर्व-निवडलेल्या अपंग व्यक्तींना मोफत लाभ मिळतील. माहिती देताना, संस्थेच्या मुंबई शाखेचे अध्यक्ष महेश अग्रवाल म्हणाले की, संस्था गेल्या ४० वर्षांपासून त्यांच्या मूळ शहरांजवळील विविध राज्यांतील दिव्यांग बांधवांना लाभ देण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्याच मालिकेत, नारायण सेवेने २३ मार्च रोजी मुंबईत मोफत नारायण अवयव मापन शिबिराचे आयोजन केले. ज्यामध्ये ५०० हून अधिक रुग्ण आले. यापैकी ४१९ जण रस्ते अपघातात किंवा इतर अपघातात हातपाय गमावून अपंग झाले. त्याची निवड केल्यानंतर, नारायण लिंब यांच्याकडून कास्टिंग आणि मापन मोफत घेण्यात आले.

## कॅन्टाबिलने आपली रिटेल उपस्थिती वाढवली

भिवंडी (वार्ताहर). भारतातील आघाडीच्या पोशाख उत्पादक आणि किरकोळ विक्रेत्यांपैकी एक असलेल्या कॅन्टाबिल रिटेल इंडिया लिमिटेडने भिवंडीमध्ये त्यांचे नवीन रिटेल स्टोअर उघडण्याची घोषणा केली आहे. १६८७ चौरस फूट क्षेत्रात पसरलेले हे ब्रँड स्टोअर युनिट क्रमांक बी-१०, ग्राउंड फ्लोअर, गाबी बिझनेस पार्क, सरावली व्हिलेज, मुंबई - नाशिक हायवे, टाटा अमंत्राजवळ, भिवंडी, ठाणे ४२१३०२, महाराष्ट्र येथे आहे, जे ब्रँडच्या विस्तार प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. पुरुष आणि महिलांसाठी फॉर्मल-वेअर, कॅज्युअल आणि पार्टी-वेअर कपड्यांची विस्तृत निवड प्रदान करण्यासाठी समर्पित, कॅन्टाबिलने फुटवेअर तसेच ॲक्सेसरीजची विस्तृत श्रेणी ऑफर करण्यासाठी आपला रिटेल व्यवसाय वाढवला आहे.

## झी ५ची थरारक सीरीज अंधारमायासाठी सलग ३० रात्री शूटिंग

६ जून २०२५ - झी ५ ची अंधारमाया ही सीरीज थरकाप उडवणारा अनुभव देणारी असून कोकणाच्या पार्श्वभूमीवर घडणाऱ्या यातल्या कथेनं प्रेक्षकांना खिळवून ठेवलं आहे. अंधारमायाने प्रेक्षकांना झपाटलं (चांगल्या अर्थानं) असून हळूहळू निर्माण होणारी भीती, भोवतालच्या वातावरणातलं गूढ थरारक आहेच, शिवाय या सीरीजचं वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक सीनमागे कलाकारांनी घेतलेली मेहनत. या सीरीजचं शूट कोकणातल्या दुर्गम भागात करण्यात आलं असून ते वातावरणही कथेइतकंच चक्रावणारं आहे. कलाकारांनी या सीरीजची अवघड शेड्यूल्स, भावनिक ताण निर्माण करणारे सीन्स लीलया पार करत नवा आदर्श घालून दिला आहे. कलाकारांनी घेतलेली मेहनत आणि दर्शवलेली बांधिलकी सीरीजला मिळालेल्या प्रतिसादातून दिसून येत आहे. खरंखुरं वाटणारं वातावरण आणि गुंतागुंतीची कथा असलेली अंधारमाया झी ५ ने उचललेलं आणखी एक धाडसी पाऊल असून त्यानिमित्ताने प्रादेशिक कंटेंट क्षेत्रात नवा मापदंड प्रस्थापित झाला आहे.

## दूधाला आरोग्यदायी व स्वादिष्ट बनवण्याच्या अद्वितीय टिप्स

वर्ल्ड मिल्क डे पोषणाचा पॉवरहाऊस आणि घराघरामध्ये असणाऱ्या दूधाच्या पौष्टिकतेला साजरे करतो. बालपणीच्या आठवणींपासून दैनंदिन आरोग्य नित्यक्रमांपर्यंत दूध नेहमी आपल्या आहारातील लोकप्रिय भाग राहिले आहे. या दिनानिमित्त एण्ड टीव्ही कलाकारांनी दूधाप्रती त्यांच्या आवडीबाबत, तसेच या पौष्टिक पेयाला देणाऱ्या अद्वितीय ट्विस्ट्सबाबत सांगितले. हे कलाकार आहेत गीतांजली मिश्रा (राजेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, ''मी आरोग्यदायी फायद्यांसह कम्फर्टसाठी दररोज दूध पिते.

## आराध्य दैवत श्रीरामांना भेटायला अयोध्येला जायचे ठरवतो

भावनिकदृष्ट्या समृद्ध आणि आध्यात्मिक आनंद देणारे कथानक सादर करून सोनी सबवरील 'वीर हनुमान' मालिकेने प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. या मालिकेत छोट्या मारुतीच्या भूमिकेत आन तिवारी, केसरी आणि अंजनीच्या भूमिकेत अनुक्रमे आरव चौधरी आणि सायली साळुंखे तर वाली आणि सुग्रीवच्या दुहेरी भूमिकेत माहिर पांधी दिसत आहे. मालिकेत आता एक भावनिक टर्निंग पॉइंट आला आहे. यावेळी हनुमानाच्या भक्तीची कसोटी होणार आहे. प्रेक्षकांनी अलीकडच्या भागांमध्ये हनुमान आणि शनि देव (ऋषभ पवार) यांच्यातील संघर्ष बघितला आहे.

## मनात अभिनयाविषयीची ओढ निर्माण

प्रत्येक कलाकाराच्या मागे एक मार्गदर्शक प्रकाश असतो, जो त्यांना स्वप्न बघण्याची प्रेरणा देतो. सोनी सबच्या मालिकांमध्ये काम करत असलेल्या आपल्या लाडक्या कलाकारांसाठी अभिनय हा केवळ प्रसिद्धी आणि पैशाचा ध्यास नाही; तर त्यांना प्रेरित करणाऱ्या, शिकवणाऱ्या आणि घडवणाऱ्या आदर्श व्यक्तीच्या पावलावर पाऊल टाकून केलेला प्रवास आहे! आपल्या मार्गदर्शकाला आदरांजली वाहताना सोनी सबचे कलाकार त्या व्यक्तीविषयी, आपल्या कलेवर दिसणाऱ्या त्या व्यक्तीच्या प्रभावाविषयी सांगत आहेत.

## कॉर्नरला बदलले वर्कआऊट झोनमध्ये

झी टीव्हीवरील 'कुमकुम भाग्य' आपल्या मनावरील पकड घेणारे प्लॉटमधील ट्विस्ट्स आणि प्रगल्भ होत जाणारी पात्रे यांसोबत प्रेक्षकांचे हृदय जिंकत आहे. मालिकेतील हल्लीच्या ॲक्शनने भरलेल्या दृश्यांमध्ये शिवांश (नमिक पॉल) आपली पत्नी प्रार्थना (प्रणाली राठोड) ला वाचवण्यासाठी मोठे प्रयत्न करत असून तो गुंडांसोबत मारामारीही करतो. त्याच्या ऑनस्क्रीन कामाने प्रेक्षक अतिशय प्रभावित झाले असून उत्तम शरीरयष्टी राखण्यासाठी नमिक ऑफस्क्रीन किती मेहनत घेतो आणि शिस्त राखतो ते फारच कमी लोकांना ठाऊक आहे.

## 'रात सजनाची', शशिकांत धोत्रे निर्मित आणि दिग्दर्शित 'सजना' चित्रपटातील हळवं गीत आता प्रदर्शित !!

छत्रपती संभाजीनगर - हळव्या भावना, प्रेम आणि स्वप्नांच्या संगमाची कहाणी याचं सुरेल दर्शन घडवणारं शशिकांत धोत्रे निर्मित आणि दिग्दर्शित 'सजना' चित्रपटातील नवं गीत रात सजनाची रसिक प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. रात सजनाची हे गाणं एका मुलीच्या लग्नाच्या स्वप्नांची भावना सुंदरपणे व्यक्त करतं. हे गीत लग्नाच्या खास क्षणांची आणि पहिल्या रात्रीच्या गोडसर भावना सादर करतं. हे गाणं त्या नवविवाहितांच्या प्रेमळ संवादाला, त्यांच्या हळुवार स्पर्शाला आणि नव्या आयुष्याच्या सुरुवातीला रंगत देतं. सजना सिनेमाचं हे गीत पारंपरिक मराठी लग्नाच्या रंगतदार वातावरणात चित्रित केलं आहे. या मनमोहक गाण्याला ओंकारस्वरूप यांनी संगीतबद्ध केले असून, शब्दरचना केली आहे सुहास मुंडे यांनी. त्यांच्या शब्दांतली भावनांची गहिराई आणि ओंकारस्वरूप यांचे सुरेल संगीत यांचा परिपूर्ण संगम या गाण्यात अनुभवायला मिळतो.

# छत्रपती शिवाजी महाराज यांनी रयतेचे कल्याणकारी स्वराज्य निर्माण केले



खुलताबाद प्रतिनिधी अधिकृतरित्या रायगडावर राज्याभिषेक सोहळा संपन्न झाला त्याला आज ३५१ वर्षे पूर्ण झाले अशा पवित्र दिनी आज श्रीक्षेत्र वेरूळ येथे मालोजीराजे भोसले गढीवर १२५ जोड्यांच्या शुभहस्ते तथा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री संजयजी शिरसाट छत्रपती,संभाजीनगर जिल्ह्याचे खासदार श्री संदीपानजी भुमरे, तसेच खासदार तथा माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवतजी कराड तसेच नाथ , आश्रम प्रमुख अक्का महाराज, पूज्यनीय अभयानंदजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ३५१ शिवराज्याभिषेक सोहळा संपन्न झाला याप्रसंगी जोडप्यांच्या हस्ते शिवमुर्तीला अभिषेक झाला त्यासाठी सप्त नद्यांचे जल, समुद्र जल, फळांचा राजा अमरस ,औषधी जल, भस्म स्नान, दही ,तुप, सुवर्ण जल, रजतजल,गंधोधक, अर्ध्य अशा १५ पदार्थांचा शिवाभिषेक सोहळा संपन्न झाला याप्रसंगी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मुख्य आयोजक श्री राजेंद्र पवार यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की वेरूळ ही भोसले घराण्याची मूळ गढी आहे या भुमीत बाबाजी राजे,मालोजीराजे, विठोजीराजे, मासाहेब जिजाऊ तसेच स्वराज्य संकल्पक शहाजीराजे महाराज यांचं वास्तव्य याच वेरूळ येथील भोसले गढीवर झालेले आहे. ही भूमी अठरा पगड जातीला सोबत घेऊन चालण्याची प्रेरणा देते,म्हणूनच या गढीचा विकास संवर्धन आणि येथील शिकवणुकीचा प्रचार प्रसार होणे गरजेचे आहे, एकोप्याचा पराक्रमाचा मानवतेचा संस्कार देणाऱ्या गढीचा विकास व्हावा यासाठी शासनाने३०० ते ३५० कोटी रुपया पर्यन्त निधी मंजूर करून त्याचा भव्यदिव्य जागतिक दर्जाचा आराखडा तयार करावा, यासाठी आलेल्या मान्यवरांनी विशेषता पालकमंत्री श्री संजय जी शिरसाट यांनी प्रयत्न करावे अशी भावना राजेंद्र पवार यांनी व्यक्त केली, याप्रसंगी कराड साहेब यांनी सुद्धा विकासासाठी भरीव मदतीची ग्वाही दिली ,माननीय खासदार संदिपान भुमरे यांनी सुद्धा केंद्रात आणि राज्यात गढीच्या विकासासाठी मी पाठपुरावा करील व पुढील येणारा शिवराज्याभिषेक सोहळा रायगडाच्या नंतर महाराष्ट्र मध्ये शासनाच्या मदतीने सहभागाने तसेच शिवभक्तांच्या उपस्थितीमध्ये भव्य दिव्य स्वरूपात करण्यासाठी प्रयत्न केले जातील असा शब्द दिला, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजयजी शिरसाट आपल्या शुभेच्छा पर भाषणात म्हणाले की गाडीवर कायम अंधार असतो येथे लाईटची म्हणजेच प्रकाशाची समस्या आहे म्हणूनच येणाऱ्या दि १२.६.२०२५ रोजी जिल्हा नियोजन बैठकीमध्ये गढीवर सोलर पॅनल साठी एक कोटी रुपयांची तरतूद मी लगेच करणार आहे


व पुढील विकासासाठी सुद्धा शासन दरबारी पाठपुरावा करून गढीच्या विकासासाठी भरीव काम करेल, सर्व मान्यवरांनी गढीच्या विकासासाठी कार्य करण्याचा संकल्प केला आणि आलेल्या जोडप्यांनी ब्राह्मणांच्या मंत्र उद्घोषात शिव अभिषेक संपन्न झाला तोहीस्वराज्य संकल्पक शहाजीराजे महाराजांच्या चरणाशी आणि भोसले गडीच्या मूळ जागेवर हे आमचं परम भाग्य आहे अशा भावना सर्व शिवभक्तांनी व्यक्त केल्या विशेष म्हणजे पूजनासाठी प्रत्येक यजमानाला दिलेली शिवमूर्ती अभिषेकानंतर घरी पूजनासाठी भेट म्हणून देण्यात आली याप्रसंगी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी सर्व मान्यवर उद्योजक डॉक्टर अधिकारी राजकीय क्षेत्रातील मान्यवर,पत्रकार बांधवांचे आणि आलेल्या सर्व , शिवभक्तांचे आभार मानले

## गावठी कट्ट्यासह शस्त्रे बाळगणारे चौघे बिडकीन पोलीसांच्या ताब्यात



तभा वृत्तसेवा बिडकीन दि ६ जून पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीत अवैध गावठी कट्टा व धारदार शस्त्र बाळगल्याप्रकरणी पोलीसांनी चार जणांना ताब्यात घेतले. ही कारवाई दि ५ रोजी रात्री सव्वाबारा वाजता शेकटा फाटा येथे बिडकीन पोलीसांनी केली.बिडकीन पोलिसांनी रात्री सव्वाबारा वाजता शेकटा फाटा येथे एक कार (क्र.एमएच.०८ झेड ५०६७) थांबवून झडती घेतली. तेव्हा त्यांना एक गावठी कट्टा, एक-दोन सुरे, काळ्या रंगाची एअर गण, सत्तूर ही धारदार शस्त्रे आढळली. पोलीसांनी ती जप्त करून आरोपी सचिन आप्पासाहेब काळे (वय २६), रोमन हरी शिंदे (वय २६), संदीप तुळशीराम खंडागळे (वय २६), किशोर तुळशीराम मुके (वय २३, सर्व रा. मांडवा, ता. गंगापूर) यांना ताब्यात घेतले. वरील सर्व आरोपींवर बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे तपास करत आहे, या कारवाईत डॉ विनयकुमार राठोड पोलीस अधीक्षक छ ,संभाजीनगर ग्रामीण, अन्नापुर्णा सिंग अपर पोलीस अधीक्षक संभाजीनगर ग्रामीण,पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, विष्णू गायकवाड,सुरज ढवळे, योगेश वाघमोडे आदींनी सहभाग नोंदवला होता

## एमजीएम विद्यापीठ आणि अवंतिका विद्यापीठात सामंजस्य करार



छत्रपती संभाजीनगर, दि.६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि अवंतिका विद्यापीठ, उज्जैन (मध्यप्रदेश) यांच्यात शैक्षणिक, संशोधन व नवकल्पनांच्या क्षेत्रात सहकार्य करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

अवंतिका विद्यापीठात आयोजित विशेष कार्यक्रमात या सामंजस्य करारावर एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ आणि अवंतिका विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.नितीन राणे यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी दोन्ही विद्यापीठांचे वरिष्ठ पदाधिकारी, अधिष्ठाता, प्राध्यापक व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते. हा सामंजस्य करार कुलपती अंकुशराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली झाला असून कराराच्या यशस्वितेसाठी कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर यांनी प्रयत्न केले.

**एमजीएम विद्यापीठ आणि अवंतिका विद्यापीठ आज या सामंजस्य कराराच्या माध्यमातून येत्या काळामध्ये विविध विषयांवर एकत्रितपणे काम करणार आहेत. एमजीएम विद्यापीठ राज्यातील, राज्याबाहेरील आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी सामंजस्य करार करत आले आहे. विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देत असताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या प्रकारच्या सामंजस्य कराराचा उपयोग होत आहे.**

**- प्रा. डॉ. विलास सपकाळ कुलगुरू, एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर**

या कराराचा प्रमुख उद्देश म्हणजे शैक्षणिक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन उपक्रम, कौशल्य विकास, स्टार्टअप्सला चालना, इनोव्हेशनसंबंधीचे कार्यक्रम, प्रशिक्षण कार्यशाळा व परिषदा यांच्या माध्यमातून शिक्षणात गुणवत्ता व नाविन्य निर्माण करणे आहे. दोन्ही विद्यापीठांतील विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी परस्पर आदानप्रदानाच्या संधी या माध्यमातून निर्माण होणार असून यामुळे त्यांच्या ज्ञानात व अनुभवात मोलाची भर पडणार आहे.

हा सामंजस्य करार भविष्यातील शैक्षणिक क्षेत्रातील बहुआयामी सहकार्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरणार आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, नाविन्यपूर्ण प्रकल्पांची संधी आणि जागतिक दर्जाचे करिअर पर्याय उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या कराराचा दूरगामी सकारात्मक परिणाम होणार आहे. दोन्ही संस्थांनी या सहकार्याच्या माध्यमातून भविष्यातील शैक्षणिक वाटचालीसाठी महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# टेलिव्हिजनच्या इतिहासात पहिल्यांदाच पाहायला मिळणार महानायिकांची महावटपौर्णिमा

### वडाच्या रक्षणासाठी स्टार प्रवाहच्या १५ नायिका एकत्र येऊन उठवणार आवाज




वरुण राजाचं आगमन झालं की चाहूल लागते ती वटपौर्णिमा सणाची. पती-पत्नीच्या नात्यातला गोडवा वाढवणाऱ्या या सणाचं विशेष महत्त्व आहे. या दिवशी वटवृक्षाची पूजा करुन पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली जाते. वड हा वृक्ष दीर्घायुषी असल्याने या वृक्षाचं संवर्धन केलं जावं हा महत्त्वाचा उद्देश देखिल या सणामागे आहे. मराठी टेलिव्हिजनच्या इतिहासात पहिल्यांदाच स्टार प्रवाहच्या १५ नायिका एकत्र येऊन वडाच्या रक्षणासाठी आवाज उठवणार आहेत. व्रताचे धागे तोडू पहाणाऱ्या वाईट प्रवृत्ती विरोधातला हा लढा असेल. ज्या वटवृक्षाने दर वटपौर्णिमेला सौभाग्यवतींना आशीर्वाद दिला त्याच्या मुळावर जेव्हा कुणी घाव घालण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ही लढाई कुणा एकाची नसते. तर आपल्यातल्याच असंख्य शुभा, नंदिनी, सायली, कला आणि अबोली सारख्या रणरागिणी एकत्र येतात आणि या प्रवृत्तीचा नायनाट करतात. आजच्या युगाची सती सावित्री कशी असावी याचा आदर्श घालून देतात.

मराठी परंपरा, मराठी प्रवाह हे स्टार प्रवाह वाहिनीचं ब्रीदवाक्यच आहे. परंपरेसोबतच सामाजिक भान जपण्याचा स्टार प्रवाहने नेहमीच प्रयत्न केला आहे. महावटपौर्णिमेचा हा विशेष भाग याच प्रयत्नातलं पुढचं पाऊल म्हणता येईल. पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. पूर्वापार चालत आलेले सण आणि परंपरा आपल्याला निसर्गाच्या सानिध्यात जाण्यासाठी आणि त्यांचं संवर्धन करण्यासाठी भाग पाडतात. वटपौर्णिमा हा सण हे त्याचच एक उत्तम उदाहरण. त्यामुळे वटवृक्षाचं रक्षण करुन स्टार प्रवाहच्या नायिका यंदाची वटपौर्णिमा खऱ्या अर्थाने आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी करणार आहेत.

आई आणि बाबा रिटायर होत आहेत मालिकेतील शुभा म्हणजेच निवेदिता सराफ म्हणाल्या, 'मालिकांमधील सगळ्या नायिकांना एकत्र आणून त्यांच्या पात्राचा विचार करुन गोष्ट लिहिली गेलीय याचं कौतुक वाटतं मला. शूट नाही तर एखादा छान समारंभ सुरु आहे असंच वाटतंय. पूर्वापार चालत आलेल्या सणांमागे खूप चांगला विचार आहे तोच पोहोचवण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. वृक्षसंवर्धन हा विषय सध्या अत्यंत महत्त्वाचा आहे. निसर्गाने आपल्याला भरभरुन दिलं आहे या निसर्गाला जपणं हे आपलं कर्तव्य आहे. महावटपौर्णिमेच्या या विशेष भागाच्या निमिताने १५ नायिका एकत्र येऊन वटवृक्षाच्या रक्षणासाठी कसा लढा देणार हे पहाणं उत्सुकतेचं असेल.'

ठरलं तर मग मालिकेतील सायली म्हणजेच अभिनेत्री जुई गडकरी म्हणाली, 'हा फक्त महासंगम आहे असं मी म्हणणार नाही. महावटपौर्णिमेच्या निमिताने खूप चांगला उपक्रम स्टार प्रवाह वाहिनी राबवते आहे. निसर्गाच्या सानिध्यात आपण प्रत्येकानेच जायला हवं. वटपौर्णिमा सण आपल्याला हेच शिकवतो. या विशेष भागातूनही आपल्या रुढी, परंपरा आणि निसर्ग किती महत्त्वाचा आहे हे पहाता येईल. झाडांचं संवर्धन करण्यासाठी कश्या १५ नायिका एकत्र येऊन लढा देतात याची छान गोष्ट गुंफण्यात आली आहे. या निमित्ताने वडाच्या झाडाजवळ ४ दिवस शूट करता आलं. आम्ही सगळ्या नायिका एकत्र होतो. शूट करताना खूपच मजा आली अशी भावना जुई गडकरीने व्यक्त केली.'

तेव्हा पाहायला विसरु नका महानायिकांची महावटपौर्णिमा रविवार ८ जूनला दुपारी १ आणि संध्याकाळी ७ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

## राज्यातील शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी ; तहसील कार्यालय येथे निवेदन



सोयगाव,दि.६ जून - महायुती सत्तेवर येण्याच्या येण्यापूर्वी गोरगरीब शेतकरी व लाडक्या बहिणींना दिलेल्या आश्वासनाचे पूर्ततांना न केल्याबद्दल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील शिवसेना भवन दादर येथे जिल्हास्तरावरील राज्यातील सर्व जिल्हाप्रमुख व तालुकाप्रमुख यांची एक महत्त्वाची बैठक घेऊन महायुतीने दिलेले आश्वासनाचे पूर्तता न केल्याबद्दल क्या हुआ तेरा वादा हा उपक्रम घेऊन तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये व तालुका स्तरावर निवेदन देण्याचे कळवले असताना तालुक्यातील तालुका प्रमुख व शहरातील शहरप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील ग्रामपंचायतचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये तसेच तालुक्यातील तहसील कार्यालयामध्ये जाऊन दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी यासाठी महायुती सरकारच्या विरोधात निवेदन सादर करण्यात आले. यावेळी शिवसेना सोयगाव तालुकाप्रमुख दिलीप मचे,तालुका संघटक गुलाबराव कोलते पाटील, सोयगाव शहर प्रमुख रविंद्र काटोले,उपशहर प्रमुख सुरेश फुसे,उपशहर प्रमुख दीपक बागुल,धोंडू पाटील,शंकर इंगळे,योगेश रोकडे,विठ्ठल भारुडे,पांडुरंग भारुडे,संजय सपकाळे, यांच्यासह तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी सोयगाव तहसील कार्यालय येथे निवेदन देण्यात आले.

## जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा



सोयगाव,दि.६ जून - उपक्रमशिल शाळा जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे दि.६ जून शुक्रवार रोजी शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.मान्यवरांच्या हस्ते स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले.यावेळी नगरसेवक गजानन कुडके,शिक्षण प्रेमी योगेश बोखारे,समाजसेवक शंकर जेठे,मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सुनिल गरुड,आदीत्य श्रीखंडे यांच्या सह पालक,विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,प्रशिक्षक शिक्षक शुभम देसले यांनी परीश्रम घेतले.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वनविभात मार्फत अनाड येथील ऋषी मंदिर परिसरात वृक्षारोपण !



अजिंठा दि, ६ जून - प्रदूषणाच्या समस्येने सर्वत्र उग्र रूप धारण केलेले असून, पर्यावरणाचे रक्षण करणे आवश्यक झाले आहे. या संबंधी समाजाला जागृत करण्यासाठी व समाजामध्ये वृक्षारोपण व संवर्धनासाठी जनजागृती करण्यासाठी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनानिमिताने वन अधिकारी मा . डीसीएफ माने (मॉडम )छा . संभाजीनगर यांच्या नेतृत्वाखाली अजिठा वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष दोडके यांच्या मार्गदर्शनाखाली

शिवणा वन परिमंडळ अंतर्गत अनाड येथील ऋषी मंदिर परिसरात गुरुवारी सकाळी अनाड येथील उपसरपंच प्रवीण जाधव व गावकरी यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी वनपाल डि. एस . सोनार, वनरक्षक वाय .एस बोखारे, वनरक्षक एस .एस . चाथे, याच्या सह महिला व मुलेआदी उपस्थित गावकरी मान्यवर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरणाच्या व समाजाच्या दृष्टीने वृक्षारोपण व संवर्धन करने महत्त्वाचे आहे .याचे महत्त्व गावातील नागरिकांना समजावून सांगितले. वनपाल डि. एस . सोनार यांनी वृक्षारोपण करण्यासाठी परिश्रम घेतले .

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. व्ही. एन. काटकर दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: २७३/२०२७ पुढील तारीख: १६/०६/२०२७

अर्जदार : महेश पिता शिवाजी निकम, वय १८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. टाकळी अंतुर, ना. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद /छत्रपती संभाजीनगर

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. जे.सी. मगर, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, शिवाजी पुंडलिक निकम व छाया भ्र. शिवाजी निकम रा. टाकळी अंतुर ता. कन्नड येथील रहिवाशी असून आपसात पती पत्नी होते. शिवाजी पुंडलिक हे दिनांक २७.४.२००७ रोजी मौजे टाकळी अंतुर ता. कन्नड येथे मयत झाले. तसेच त्यांची पत्नी छाया शिवाजी निकम या दिनांक २९.७.२०१२ रोजी त्यांचे माहेरी मौजे लोहगांव ता. कन्नड येथे मयत झाल्या आहे, मयत शिवाजी पुंडलिक निकम व छाया शिवाजी निकम यांना विवाह संबंधातून एक मुलगा महेश शिवाजी निकम हा झालेला आहे, मयत शिवाजी पुंडलिक निकम व छाया शिवाजी निकम यांना अर्जदारा व्यतीरिक्त कोणीही वारस नाही. मुळ अर्जा सोबत ग्राम पंचायत टाकळी अंतुर व लोहगांव यांनी दिलेले मृत्यु प्रमाण पत्र अर्जदारांनी अर्जा सोबत दिलेले आहे. मयन शिवाजी पुंडलिक निकम व छाया शिवाजी निकम यांना अर्जदार हा एकमेव कायदेशीर वारस आहे. मथत शिवाजी पुंडलिक निकम हे एम.एस.ई.बी.सब स्टेशन चिंचोली येथे विज सेवक म्हणून कार्यरत होते. शिवाजी पुंडलिक निकम व छाया शिवाजी निकम यांचे पश्चात अर्जदार यास अनुकंपातत्वावर त्याचे वडीलांचे जागेवर नौकरी मिळण्यासाठी व ईतर शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण दिनांक ०६.०७.२००७ गंजी घडले आहे. अर्जदार मयताच कायदेशीर वाग्म असल्याने अर्जदारां शिवाय मयनांना कोणीही ईनर वारस नाही, तसेच अर्जदार यांना मदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक ३०.०५.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक ३०.०५.२०२५

आदेशावरुन

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## अग्रलेख...

# मृत्यूलाही मोल हवे!

कोणतीही एखादी दुर्लभ गोष्ट प्राप्त करण्यासाठी खडतर कष्ट करावे लागतात, मोठे मोल मोजावे लागते, तेव्हा त्या गोष्टीची किंमत कळते. त्यामुळेच सहजपणे वाट्याला आलेल्या जन्माचे आणि पुढे मरण येईपर्यंत जगत राहण्याचे मोल माणसाला फारसे वाटत नसावे. सहजपणे प्राप्त झालेल्या जगण्याच्या प्रत्येक क्षणाचे सोने करण्याचाच प्रत्येकाने गांभीर्याने प्रयत्न केला पाहिजे, पण तसे होत नाही. ज्याने चोच दिली आहे त्याने चाऱ्याचीदेखील व्यवस्था केलेली असते, हा सोयीस्कर समज अंगवळणी पडलेला असल्याने जगण्याचे गांभीर्यही फारसे उमगलेले नाही, असा समज असताना जेव्हा अचानक एखाद्या संकटास सामोरे जाण्याची वेळ येते, तेव्हा जगणे जपण्यासाठी काय करावे याचेदेखील भान उरत नसावे. अन्यथा, जगण्याचे मोल उमगलेले नाहीच, पण मृत्यूचा अर्थदेखील समजला नाही अशी सैरभैर स्थिती उद्भवते आणि जगणे मातीमोल होते. ज्या जिवांचे जगणे सार्थकी लागते, त्याचा मृत्यूही मौल्यवान असतो. जेव्हा मरण स्वस्त होते, तेव्हा जगण्याची किंमत कळत नाहीच; पण जगणेच मातीमोल होते. देशाच्या रक्षणासाठी जिवाची बाजी लावून प्राण पणाला लावत शत्रूशी झुंजताना येणाऱ्या मृत्यूचे मोल यामुळेच अनमोल ठरते. बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर अशाच काहीशा क्षुल्लक विजयोत्सवाच्या उन्मादातून बेभान झालेल्या गर्दीत सहजपणे शिरकाव केलेल्या मृत्यूने काही निष्पाप जिवांचा घास घेतला ही बाब दुर्दैवी आहेच, पण अशा प्रसंगातून मृत्यूला आमंत्रण देऊन त्याला आपले जगणे सहजपणे हवाली करणे कितपत योग्य ठरते, याचा गंभीर विचार व्हायला हवा. कारण तसा विचार झाला नाही, तर पदोपदी टपून बसलेला मृत्यू कोणत्याही बेसावध क्षणाचे बोट धरून समोर उभा राहील आणि कोणताही दोष नसलेल्या निष्पापांचा नाहक बळी घेऊन डाव साधेल, हे आता या दुर्घटनेनंतर तरी ध्यानात घ्यायला हवे.

असे म्हणतात की, गर्दीचे एक मानसशास्त्र असते. गर्दी जेव्हा अनावर आणि बेभान होते, तेव्हा समूहाच्या विवेकावर उन्मादाचे आक्रमण होते. आजकाल गर्दीच्या उन्मादाच्याही वेगवेगळ्या छटा दिसू लागल्या असून त्याला सामाजिक स्थितीचे काही कंगोरे आहेत, असे म्हटले जाते. विकसित देशांत गोळा होणारी गर्दी, अविकसित देशांतील गर्दी आणि विकसनशील देशांतील गर्दी या गर्दीच्याच वेगवेगळ्या छटा असल्या, तरी प्रत्येक छटेतील गर्दीचे मानसशास्त्र वेगवेगळे असते. विकसित देशांतील गर्दीतही चेंगराचेंगरीसारख्या घटना घडतात, तेथेही उन्मादी गर्दीतील काहींना नाहक मृत्यूला सामोरे जाण्याची वेळ येते. विकसित देशांत जेव्हा केव्हा चेंगराचेंगरीच्या घटना घडतात, तेव्हा त्या साधारणतः एखाद्या आलिशान सोहळ्याच्या निमित्ताने होणाऱ्या गर्दीतील काही जणांच्या आयुष्याची अखेर ठरतात. पार्टी, पब, विजयोत्सव आदी कारणांमुळे जगण्यातील सर्वोच्च आनंदाचा क्षण साजरा करण्याच्या उन्मादातून बेभान होणाऱ्या गर्दीतील काहींना मृत्यूने कवटाळणे ही बाब दुर्दैवी, दुःखद असते हे खरेच, कोणत्याही साजरेपणाच्या क्षणातील आनंदावर असे अनपेक्षितपणे पडणारे विरजण आणि त्यामुळे होणारा क्लेशदायक शेवट हा दुर्दैवी प्रकारच असतो, पण आनंद साजरा करण्याच्या क्षणावरच दुःखाचा घाला पडतो, असे अशा अनेक घटनांतून दिसून आल्याने, जगण्याच्या आनंदाआड लपलेल्या दुःखाची जाणीव जागी ठेवण्यासाठी तरी, जगण्याचे मोल जाणावे, अशी अपेक्षा गैर ठरत नाही. अविकसित देशांत बहुधा, जगण्याच्या धडपडीतून निर्माण होणाऱ्या संघर्षाचा फायदा घेत मृत्यू आक्रमण करतो, असे दिसते. उपासमारीसारख्या संकटात होरपळणाऱ्या समूहाच्या मदतीसाठी वाटली जाणारी अन्नाची पाकिटे गोळा करण्याकरिता उडणारी झुंबड जगण्याचा संघर्ष करत असतानाच, चेंगराचेंगरीसारख्या घटनेत मृत्यू झाल्याच्या काही घटना अविकसित देशांत घडल्याचे दिसते. भारतासारख्या विकसनशील देशात सहसा उत्सवी सोहळे साजरे करण्याकरिता उन्मादी गर्दी गोळा झाल्याचे फारसे दाखले गेल्या काही दशकांतील इतिहासात नाहीत. धार्मिक सण, उत्सव, जत्रा, सत्संग आदी, जगणे सहज व समाधानी करण्याच्या सात्त्विक प्रेरणेतून साजऱ्या होणाऱ्या सोहळ्यांत सहभागी होणे, ही भारताच्या समाजसमूहांची आजवरची मानसिकता होती. गेल्या काही वर्षांत या मानसिकतेत बदल होताना दिसू लागला असून सोहळे, उत्सव, विजयोत्सव, पार्ट्या अशा उत्सवी उन्मादातूनच गर्दीवर मृत्यूचे आक्रमण होताना दिसत आहे. गेल्या काही दशकांत भारतात घडलेल्या चेंगराचेंगरीसारख्या घटनाही दुर्दैवी होत्या. जगण्याचे आध्यात्म जाणण्याच्या उत्कंठेतून गोळा होणाऱ्या गर्दीच्या मानसिकतेत उन्मादाचा लवलेशही नसताना, काही दुर्दैवी आणि अनपेक्षिताचा घाला पडावा आणि त्यामध्ये आयुष्याचा भूतकाळ व्हावा, असे दुर्दैवी प्रसंग याआधी घडले आहेत. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ डिझास्टर रिस्क रिडक्शन' नावाच्या संस्थेच्या पाहणीनुसार, भारतातील चेंगराचेंगरीच्या घटनांपैकी जवळपास ८० टक्के घटना केवळ धार्मिक कार्यक्रम, जत्रा, तीर्थक्षेत्रे आदी ठिकाणी घडल्या आहेत. अशा प्रसंगांचा बळी ठरणाऱ्या त्या निष्पापांचा त्यात काही दोष नसतानाही, कोणत्या तरी व्यवस्थेच्या बेफिकिरीचा बळी ठरून प्राण गमावण्याचे प्रसंग याआधी आले आहेत. एखाद्या जत्रेत भक्तिभावाने गोळा झालेल्या भाविकांच्या मनातील भक्तीचा उन्माद काही वेळा मृत्यूला संधी देणारा ठरला आहे. अलिकडे मात्र गर्दीच्या मानसशास्त्राची नवी छटा समाजजीवनात उमटू लागली आहे. उत्सवी सोहळे साजरे करण्याच्या उन्मादातून होणाऱ्या चेंगराचेंगरीसारख्या, सहसा विकसित देशांत घडणाऱ्या घटना वाढू लागल्याने, भारतीय समाजसमूहांच्या जीवनशैलीचा नवा पदरही अशा घटनांतून समोर येऊ लागला आहे.

कोणत्याही ठिकाणी कोणत्याही निमित्ताने गर्दी होण्याची व त्यातून चेंगराचेंगरीसारख्या दुर्घटना घडण्याची शक्यता असेल, तर त्याआधी प्रशासकीय यंत्रणांनी अशा ठिकाणांतील गर्दीचे व ज्यासाठी गर्दी गोळा होणार असते अशा कार्यक्रमाचे काळजीपूर्वक नियोजन व नियंत्रण करण्याची आवश्यकता असते. गर्दी नियंत्रित करण्यासाठी पर्यायी मार्ग मोकळे ठेवणेही गरजेचे असते. बहुधा काही अफवा फैलावल्यामुळे गर्दी बेभान होऊन अनावर होते आणि तिला नियंत्रित करण्यासाठी बळाचा बेछूट वापर केला जातो, असे काही घटनांवरून दिसते. त्यामुळे अशा नियोजनाचा अभाव आणि समूहाचा अनाठायी उन्माद ही कारणे लक्षात घेतल्यास असे अनावस्था प्रसंग टाळता येणे शक्य असते, हेही स्पष्ट झाले आहे. आजवरच्या गर्दीतील चेंगराचेंगरीच्या घटनांनंतरही याच बाबी अधोरेखित करण्यात आल्या होत्या. जेव्हा जेव्हा अशा दुर्दैवी घटना घडल्या, तेव्हा त्यानंतर गर्दीच्या नियंत्रणातील नियोजनाच्या अभावावर बोट ठेवले गेले आहे. तरीही, अशा दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती होऊनही नियोजनाचे गांभीर्य मात्र दुर्लक्षित राहतेल हा दुर्दैवी अनुभव अशा घटनांनंतर वेळोवेळी येत गेला आहे. सुमारे १८ वर्षांनंतर आयपीएल क्रिकेट सामन्यात मिळालेल्या विजयाचा उत्सव साजरा करण्याचा सोहळा बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये साजरा होत असताना विजयी संघाच्या स्वागतासाठी स्टेडियमबाहेर जमलेल्या क्रिकेट शौकिनांची अफाट गर्दी अनावर झाली. गर्दीला नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केल्यावर चेंगराचेंगरी होऊन ११ जणांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेत अनेक जण गंभीर जखमी झाले, अनेक श्वास न घेता आल्याने गुदमरून बेशुद्ध पडले असून मृतांचा आकडा आणखी वाढेल, अशीही शक्यता वर्तविली जात आहे. या घटनेनंतर आता राजकीय वाग्युद्ध पेटेल. आरोप-प्रत्यारोपांचे रण माजेल, राजकारणास ऊत येईल, मृतांच्या नातेवाईकांस मदत जाहीर होईल आणि शोकसंवेदनांचा पाऊस पडेल. अशा दुर्दैवी घटना घडल्यानंतर असे होतच असते. मात्र, गर्दीच्या नियंत्रणाच्या उपायांचा अभाव कायमचा संपुष्टात आणण्यासाठी काय करावे लागेल, समाजाच्या उन्मादी अवस्थेच्या काळात विवेकाचा विचार रुजविण्याचे संस्कार कसे घडविता येतील, याची चिंता मात्र अभावानेच उमटेल. अनेक समस्यांमुळे आणि अनपेक्षित आघातांशी सुरू असलेल्या संघर्षामुळे जगणे महाग झाले आहे हे खरेच आहे. पदोपदी दबा धरून बसलेल्या मृत्यूचा घाला केव्हा पडेल हे सांगता येणार नाही, एवढी अशाश्वत स्थिती सर्वत्र दाटली आहे, हेही खरे आहे. पण याही स्थितीत, जगणे जपायला हवे. सगळे काही महाग होत असताना, आपले मौल्यवान जगणे कवडीमोल किमतीत, स्वस्तात मृत्यूच्या हवाली करण्याचा अविवेकीपणा कोणाकडूनही होऊ नये, याची काळजी घ्यायला हवी! ▮

## जीवन जिज्ञासा

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

# महाभारत ते भारत (२०)

भारतीय संस्कृतीचा ज्ञानकोश म्हणजे महर्षी व्यासांनी लिहिलेले महाभारत. जीवनातील 'आदर्शवाद' (आयडियालिझम) हा किती उच्चतम स्तरापर्यंत जीवनात प्रत्यक्ष रूपेण जगता येतो, याचे प्रत्यक्ष दर्शन महर्षी वाल्मीकिंनी रामायणात घडविले आहे. तर, महाभारतात हाच आदर्शवाद सांभाळून व्यवहाराच्या स्तरावर परिस्थितिजन्य संदर्भात कसे जगावे, याचा वस्तुपाठ संपूर्ण मानवसमाजासाठी महाभारतकारांनी दिला आहे. रामायण आणि महाभारत हे दोन ग्रंथ म्हणजे मानवी जीवनाची कृतार्थता संपन्न करण्याच्या वाटचालीचे दर्शक 'वाटाडे' आहेत.

रामायण आणि महाभारत या दोनही महाकाव्यात एक समान सूत्र असल्याचे आपल्याला जाणवते; जर त्या सूक्ष्म दृष्टीने त्यांचे चिंतन केले तर! ते समान सूत्र म्हणजे 'राम-रावण युद्ध' आणि 'कुरुक्षेत्रावर झालेले कौरव-पांडवांचे युद्ध.' त्यानंतरच रामराज्याची आणि धर्मराज्याची साकार झालेली स्थापना. पण गंमत अशी आहे की, रावणशाही नष्ट होण्यासाठी 'सीता' कारण झाली तर कुरुक्षेत्रावर झालेल्या भीषण संहारासाठी 'द्रौपदी' कारण झाली. या दोन महायुद्धांचा वणवा या दोन नारीशक्तीच्या झालेल्या अपमानांमुळे भडकला आणि त्या वणव्यात पीडक, हिंसक, मदांध, सत्तांध, सत्तापिपासू, नारीभक्षी, अत्याचारी 'रावणी मनोवृत्ती'चा आणि 'धृतराष्ट्री मनोवृत्ती'चा संपूर्ण नायनाट झाला.

साधी असलेली युद्धे महायुद्धात परिवर्तित झाली, ती केवळ या दोन महान पतिव्रतांच्या सतित्वाच्या झालेल्या अपमानांमुळे, अवहेलनांमुळे! हा इतिहास आहे, वस्तुस्थिती आहे आणि ती नाकारताही येत नाही. जड भूमीसाठी, राज्यासाठी, सत्तेसाठी ही सर्वंकष युद्धे झाली नाहीत तर हिंदू संस्कृतीत देवीस्वरूपा, मातृस्वरूपा, जगज्जननीच्या स्वरूपात, आदिशक्तीच्या स्वरूपात पूजल्या जाणाऱ्या नारीशक्तीच्या मंगलप्रद सन्मानाच्या पुनर्प्रस्थापनेसाठी ही महायुद्धे झाली आहेत, हे निखळ सत्य चक्रवर्ती भरताच्या वारसदारांनी लक्षात घेणे जरूर आहे. सध्या गाजत असलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' या घटनेकडे त्या भावनिक, सांस्कृतिक, भारतीय नारीशक्तीची प्रतिष्ठा, अस्मिता या दृष्टिकोनातून पाहणे, त्याने त्याचे खरे मूल्यांकन होऊ शकेल. नाही तर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे म्हणतात तशी ती छुटपुटीची लढाईच ठरेल.

'ऑपरेशन सिंदूर' ही घटना, त्यातून काही दिवसांचा झालेला संघर्ष, त्यांत भारतीय सेनेने जगालाही आश्चर्यचकित करणारा असा केलेला पराक्रम या गोष्टीमुळे संपूर्ण जगाला उदित होणाऱ्या समर्थ भारताचे दर्शन झाले. भारतातील प्रत्येकाची मान अभिमानाने, गौरवाने उन्नत झाली. 'हा अजिंक्य आहे नरसिंहांचा देश' या म्हटलेल्या गीताची अनुभूती आली. 'गर्व से कहो हम हिंदू हैं'चा आवाज अधिक तीक्ष्ण झाला. पण 'क्रियेला प्रतिक्रिया', 'आघाताला प्रत्याघात' असे जुजबी, वरवरचे याचे स्वरूप नाही. ते अधिक खोल, विस्तृत, भारताच्या भविष्यकालीन वाटचालीचा स्पष्ट निर्देश करणारे तसेच 'समर्थ भारता'ला भविष्यात कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे संकेत देणारे आहेत. कसे ?

कथा आहे शिवपुराणातील- शिवप्रभूचे शिवसुर (सासरे) दक्ष प्रजापती देव संघातील एक फार मोठे प्रस्थ. त्यांना अनेक मुली, विविध देवांशी विवाह झालेल्या. दक्ष प्रजापतींच्या प्रतिष्ठेला साजणाऱ्या घराण्यात गेलेल्या. पण त्यांची एक मुलगी सती अतिशय सुस्वरूप, पण तिने पती म्हणून निवड केली दक्षाच्या दृष्टीने भणंग, भुतांचा स्वामी, घर नाही दार नाही, उजाड असलेल्या कैलासावर राहणारा, वैभवहीन, भस्मविलेपन करून संपूर्ण विश्वाची चिंता करीत ध्यानमग्न असणारा अशा भोळा सांब सदाशिव. त्यामुळे त्याच्या महायज्ञात पिता असूनही त्याने तिची आणि तिचा पती भगवान शंकराचा खूप अपमान केला. त्यामुळे सतीने त्याच अग्निकुंडात समाधी घेतली. संतापलेल्या शिवाने रौद्ररूप धारण करून दक्षयज्ञाचा विध्वंस केला.

त्यासाठी त्यांनी 'वीरभद्र' या अजिंक्य अशा रुद्रगणाची आणि त्याला साथ देणाऱ्या 'कृत्ये'ची निर्मिती केली. कृत्या ही रक्तपान करणारी देवता आहे. तिला प्रत्येक युगात रक्तपान करण्याची सवय आहे. प्रत्येक युगात तुला एक महाघट रक्त मिळेल, असे अभिवचन श्री भगवान शंकरांनी तिला दिले आहे. आतापर्यंत तिला तीन महाघट रक्त मिळाले असून कलियुगात अर्धा घट मिळायचा आहे. तो अर्धा घट तिला म्लेंछांच्या कृतीमुळे वा आततायीमुळे जो त्यांचा संहार होणार आहे, त्यांतून मिळणार आहे, अशी पुराणकालीन भविष्यवाणी आहे. ऋषी-मुनी, संत-महंत, फकीर यांनी केलेली भविष्यवाणी कशी अचूक असते, हे मागील लेखात आपण पाहिलेच आहे. पुराणातील भविष्यकालीन संघर्षाचा प्रतीकात्मक श्लोक असा -

'कृतयुगे रेणुका कृत्या । त्रेताया जानकी सती ।
द्वापारे द्रौपदी कृत्या । म्लेंच्छ कृत्या कलियुगें ॥' (शिवपुराण)

म्हणजे कार्तवीर्याच्या मुलांनी जमदग्नीचा वध आणि रेणुका मातेचा वध केल्यामुळे परशुरामाने केलेला नरसंहार, सीताहरणामुळे झालेल्या राम-रावण युद्धातील रक्तपात, द्वापार युगात द्रौपदीच्या अपमानामुळे झालेल्या महायुद्धातील रक्तपात, असे तीन घट रक्त कृत्येला मिळाले आहे. शिल्लक राहिलेला अर्धा घट हा तिला म्लेंछ संहारामुळे मिळणार आहे. कारण विद्यमान जागतिक परिस्थितीत आतंकवादाच्या नावाखाली 'म्लेंछ दुर्जन उदंड' झाले असून बहुतां दिवसांपासून त्यांचे 'सर तन से जुदा' या काफिरांच्या विद्वेषाचे बंड खूप माजले आहे. ते मोडून काढण्यासाठी भारतालाच पुढाकार घ्यावा लागणार आहे. 'ऑपरेशन सिंदूर'ने त्याला हिरवी झेंडी दाखविली आहे. कुरुक्षेत्रावरील पान्च्यजन्यचा उद्घोष झाला आहे. भारतीय स्त्रीच्या कुंकवाला हात लावणाऱ्या, दाहिर कन्यांपासून तो काश्मीरच्या माता भगिनींच्या वस्त्राला हात घालणाऱ्या आणि तिला नग्न करून तिच्यावर उघडपणे बलात्कार करणाऱ्या दुःशासनी वृत्तीची शेवटची घटिका भरायला प्रारंभ झाला आहे. भगवान श्रीकृष्णांनी भगवद्गीतेत म्हटल्याप्रमाणे - 'मी लोकांचा संहार करणारा व वृद्धिंगत झालेला काळ आहे. या लोकांचा संहार करण्यासाठीच मी निघालो आहे.'

(अ.११, श्लोक ३२)

'ऑपरेशन सिंदूर' एक घटना नाही. केवळ एक प्रतिक्रिया नाही. त्याला विविध प्रकारचे भावनिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भविष्यकालीन दैवी संकेतांचे आयाम आहेत. त्या दृष्टीने त्याचा विचार होणे काळाची गरज आहे.
. ▮

(लेखक प्रसिद्ध कवी आहेत)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# शिवराज्याभिषेक!

महाराज, मानाचा मुजरा! राजे, 'यावत्चंद्र दिवाकरौ' आपल्या नावाचा जयघोष होत राहणार आहे. आम्हाला अभिमान आणि गर्वही आहे आम्ही याच महाराष्ट्राच्या मातीत जन्म घेतला, ज्या मातीला आपला पदस्पर्श होऊन ती सुगंधित झाली! महाराज तुमचा दराराच होता. तुम्ही बाणेदारही होता. आम्ही मात्र कर्मदरिद्री ठरतो आहोत. तुमच्या नावाचा जेवढा फायदा घेता येईल तेवढा ओरबाडण्याचा प्रयत्न आम्ही करतो आहोत. याशिवाय तुमच्या नावावर पोळी शेकण्याचा जो प्रयत्न होतो आहे न त्याच्या वेदना मातोश्री जिजामातांना जास्त होत असतील. (मुंबईची मातोश्री वर्षाच्या प्रेमात पडली.) त्यांनी तुम्हाला रयतेचे रक्षण करण्याची शिकवण दिली. दुर्दैवाने जनता आता निर्ढावली आहे. सोयरसुतक नावाची गोष्टच संपलेली आहे.

महाराज, आज तुमचा राज्याभिषेक दिन साजरा होतो आहे. आम्ही एवढ्या खालच्या पातळीवर गेलो की, ज्या सुवर्ण काळात आपल्याला राजसिंहासनावर बसवले गेले, त्यावेळी हे होते आणि ते नव्हते, याचेही राजकारण करतो आहोत. समर्थ रामदास स्वामी आपले गुरू नव्हतेच याचा प्रपोगंडा करण्यात एक जमात आता आक्रमक झाली आहे. दादोजी कोंडदेव यांचा पुतळा हटवून टाकण्यापर्यंत आमची मजल गेली आहे. निव्वळ राजकारण होते आहे महाराज आपल्या नावाच्या आड! आम्ही आतापर्यंत मुघलांचाच इतिहास शिकलो. आमच्या नवीन पिढीपुढे काय वाढून ठेवले आहे. अगदी या सीबीएससीवाल्यांच्या लेखी शिवाजी महाराजांचा इतिहास दोन-चार पानांचा तोही जास्त ठरावा! महाराज, आपण हिंदवी स्वराज्याची शपथ घेतली होती. आपण होता म्हणून आमच्या आया-बहिणींची अब्रू वाचली, आमची देवळं शाबूत राहिली. महाराज तुम्ही दैवीच होता... हिंदुस्थानसाठी सुरतही लुटली आणि दिल्लीचे तख्त हलवून ठेवले. आज त्याच दिल्लीच्या तख्तासाठी जी लाजीरवाणी चढाओढ लागली आहे त्याची कीव येते. परवा, त्या कन्हय्या कुमारने 'सिंदूर' मोहिमेवर केलेली टीका पाहून राजकारणाची पातळी किती गटार झाली, याची प्रचीती आली. महाराज तुमच्या काळाची आणि आजची तुलनाच होऊ शकत नाही. तरीही नतद्रष्टपणे तुलना करायची म्हटले तर तुम्ही 'राजे'च होता आणि आजचे 'राजकारणी!' आज ढासळलेले प्रशासन, भ्रष्टाचार हा शिष्टाचार झाला असून सरकारी कामात विलंब आणि अपारदर्शकता दिसून येते. शिवाजी महाराजांचे प्रशासन 'प्रजा' हेच परमेश्वर या तत्त्वावर होते तर आज सत्ता हीच प्राथमिकता (परमेश्वरापेक्षा जास्त) झाली आहे. मुस्लिम साम्राज्य असतानाही महाराज तुमच्या काळात स्त्रिया सुरक्षित होत्या, तुमचे कायदे कठोर होते. आज स्त्री असुरक्षित झाली आणि कायद्याला पुरावा लागू लागला. पुरावाही खोटा उभा होऊ लागला. शिक्षेला मानवाधिकाराचा आधार मिळाला आणि स्त्रियांनीही कायद्याचा दुरुपयोग सुरू केला. आपल्या राज्यात स्त्री सन्मान होता. आज स्त्री सन्मानासाठी झगडावे लागते आणि मिळालेला सन्मान पचवण्याची क्षमताही राहिलेली नाही. महाराज, आपल्या देशभक्तीविषयी काय लिहावे. पण, आज तुमच्या नावाने जे देशभक्तीचे तुणतुणे वाजवले जाते न तेव्हा 'याचसाठी होता अट्टाहास!' असे वाटून झिणझिण्या येतात. अगदी आपल्या नावाचा वापर करून 'मातोश्री'वरून मंत्रालयात पोहोचलेल्या उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे उदाहरण राज्यातील गढूळ राजकारणासाठी पुरेसे ठरावे. त्यांचे ते पिलांटू (मुख्यमंत्री फडणवीसांच्या शब्दात सकाळी ९ चा भोंगा) यांनी तर तुमचे नावही जीभेवर घेऊ नये एवढी जीभ विषारी आहे. महाराज, राज्यात तुमच्या नावाचा वापर करून सत्ता मिळवण्यात एक नंबरवर कोण असेल तर शिवसेना! बाळासाहेबांनी ते पावित्र्य जोपासले होते. पण, पुत्राला आणि पुत्राच्या पुत्राला ते जोपासता आले नाही. ज्यांचा जन्मच (राजकीय) तुमच्या नावाने झाला ते आज सर्व विसरले आहेत. त्यांनी आपल्या नावावर सत्ता प्राप्त केली आहे. पण, महाराज आपल्यातील एकही गुण त्यांनी अंगीकारला नाही. किमान, चांगल्याला चांगले म्हणण्याचा एवढा एक जरी गुण त्यांनी जोपासला असता तर कदाचित त्यांची आज ही वाताहत झाली नसती. पण, महाराज सत्तेच्या लोभात सर्वच पागल झाले आहेत. त्यात कोणाला एकालाच दोष देऊन होणार नाही. अन्यथा हे लिहिणेही एककल्ली होईल. केवळ (पंचांग) तिथीचा राग म्हणून महाराज आपली जयंतीही दोन वेळा साजरी केली जाते. एक कॅलेंडर आणि दुसरी तिथीने. योगायोगाने आज 'वेध' लिहीत असताना जागतिक पर्यावरण दिन साजरा होत आहे. महाराजांच्या काळात पर्यावरण राजशक्तीचा भाग होता. आज राजकारणात शक्ती खर्च होत आहे. आज पर्यावरणाचे संकट उभे झाले आहे. आपली गरज असताना वृक्षारोपण करण्याचे आवाहन सरकारला करावे लागते आहे. 'तरुण भारत'ने आपल्या शताब्दीत 'बीज अंकुरे अंकुरे' या अभियानातून आणि उद्यापासून वट पौर्णिमेचे औचित्य साधून 'वट रोपटे' वाटपाचे पवित्र्य कार्य हाती घेऊन पर्यावरणाचा संदेश दिला आहे. महाराज, आपली माफी मागतो... आम्ही आपली चरणरजही सांभाळू शकलो नाही ना आपले ध्येयधोरणं... आज राज्याभिषेकदिनी मोठमोठी भाषणं होतील, सेल्फी विथ महाराज होईल... महाराज, चुकतोय आम्ही, काहीतरी उणीव आहे. कोणाच्या तरी रूपात आपण मार्गदर्शन करायला या! तुम्ही पुन्हा जन्म घेऊन सुखासमाधानाने राज्याभिषेक सोहळा होईल असे दिवसं राहिलेले नाहीत. कालच नाही का झाला एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सुशिक्षितांचा आकांततांडव! असा तांडव नकोय आम्हाला; रजतेचे राज्य हवे महाराज रयतेचे... ▮

९८८१९०३७६५

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# 'मोदीभक्त' झाले शरद पवार

काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटक मृत्युमुखी पडले. महिलांच्या सांडलेल्या कुंकवाचा हिशोब पाकिस्तानला द्यावा लागेल, असे त्याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठणकावून सांगितले होते. त्या दिशेने 'ऑपरेशन सिंदूर' या नावाने चालवलेल्या लष्करी मोहिमेत अवघ्या काही तासांत पाकिस्तान गुडघ्यावर आला. भारताने तिसऱ्यांदा पाकिस्तानला आणि त्या रूपाने जगाला आपली ताकद दाखवली. मात्र, आपल्या देशातले काही विरोधी नेते यातही राजकारण शोधत आहेत. पहलगाम आणि त्या घटनेनंतरच्या युद्धात काय झाले? यावर त्यांना चर्चा हवी आहे. त्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलवा, अशी मागणी करणारे पत्र या टोळीने पंतप्रधान मोदींना लिहिले आहे. या पत्रावर प्रमुख विरोधी नेत्यांच्या सह्या आहेत. मात्र, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे सुप्रीमो शरद पवार यांनी सही करायला नकार दिला आहे. लोकसभेतले विरोधी नेते राहुल गांधी यांना हा मोठा झटका आहे. पहलगामच्या आडून मोदी सरकारला टार्गेट करायचं विरोधकांचं षडयंत्र होतं. सुरुवातीपासून राहुल गांधींनी त्या दिशेने दबाव आणणे सुरू केले होते. मात्र, शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ विरोधी नेत्यानेच या षडयंत्राला बत्ती दिली. युद्धासारख्या संवेदनशील विषयावर उघड चर्चा करणे धोक्याचे आहे, अशी भूमिका शरद पवारांनी घेतली आहे. फार फार तर या मुद्यावर सर्वपक्षीय बैठक होऊ शकते, असे त्यांचे म्हणणे होते. पण विरोधकांना देशाच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील अशा या विषयावरही राजकारण करायचे आहे, हे आता लपून राहिलेले नाही. पवारांनीच विरोधकांचे कान टोचले हे योग्यच झाले. पवारांची ही भूमिका साधी नाही; विरोधकांनी चालवलेल्या स्वार्थी राजकारणाचा बुरखा फाडणारी आहे. 'इंडिया आघाडी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विरोधी पक्षांच्या या आघाडीच्या नजीक भविष्यात चिंधड्या उडालेल्या आपल्याला पाहायला मिळतील. शरद पवार विरोधी आघाडीतून बाहेर पडल्यात जमा आहेत. विरोधकांची ही आघाडी बनवण्यासाठी पुढाकार घेणारे शरद पवारच आज वेगळी भूमिका घेत आहेत. याचा अर्थ काय घ्यायचा? शरद पवार 'एनडीए'मध्ये जाणार का? दोन्ही राष्ट्रवादी पक्षांचे विलीनीकरण होणार आहे का? तसे होणार नसेल तर मग त्यांच्या राष्ट्रवादीचे काय? त्यांच्या पुतण्याच्या राष्ट्रवादीचे काय? त्यांचा 'हनुमान' खासदार संजय राऊत कुठे जाणार? घाई गडबडीने तसे काहीही होणार नाही. या 'काका'कडे खूप संयम आहे. ते इतरांचा संयम बघतील. पवारांनी



१९९९ मध्ये स्थापन केलेल्या राष्ट्रवादी पक्षाचा येत्या १० जूनला वर्धापन दिन आहे. काका-पुतण्या दोघेही आपापल्या राष्ट्रवादीचे वेगवेगळे वर्धापन दिन साजरा करीत आहेत. याचा अर्थ एवढ्यात पवारांचा मोठा निर्णय नाही. पण त्यांना निर्णय करावा लागेल. त्यांच्या पक्षाचे आठ खासदार आणि १० आमदार निवडून आले आहेत. पुतण्याकडे ४१ आमदार आहेत. पुतण्याने थेट भाजपामध्ये उडी घेऊन काकाला मात दिली. हल्लीचे राजकारण हे सत्तेचे झाले आहे. लोकांची कामं करायची म्हटले तर सत्तेच्या जवळ गेले पाहिजे, हे आजच्या राजकारणाचे कटू वास्तव आहे. पुतण्या काकांपेक्षा 'स्मार्ट' निघाला. पुतण्याने ते लवकर ओळखले. काहींचे म्हणणे वेगळे आहे. 'काकाने पुतण्याला आधी पाठवले. काका लवकरच सत्तेसोबत दिसतील.' तसे होईलही; पण मग घोडं अडलं कुठं? धक्कातंत्रासाठी पवार प्रसिद्ध आहेत. तसे झाले तर लोकसभेतील एनडीएचे संख्याबळ ३०१ वर पोचेल. पण 'इंडिया' बनवणारे शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यासाठी महाविकास आघाडी नावाची गाजराची पुंगी बनवणारे शरद पवार आज एकदम मोदीभक्त कसे बनले? विरोधकांनाच नव्हे तर भाजपावाल्यांनाही हा प्रश्न पडत असणारच. मग मोदींनी अशी कुठली जादू केली की, कालपर्यंत या 'शिष्या'ला फटाके लावणारे शरद पवार आज अचानक 'गुरू'ची आरती करू लागले. शरद पवार ५० वर्षांहून अधिक काळापासून राजकारणात आहेत. 'याला पाड, त्याला लंबा कर' या पलीकडे पवारांनी राजकारण केल्याचे जुन्या लोकांना आठवत नाही. पण आपल्या याच 'गुणां'च्या जोरावर महाराष्ट्राला नाचवणाऱ्या या मराठा नेत्याला मोदींनी रक्ताचा एकही थेंब न सांडता जिंकले. मोदींना अख्खे जग सलाम का करते ते यावरून ओळखा. मोदींनी पवारांची कमजोरी हेरली. पवारांच्या मनातला हळवा कोपरा शोधला. मग काय, एका फटक्यात पवार मोदीभक्त झाले. पवारांनी अनेकांना बनवले, अनेकांना संपवले. पण एवढ्या वर्षांत ते आपल्या मुलीला प्रस्थापित करू शकले नाहीत. आजही सुप्रिया सुळे या पवारांची कन्या म्हणूनच दिल्लीच्या दरबारात ओळखल्या जातात. मुलींसाठी आपण काहीही करू शकलो नाही म्हणून पवारांना त्यांच्याकडील पित्याचे मन खातंय, हे मोदींनी नेमकं ओळखलं. पवार आज ८५ वर्षांचे आहेत. पुढची लोकसभा निवडणूक येईल तेव्हा पवार ८९ वर्षांचे असतील. थकलेले असतील. राज्यसभा लढतो म्हटले तरी त्यांच्याकडे तेवढे आमदार आहेत कुठे? मग काय? ते तर मोदी आहेत. 'ऑपरेशन सिंदूर' प्रकरणात भारताची भूमिका मांडण्यासाठी मोदींनी जगभर ६-७ शिष्टमंडळं पाठवली. त्यात एक शिष्टमंडळ सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वात गेले होते. सुप्रिया सुळेंनी लोकसभेच्या चार निवडणुका जिंकल्या आहेत, संसदरत्न पुरस्कार पटकावले आहेत. पण मोदींनी सुप्रिया यांना ज्या पद्धतीने ओळखले तसे काँग्रेसवाले ओळखू शकले नाहीत. काँग्रेसनेही देशावर राज्य गाजवले. मात्र सुप्रिया सुळेंना एवढा सन्मान कधी मिळाला नाही. काँग्रेसवाले सुळेंना जगापुढे सादर करू शकले नाहीत. मोदींनी एका राजकारणी पित्याचं हळवं दुःख हेरलं आणि आज आपण राजकारणच बदललेलं पाहतो आहे. मोदीच हे करू शकतात. उद्या सुप्रिया सुळे केंद्र सरकारमध्ये मोदींच्या मंत्री झाल्या तर आश्चर्याचा धक्का नको. मोदींची काम करण्याची ही शैली आहे. त्या जोरावर शरद पवार आता मोदी सैन्याचे अलिखित सैनिक झालेले दिसतील. लगेच हे बदल दिसतील अशातला भाग नाही; पण हे होणार आहे. राजकारण झपाट्याने बदलतं आहे. दोन पक्ष म्हणजे काका-पुतण्या एकत्र आले तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे भवितव्य काय असेल? कल्पनाही करवत नाही. यावेळी काँग्रेस त्यांना जवळ करणार नाही. शरद पवार तर दारात उभे करणार नाही. भाजपाने तर त्यांचे दोर मागेच कापून टाकले आहेत. उबाठा हा 'एक्स्पायरी डेट' गेलेला पक्ष झाला आहे. विधानसभेत उबाठा म्हणजे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अवघे २० आमदार निवडून आले आहेत. उद्धव ठाकरे यांनी भाजपाची संगत सोडली आणि अवघ्या पाच वर्षांत त्यांच्या पक्षाला वाईट दिवस सुरू झाले आहेत. स्वतःला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करा यासाठी ठाकरे यांनी खूप आदळआपट केली. ते जमले नाही. आज तर चेहरा लपवण्याची वेळ येऊ घातली आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उबाठाचा सोक्षमोक्ष लागलेला असेल. 'भोंगा' वाजणार नाही. संजय राऊत कामाच्या शोधात फिरताना दिसतील. ▮

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### अपात्र बहिणींना वाटलेला पैसा वसूल करा

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी आलेले अर्ज पडताळण्यासाठी पुरेसा वेळ न मिळाल्याने सरकारी नोकरी असलेल्या, वार्षिक उत्पन्न अडीच लाखांहून अधिक असलेल्या आणि चारचाकी गाडी असलेल्या महिलांनीही या योजनेचा लाभ घेतला. या योजनेचा लाभ सर्वांनाच देण्याची चूक झाली अशी कबुली राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील एका कार्यक्रमात दिली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सरकारने जे निकष ठरवले होते त्या निकषात न बसणाऱ्या ज्या महिलांनी या योजनेचा लाभ घेतला त्यांना दिलेले पैसे परत घेतले जाणार नाहीत तसेच त्यांच्यावर कारवाईही केली जाणार नाही असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. पण आता काही महिलांनी या योजनेचा लाभ नको म्हणून अर्ज केले आहेत, तर अपात्र बहिणींकडून रक्कम वसूल केली जाईल, असे शासनाने म्हटले आहे. या योजनेसाठी सरकारने जे निकष ठरवले होते त्या निकषात बसणाऱ्या महिलांनीच खरेतर योजनेसाठी अर्ज करणे अपेक्षित होते; मात्र सरकारी सेवेत गलेलठ्ठ वेतन घेणाऱ्या, घरात मोलकरीण ठेवणाऱ्या, चारचाकी गाडीतून फिरणाऱ्या महिलांनीही या योजनेंतर्गत अर्ज करून या योजनेचा गैरफायदा घेतला. ही केवळ सरकारचीच फसवणूक नसून देशाच्या विकासासाठी आपल्या मिळकतीमधून कररूपाने सरकारला धन देणाऱ्या प्रत्येक सामान्य नागरिकाची फसवणूक आहे. त्यामुळे अशा महिलांवर कारवाई करून त्यांच्याकडून दंडासह रक्कम वसूल करायला हवी. जनतेची आणि सरकारची फसवणूक करणाऱ्या महिलांचे लाड सरकारने का करावेत?

**जगन घाणेकर**/ ९६६४५५९७८०

● ● ● ●

### शिक्षण सुसह्य करावे

दहावी आणि बारावी परीक्षेचा निकाल नुकताच लागला. बारावी उत्तीर्ण विद्यार्थी चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळावा यासाठी धडपडत आहेत तर दहावी उत्तीर्ण विद्यार्थी आणि पालक अकरावीत कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा यासाठी काथ्याकूट करीत आहेत. दहावीत असताना अनेक विद्यार्थ्यांनी

## वाचक पत्रे

कल चाचणी दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा कल कोणत्या बाजूने आहे याचा अंदाज विद्यार्थी, पालक, शिक्षकांना आला आहे. असे असतानाही विद्यार्थ्यांच्या पुढील प्रवेशासाठी पालकांची संभ्रमावस्था कायम आहे. कारण आपल्याकडे शिक्षणाचा संबंध नोकरी, व्यवसायाशी जोडला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आवडीपेक्षा भविष्यात विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देतील असाच अभ्यासक्रम निवडण्याकडे पालकांचा कल असतो. अशा अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळावा यासाठी प्रचंड स्पर्धा लागते. त्यासाठी मग प्रवेश फेऱ्यांचे सत्र सुरू होते. प्रवेश मिळेपर्यंत विद्यार्थी व पालक प्रचंड तणावात असतात याचा फायदा घेऊन महाविद्यालये त्या अभ्यासक्रमासाठी मोठी शुल्कवाढ करतात. या सर्वांमध्ये विद्यार्थी अगतिक तर पालक हवालदिल होतात हे चित्र दरवर्षी पाहायला मिळते. दहावी, बारावी उत्तीर्ण विद्यार्थी आपल्या भविष्याचे सुखद स्वप्न पाहत असतात. त्यांच्यासाठी मात्र हे दुःस्वप्न ठरते. हे चित्र बदलण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यायला हवा. त्यासाठी सर्वांना मान्य होईल अशी प्रवेश व्यवस्था असायला हवी.

**श्याम ठाणेदार**/ ९९२२५४६२९५

● ● ● ●

### शेतातील बैलजोडीची जागा घेतली ट्रॅक्टरने

काळाच्या ओघात शेतीमध्ये अनेक बदल घडून आले आहेत. पारंपरिक शेती पद्धती, त्यात वापरले जाणारी अवजारे आणि विशेषतः बैलजोडी हे शेतीचं हृदय मानलं जायचं. मात्र आधुनिक काळात तंत्रज्ञानाने आपल्या पद्धती झपाट्याने बदलल्या असून, आज बैलजोडीच्या जागी ट्रॅक्टर दिसतो आहे. या बदलाचे सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही पैलू आहेत. ट्रॅक्टर आल्यामुळे शेतीत अर्थात यांत्रिकीकरणाची लाट आली. श्रमबळाची गरज कमी झाली, वेळेची बचत झाली आणि उत्पादकतेतही वाढ झाली. एकेकाळी ज्या कामांसाठी दिवस खर्च व्हायचा ती कामे आज काही तासांत ट्रॅक्टरच्या साहाय्याने पूर्ण होतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा झाली आहे. विशेषतः मोठ्या जमिनीवर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना ट्रॅक्टर हे एक वरदानच ठरले आहे. बैलजोडीची गरज कमी झाल्यामुळे पारंपरिक पशुधन व्यवस्थापनावर परिणाम झाला आहे. बैलांशी निगडित असलेल्या अनेक व्यवसायांना उदा. बैलांची खरेदी-विक्री, त्यांचं पोषण, गवंडी, सुतार, लोहार यांना मागणी कमी झाली. यामुळे पारंपरिक ग्रामीण अर्थव्यवस्थेतील काही घटक अडचणीत आले आहेत. शिवाय, ट्रॅक्टर हे महागडे साधन आहे. लहान शेतकऱ्यांना ते खरेदी करणे शक्य नसायचे. त्यामुळे शेतीत असमानता वाढण्याची शक्यता आहे. ट्रॅक्टरसाठी डिझेलची आवश्यकता असल्याने इंधनखर्च आणि प्रदूषण या समस्याही वाढतात. बैलजोडी जरी वेळखाऊ असली तरी ती पर्यावरणपूरक व पारंपरिक जीवनशैलीशी सुसंगत होती. म्हणूनच, ट्रॅक्टरने जरी बैलजोडीची जागा घेतली असली, तरी त्या बदलाशी निगडित समस्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आधुनिकतेचा स्वीकार करताना परंपरेतील शहाणपण जपण्याचा प्रयत्न करायला हवा. ▮

**सागर पिंगळे**/ ७७५६८३६०९१

● ● ● ●

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक : विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# शेतातील घरावर चोरट्यांचा सशस्त्र दरोडा, ७ लाखांचा ऐवज लंपास

## सेनगाव तालुक्यातील घोरदरी येथील घटना, एकजण जखमी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जून**

सेनगाव तालुक्यातील घोरदरी येथील माणिक साबळे यांच्या घराचे कुलूप तोडून शुक्रवारी पहाटे चौघांनी घरात अनधिकृतपणे प्रवेश करीत आवाज केला तर जीवे मारून टाकू, चुपचाप पेटीची चावी द्या अशी धमकी देत पेटीतील रोख रक्कम आणि सोन्या चांदीचे दागिने असा ७ लाखांचा ऐवज चोरट्यांनी पळविला. एकाच चोरट्याच्या हातात बंदुक असल्याचे सांगण्यात आले असून या घटनेमुळे सेनगाव तालुक्यात खळबळ उडाली आहे. मारहाणीत साबळे कुटुंबातील एक व्यक्ती जखमी झाली असून त्यांच्यावर हिंगोली येथे उपचार सुरू आहेत. याप्रकरणी सेनगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, सेनगाव तालुक्यातील घोरदरी येथे माणिक साबळे यांचे बारा एकर शेत आहे. गावालगत असलेल्या शेतातच त्यांचे घर आहे. या ठिकाणी माणिक साबळे हे त्यांची पत्नी, मुले आणि सुना यांच्यासह राहतात. दि ५ जून रोजी माणिक यांनी शेतीमाल विक्रीचे साडेतीन लाख रूपये आणले होते. सदर रक्कम त्यांनी घरातील पेटीमध्ये ठेवली होती. या पेटीतच त्यांच्या कुटुंबातील महिलांचे दागिनेही होते.

दरम्यान, गुरूवारी रात्री जेवण करून सर्वजण झोपल्यानंतर पहाटेच्या सुमारास अचानक वीज पुरवठा खंडीत झाला. त्यानंतर काही वेळातच चौघेजण घराजवळ आले. त्यांनी घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर एकाने बंदुक काढली तसेच इतरांनी चाकु काढले. आवाज केला तर एकेकाला खतम करून टाकेल अशी धमकी दिली. परंतु माणिक यांचा मुलगा अशोक याने चोरट्यासोबत झटापटीचा प्रयत्न केला. यामध्ये त्यांच्या हाताला चाकु लागल्याने ते गंभीर जखमी झाले. यावेळी चोरट्यांनी सर्वांनाच धमकी देऊन शांत केल्यावर माणिक यांच्या जवळून पेटीची चावी घेतली. त्यात ठेवलेले साडेतीन लाख रूपये रोख व महिलांचे दागिने असा एकूण ७ लाखांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला.

सकाळी माणिक यांनी सेनगाव पोलिस ठाणे गाठून घटनेची माहीती सेनगाव पोलिस ठाण्यात दिली. अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील, सेनगावचे सपोनि दिपक मस्के, शिवसांब घेवारे, जमादार सुभाष चव्हाण, टी के वंजारे यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केल्यानंतर श्वान पथकाला पाचारण केले तसेच ठसे तज्ज्ञ देखील घटनास्थळी दाखल झाले आहेत. श्वान पथकाला चोरट्यांचा माग काढता आला नाही. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमध्ये जखमी झालेल्या अशोक साबळे यांना उपचारासाठी हिंगोली येथील शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणात पोलिसांनी तातडीने चार पथके स्थापन करून चोरट्यांचा माग काढण्याचे प्रयत्न चालू केले असून काही संशयितांची चौकशी केली जाणार असल्याचे सुत्रांनी सांगितले. या घटनेच्या वेळीच वीज पुरवठा कसा खंडीत झाला. चोरट्यांनी पेटीचीच चावी कशी काय मागितली याबाबत पोलिस चौकशी करीत आहे.

दोन दिवसांपूर्वीच सेनगाव तालुक्यातील वटकळी येथील पत्रकार रामेश्वर पोले यांच्यासह त्यांच्या मित्रावर वाळू माफीयांनी दुचाकी रस्त्यात अडवून तलवार आणि लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केला. सेनगाव तालुक्यात अवैध वाळू उपसा प्रकरणी त्यांनी बातमी प्रसारीत केली होती. सेनगाव पोलिसांचे अवैध धंद्यांकडे होत असलेले दुर्लक्ष याचे प्रमुख कारण मानले जात आहे. तालुक्यातील गावागावात अवैध दारू विक्री होत आहे. जागोजागी जुगार अड्डे, मटक्याचे अड्डे आणि अवैध गुटखा विक्री मोठ्या प्रमाणावर होत आहे. परिणामी गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. नुकतेच वसमत विधानसभेचे आ. राजु नवघरे यांनी वसमत तालुक्यात गावोगावी अवैध दारू विक्री होत असून यामुळे अल्पवयीन मुले आणि तरूण व्यसनाधीन होत असल्याची तक्रार पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचेकडे केली होती. जिल्ह्यात अवैध धंद्यांना राजकीय वरदहस्त मिळत असल्याने पोलिस विभागाला दबंग कारवाई करतांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

# जबरी चोरीतील आरोपींना २४ तासांत पकडून मुद्देमाल केला हस्तगत

## नर्सी नामदेव पोलिसांची कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जून**

सेनगावकडून हिंगोलीकडे दुचाकीवर येत असतांना तीनजणांनी ब्रम्हपुरी पाटीजवळ दुपारी तीनच्या सुमारास त्यांची दुचाकी आडवी लावून फिर्यादीकडील रोख रक्कम, अंगठी व मोबाईल हिसकावून पोबारा केला. याप्रकरणी नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर नर्सी पोलिसांच्या पथकाने २४ तासात आरोपींना अटक करीत त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार प्रभाकर देशमुख वय ७३ रा घोटादेवी हे सेनगावकडून हिंगोलीकडे त्यांच्या दुचाकीवर दि ४ जून रोजी येत असतांना दुपारी ३ च्या सुमारास ब्रम्हपूरी पाटीपासून १०० मिटरच्या अंतरावर आरोपी रामा बाबुराव राऊत, राजेश प्रभाकर पवार, प्रतीक राजेश शेळके यांनी देशमुख यांच्या दुचाकीसमोर त्यांची दुचाकी आडवी लावून देशमुख यांचेकडील रोख दोन लाख व १५ हजार रूपये किंमतीचा मोबाईल जबरी चोरीने हिसकावून घेत पोबारा केला. या प्रकरणी देशमुख यांनी नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात दिलेल्या फियादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी भुसारे यांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून नर्सी नामदेव पोलिस ठाण्याचे सपोनि अशोक घारगे व त्यांचे पथक उपनि नागोराव जाधव, जमादार शैलेश चौधरी, किरण चव्हाण, कळंबे, महाजन, राजु पोले यांना कसून चौकशी करण्याचे आदेश दिले. पथकाने चोवीस तासात आरोपींच्या मुसक्या आवळल्या. आरोपीकडून ८३ हजार रूपये रोख, ७ ग्रॅम वजनाची अंगठी, १५ हजाराचा मोबाईल असा एकूण एक लाख सहासष्ट हजार रूपयांचा मुद्देमाल तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त केली आहे.

# शहरात विविध ठिकाणी शिवराज्यभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जून**



शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात पुतळा समिती व सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती हिंगोली या वतीने शिवराज्याभिषेक दिन सोहळा साजरा करण्यात करण्यात आला.

यावेळी त्र्यंबकराव लोंढे व प्रा. विकास कल्याणकर यांनी शिवराज्याभिषेक दिनाचे महत्व यावर आपले विचार मांडले, या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव चव्हाण, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे, खंडेराव सरनाईक, त्र्यंबकराव लोंढे, शिवाजीराव ढोकर पाटील, राजकुमार वायचाळ, माजी जि प सदस्य ॲड अमोल जाधव, प्रा.विक्रम जावळे, प्रल्हाद शिंदे, माणिकराव देशमुख, ज्योतीताई कोथळकर, कांताताई कल्याणकर, साधनाताई हेंबाडे, अरुणा अंभोरे, पंडित अवचार, हरिभाऊ मुटकुळे, पंडित सिरसाट, बाबाराव शृंगारे, गोपाल सरनायक, परसराम हेंबाडे, बळीरामजी कल्याणकर, विश्वास वानखेडे, विकास कल्याणकर, शिवराज सरनाईक, महेश राखोंडे, गजानन हाके, गजानन जाधव व मोठ्या प्रमाणावर शिवप्रेमी उपस्थित होते.

येथील जिल्हा परिषदेतही मोठ्या उत्साहात शिवराज्यभिषेक सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, अनंतकुमार कुंभार, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्यासह सर्व विभागांचे विभाग प्रमुख तसेच कर्मचारी उपस्थित होते.



**हिंगोली– हवामान खात्याने येत्या काही दिवसांत मराठवाड्यात पावसाची शक्यता असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त झाले असून शेतीस लागणारी विविध प्रकारची साहीत्य बाजारात विक्रीसाठी आली असून शेतकरी खरेदी करतांना दिसत आहेत. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पर्यावरण दिनानिमित्त जैवीक बांधाची निर्मिती



हिंगोली– जागतिक पर्यावरण दिनानिमित युवकांना जैविक बांध विषयी माहिती देऊन संस्थेच्या परिसरामध्ये करवंदाची लागवड करून जैविक बांध तयार करण्यात आला. त्याच बरोबर पर्यावरण मंत्रालय यांच्या कडून राबविण्यात येत असलेल्या एक पेड मां के नाम कार्यक्रमांतर्गत युवकांनी एक एक झाड लावून झाडाचे पालकत्व स्वीकारले आहे. यावेळी उगम संस्थेचे कार्यकर्ते व युवक उपस्थित होते तसेच अध्यक्ष जयाजी पाईकराव, व्यवस्थापक विकास कांबळे, शीतल कांबळे, दिशांत पाईकराव, धनंजय पडघन, विकास जाधव, सागर, ओंकार भालेराव, बालाजी मोर उपस्थित होते.

### १० जूनपर्यंत स्वाधार योजनेतील त्रुटी पूर्तता करावी

हिंगोली– भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून ऑनलाईन पध्दतीने विभागाच्या संकेतस्थळावर दि. १५ मार्च, २०२५ पर्यंत स्वीकारण्यात आले होते. विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या अर्जाची तपासणी कार्यालयाकडून करण्यात आली आहे. यामध्ये ज्या विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी आहेत. त्यांनी ऑनलाईन पध्दतीने त्रुटीची पूर्तता करुन अर्ज फेरसादर करण्यासाठी १० जून, २०२५ पर्यंत अंतिम मुदत दिली आहे. विहित मुदतीत त्रुटीची पूर्तता करुन अर्ज ऑनलाईन फेर सादर न केल्यास अर्ज अपात्र, बाद ठरतील. तसेच विद्यार्थ्यांसाठी बँक खाते भरण्याबाबतचा टॅब उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांचे बँक खाते तपशील भरुन घेण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी. विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्जातील त्रुटी पूर्ण करण्यात तसेच बँक खाते भरण्यास अडचण येत असल्यास सहाय्यक आयुक्त , समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

### औंढा पं स मध्ये शिवराज्यभिषेक दिन साजरा

हिंगोली–औंढा येथील पंचायत समितीच्या कार्यालयात शिवराज्याभिषेक दिन शुक्रवार (दि.६) जून रोजी साजरा करण्यात आला. यावेळी शिवराज्याभिषेक गुढी उभारून महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे, सहाय्यक गटविकास अधिकारी बालाजी गोरे, विस्तार अधिकारी शेख जमीर, राधेशाम परांडकर, संतोष काळे, मनोहर तुमराम, अक्षय बगाटे, एस इंगोले, गजानन वाघमारे, अंबादास कुहिरे, नितीन हजारे, दत्ता सूर्यवंशी, रमेश फोपसे, पांडुरंग सूर्यवंशी, शिवाजी टोम्पे, नागनाथ राऊत, मारोती दराडे, पिराजी हाके, नागेश भोजे यांच्यासह पंचायत समितीमधील कर्मचारी उपस्थित होते.

# हिंगोलीत राष्ट्रवादीची आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जून**



येथील शासकीय विश्रामगृह राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बि. डी. बांगर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आमदार राजू नवघरे यांच्या नेतृत्वात कार्यकर्ता आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये जिल्ह्यातील जिल्हा कार्याकारणी, संपूर्ण सेलचे जिल्हाध्यक्ष त्यांची कार्यकारणी हिंगोली शहराचे शहराध्यक्ष आणि त्यांची कार्यकारणी संपूर्ण तालुक्याचे तालुकाध्यक्ष आणि त्यांची कार्यकारणी तसेच विविध सेवा अधिनियमानसार स्थापित असलेल्या संघटनेचे अध्यक्ष आणि त्यांचे कार्यकारणी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी संघटनात्मक बांधणी, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तसेच इतर विषयांवर आ. नवघरे यांनी मार्गदर्शन केले. तसेच दि १० जून २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिना निमित्ताने जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने पुणे येथे उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दौरा नियोजित करण्यात आलेला आहे. या दौऱ्याच्या निमित्ताने विशिष्ट पक्ष प्रवेश सुद्धा ठेवण्यात आलेले आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये हिंगोली, वसमत, कळमनुरी नगरपालिका व जिल्हा परिषद हिंगोली आणि पाचही तालुक्यातील पंचायत समितीच्या निवडणुकी संदर्भामध्ये पूर्वतयारी करून बुथ कमिटीसाठी संपूर्ण सदस्यांची नोंदणी करून पदाधिकाऱ्यांना संपूर्ण जागा लढवण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीचे सूत्रसंचालन ॲड विजय राऊत यांनी केले तर आभार संजय दराडे यांनी मानले.

# विकसित कृषी संकल्प अभियान औंढा तालुक्यात उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जून**

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व कृषी विज्ञान केंद्र तोंडापुर, जि. हिंगोली अंतर्गत विकसित कृषी संकल्प अभियान कार्यक्रम औंढा नागनाथ तालुक्यातील असोला, कोंडशी व वडद या गावांमध्ये उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे सनियंत्रक कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. पी. पी. शेळके यांनी विकसित कृषि संकल्प अभियान भेटीचा मुख्य उद्देश खरीप हंगामाच्या पूर्व तयारीमध्ये मदत करणे, शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेणे आणि शासनाच्या योजनांची माहिती देत शेतकऱ्यांच्या शंकेचे निरासन केले. तसेच त्यांनी नैसर्गिक शेतीचे महत्व, हवामान आधारित पिक सल्ला घेउन शेतकऱ्यांनी शेती करावी, असे सांगितले.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी विविध योजनांची माहिती देताना नैसर्गिक शेतीचे महत्व सांगितले. शास्त्रज्ञ डॉ. ए. तिरुग्नानवेल यांनी प्रमुख मार्गदर्शन करतांना लिंबूवर्गीय पिकांचे लागवड तंत्रज्ञान, योग्य वेळेवर खत व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन, फवारणी करतांना घ्यावयाची काळजी याची माहिती देऊन शेतकऱ्यांच्या शंकेचे निरसन केले. प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुरजित मंडल यांनी माती नमुना कसा घ्यावा, त्याचे महत्त्व, माती परीक्षण नुसार खत व्यवस्थापन या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. परभणी येथील पशुवैद्यक आणि पशु विज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सईद अली यांनी पावसाळ्यात जनावराची घ्यावयाची काळजी, एकात्मिक पद्धतीने कीड व रोग व्यवस्थापन, गोठ्याची स्वच्छता व स्वच्छ दुध उत्पादन विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. प्राध्यापक डॉ. एस.एच. सारंग यांनी विद्यापीठाचे नवीन विकसित केलेले सोयाबीन व तूर पिकाच्या वाणाची माहिती व या पिकाचे उत्पादन तंत्रज्ञान, बीज प्रक्रियाचे महत्व सर्वांना अवगत करून दिले. इफकोचे वरिष्ठ मार्केटींग व्यवस्थापक डॉ. शिवाजी पोवार यांनी इफकोचे उद्देश, शेती मध्ये नॅनो युरिया, डी.ए.पी. वापरण्याची पद्धत व प्रमाण या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

# बकरी ईन निमित्ताने हिंगोली शहरातील वाहतुकीच्या मार्गात बदल

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, ६ जून**

मुस्लीम बांधवांच्या बकरी ईद निमित्त शहरातील औंढा रोडवरील ईदगाह येथे हजारोंच्या संख्येने मुस्लीम बांधव नमाज अदा करणे करिता एकत्र येणार असल्याने मोठी गर्दी होणार आहे. सदर ठिकाणी गर्दी जमल्याने रहदारीस अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्या करिता दि ७ जून रोजी सकाळी ७ ते १० वाजेपर्यंत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३६ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये शहरातील वाहतुकीच्या मार्गात बदल केला आहे.

बकरी ईदनिमित्त येथील औंढा रोडवरील ईदगाह मैदानावर नमाज अदा करण्यासाठी मोठ्या संख्येने मुस्लीम बांधव एकत्र येतात. त्यामुळे नांदेड नाका, एनटीसी गेट, बस स्टँड पूर्वेकडील गेट, बावन खोली रोड, संभाजी विद्यामंदिर शाळेजवळील रोड, येथून ईदगाह कडे जाणारी वाहतुक पूर्णपणे बंद राहणार आहे. तसेच कयाधू नदी ते नांदेड नाका कडे जाणारा रोड वाहतुकीकरिता पूर्णपणे बंद राहणार आहे.

नर्सी टी पॉईंट, खटकाळी बायपास, अकोला बायपास येथून हिंगोली शहरात येणारे सर्व अवजड वाहनास प्रवेश बंदी करण्यात आली आहे. तर हिंगोली शहरातून औंढा आणि सेनगाव कडे जाण्याकरिता इंदिरा चौक, गांधी चौक, फुल मंडी, गोदावरी कॉर्नर, मेहराज उलुम मस्जिद, खाकीबाबा चौक, कयाधू नदी पूल, नर्सी टी पॉईंट मार्गे ये–जा करण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध करण्यात आला आहे. तसेच हिंगोली शहरातून नांदेडकडे जाणे करीता इंदिरा चौक, नांदेड नाका, रेल्वेगेट, खटकाळी बायपास, उमरा पाटी मार्गे वाहतुक करता येणार आहे. जड वाहतुक वाशिमकडून नांदेडकडे जाण्यासाठी अकोला बायपास ते खटकाळी बायपास मार्गे वळविण्यात आली आहे. नर्सीकडून येणारी जड वाहने नर्सी टी पॉईंट वरून औंढा मार्गे ये–जा करता येणार आहे, अशी माहीती पोलिसांनी दिली आहे.

# नगर पालिकेच्यावतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जून**



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हिंगोली नगर पालिकेच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचेहस्ते वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी सिंगल युज प्लास्टीक प्रदूषण निर्मुलन करण्याचे आवाहन करण्यात आले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात पर्यावरणाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी ५० झाडांचे वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी गुप्ता यांनी सांगितले की, झाडे लावणे ही काळाची गरज आहे त्यामुळे वसुंधरेचे तापमान आटोक्यात येण्यास मदत मिळणार आहे. ऑक्सिजन मिळेल. तसेच प्लास्टीकचे उत्पादन, साठवणुक व वार यावर संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे. नागरिकांनी प्लास्टीकचा वापर करू नये व पर्यावरणाचा ऱ्हास होण्यापासून वाचविणे करिता योगदान द्यावे. हे काम नागरिकांच्या सहकार्याशिवाय होऊ शकत नाही.

यावेळी सहआयुक्त प्रदीप जगताप, उपमुख्याधिकारी शाम माळवटकर, उपमुख्याधिकारी प्रकाश साबळे, सचिन पवार, प्रदीप मोहकर, लेखापाल अनिकेत नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, संदीप घुगे आदींची उपस्थिती होती.

# अनुसूचित जमाती आयोग स्थापनेस मान्यता हा ऐतिहासिक निर्णय : आ. केराम




**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि.०६ जून -**

गुरुवारी पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने महाराष्ट्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्यास मान्यता दिली असून, हा निर्णय म्हणजे आदिवासी समाजाच्या न्याय हक्कासाठी निर्णायक वाटचाल ठरणार असल्याची प्रतिक्रिया आमदार भिमराव केराम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ. अशोक ऊईके यांच्या प्रयत्नामुळे हि मागणी प्रत्यक्षात उतरली आहे. या आयोगाला वैधानिक दर्जा देण्यात आला असून, यात एक अध्यक्ष व चार अशासकीय सदस्यांचा समावेश राहणार आहे. आयोगाच्या कार्यासाठी २६ पदांची निर्मिती, कार्यालयीन जागा, कर्मचारी, आवश्यक सुविधा आणि यंत्रणा उभारण्यासाठी ४.२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आयोगाच्या स्थापनेमुळे अनुसूचित जमातीच्या प्रश्नावर थेट निर्णय घेता येणार आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, जमीन, पाणी, रहिवास आणि विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. हा आयोग केवळ एक प्रशासकीय यंत्रणा न राहता तो लाखो आदिवासी बांधवांचा आवाज आणि आधार बनणार आहे. महाराष्ट्रातील आदिवासी समाजासाठी शुक्रवारचा दिवस हा एक ऐतिहासिक टप्पा ठरला असून, अनेक पिढ्यांपासून साठवलेली एक मोठी अपेक्षा प्रत्यक्षात उतरली असल्याचे आमदार भिमराव केराम यावेळी म्हणाले. या पत्रकार परिषदेस माजी आमदार अमर राजूरकर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष डॉ.संतुक हंबर्डे, ॲड.किशोर देशमुख, कार्यकारीणी सदस्य चैतन्यबापू देशमुख, ॲड. दिलीप ठाकुर, यंकर मनाळकर आदींची उपस्थिती होती.

# तीन सराईत आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि.०६ जून -**

दरोडा आणि इतर गंभीर गुन्ह्यातील तीन सराईत आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सन २०२४ मध्ये १३ सराईत गुन्हेगारांना स्थानबध्द करण्यात आले आहे. चालू वर्षामध्ये दहा जणांना स्थानबध्द करण्यात आले आहे. तसेच २०२४-२५ मध्ये ८७ गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले. तर चालू वर्षात दहा जणांना हद्दपार करण्यात आले आहे. त्यानुसार शहरातील दत्तनगर येथील गंगासागर उर्फ माया राघविंदर माथेकर, राघविंदर उर्फ राजू अशोक माथेकर व महंमद असिफ अली महंमद अस्लम या तीन जणांवर शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये सशस्त्र दरोड्याचा गुन्हा दाखल होता. तपासात हे आरोपींनी गुन्हा केल्याचे सिध्द झाले. त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेत बाधा पोहंचत असल्याने या तिघांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी हा प्रस्ताव मंजूर करण्याबाबतची शिफारस केली होती.

## नरेगा मस्टरसाठी डॅशबोर्ड विकसित प्रत्येक आठवड्याला आढावा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०६ जून -**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (नरेगा) ग्रामपंचायत स्तरावर काम उपलब्ध करून दिले जाते. सध्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर घरकुलांची कामे सुरू असून, या कामांतर्गत लाभार्थ्यांना ९० दिवसांची मजुरी नरेगा योजनेतून दिली जाते. मात्र काही ठिकाणी मस्टर वेळेवर निघत नसल्यामुळे लाभार्थ्यांना मजुरी मिळण्यात अडचणी येत होत्या.

या पार्श्वभूमीवर नरेगा आयुक्तांनी मस्टर व्यवस्थापनासाठी एक सुसंगत डॅशबोर्ड प्रणाली विकसित केली आहे. या डॅशबोर्डचा आढावा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी घेतला.

## हिमायतनगरात जागतिक पर्यावरण दिन निमित्ताने वृक्षारोपण



**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.०६ जून -**

हिमायतनगर येथील रेल्वेस्थानक परिसरात असलेल्या ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय तर्फे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शहरातील बसवेश्वर मंदिर, वरद विनायक मंदिर परिसरात दिनांक ०५ रोजी वृक्ष लागवड करण्यात आली आहे. तसेच प्रत्येकाने आपल्या जीवनात एक तरी वृक्ष लावावे असे आवाहन सिंधू दीदी यांनी केले.

दिनांक ५ जून रोजी सर्वत्र जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जात आहे. मानवाच्या स्वार्थी वृत्तीमुळे मोठ्या प्रमाणात वृक्षाची कत्तल होत असल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होऊ लागला आहे. त्यामुळे पृथ्वीतलावर विविध प्रकारचे संकटे कोसळत आहेत. या सर्व संकटांवर मात करण्यासाठी आणि पूर्ववत ऑक्सिजनचे प्रमाण वाढवून प्राणीमात्रांना जीवनदान देण्यासाठी वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे. यासाठी प्रत्येकाने एक वृक्ष लागवड करून त्या वृक्षाला मोठं करण्याचा संकल्प करावा असा संदेश देण्यात आला.

हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून हिमायतनगर येथील ब्रह्मकुमारी ईश्वरी विश्वविद्यालयाच्या वतीने शुक्रवारी शहरातील विविध धार्मिक स्थळाच्या ठिकाणी वड, बेल,बदाम, पिंपळ आदिसह विविध प्रकारचे वृक्ष लागवड करून पर्यावरण वाढीचा संदेश देण्यात आला. यावेळी सिंधू दीदी, भोयर दीदी, अरविंद भाई, गजानन चायल नंदू भाई, चंदू भाई, विपुल दाडेवाड, मेंडके भाई, यांच्यासह अनेक जेष्ठ नगरीत व बालक उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### देगलूरात शिवराज्याभिषेक दिन जल्लोषात साजरा



**देगलूर** -ढोल - ताशांचा गजर, सनई चौघड्यांचे मंगलमय सूर ....छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष... अशा अलोट उत्साही वातावरणात आणि शेकडो शिवप्रेमीच्या उपस्थितीत शुक्रवार दि. ६ जून रोजी शिवराज्याभिषेक दिन जल्लोषात साजरा करण्यात आला. प्रारंभी शिवरायांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून नंतर प्रतिमेवर पाण्याने व दुधाने जलाभिषेक करण्यात आला. यावर्षी सोहळ्याचे भव्य आयोजन छत्रपती शिवस्मारक समितीचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष अँड अंकुश देसाई देगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी परकीय आक्रमणातून स्वराज्य निर्माण केल्यानंतर ६ जून रोजी पहिला शिवराज्याभिषेक दिन वैदिक पद्धतीने पार पडला. या अनुषंगानेच छत्रपती शिवाजी महाराज चौकातील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करून हा सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी महाराजांची पूर्णकृती पुतळा फुलांच्या माळाने सजविण्यात आली होती. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मीकांत पदमवार , राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष अंकुश देसाई देगावकर, मुखेडचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आकाश देशमुख ,काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बालाजी पाटील देगावकर ,देगावचे माजी सरपंच मंगल पाटील देगावकर, भाजपाचे युवा मोर्चा तालुकाध्यक्ष नामदेव पाटील थडके देगावकर, राहुल थडके, नितेश पाटील भोकसखेडकर, राजू पाटील मलकापूर, जयपाल कांबळे, राजू पाटील देगावकर , विलास मोरे , भुताळे पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

### श्री गुरू गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेत शिवस्वराज्य दिन उत्साहात



**नवीन नांदेड**-श्री गुरू गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेत दिनांक ६ जून २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासातील महत्त्वाचा दिवस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या दिनानिमित्त श्री गुरू गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेत दिनांक ६ जून २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११.०० वाजता संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांच्या हस्ते स्वराज्याचे प्रतीक असलेल्या स्वराज्यगुढी उभारणीली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत उपस्थित सर्व मान्यवर, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीताचे सामूहिकरित्या गायन करण्यात आले.

या प्रसंगी विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रा. संजय देठे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. अनिल गोंडे, प्रबंधक डॉ. अरुण पाटील, संशोधन व विकास अधिष्ठाता डॉ. ए. व्ही. नांदेडकर, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमास मार्गदर्शन संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी उपस्थितांना केले. यावेळी संस्थेतील प्राध्यापक , विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### वसतिगृहात विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया १० जून पासून सुरू

**नांदेड** -मातोश्री शासकीय ईबीसी मुलांचे वसतिगृह तथागतनगर मालेगाव रोड नांदेड येथे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना वसतिगृहात माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदवीत्तर या विद्यार्थ्यांचे पुनर / नूतन प्रवेशासाठी प्रवेश अर्ज मागविण्यात आली आहेत. या वसतिगृहात प्रवेश अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख बुधवार २५ जून २०२५ असून मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा स्विकार केला जाणार नाही. या अर्जासोबत शेवटी दिलेल्या वार्षिक परीक्षेतील गुणपत्रक, सन २०२४-२५ या वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र (तहसीलदार यांनी अदा केलेले आसावे) व चालू वर्षात (२०२५-२६ साठी ) प्रवेश घेतलेले बोनाफाईड प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, यांच्या सत्यप्रति संक्षांकित करुण प्रवेशा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. प्रवेश अर्ज व नियमावली या कार्यालयात १० ते २५ जून २०२५ या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत मिळतील. तसेच याच कालावधीत संपूर्ण भरलेले अर्ज कागदपत्रासह स्वीकारले जातील. विद्यार्थी प्रवेशाची निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यावर वसतिगृह नियमित सुरु होईल. सदरील वसतिगृहात शासनाकडून निवासाची व भोजनाची संपूर्ण व्यवस्था विनामुल्य सोय करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार वसतिगृहात प्रवेश दिला जातो. मागवर्गीय विद्यार्थ्यांना २० टक्के जागा राखीव आहेत.

# झाडे लावा, झाडाचे संगोपन करा तरच पर्यावरणाचे संतुलन उत्तम राहील: माजी नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी



**तभा वृतसेवा**
**लोहा , दि.०६ जून -**

निसर्गाचे संतुलन ठेवण्यासाठी प्रत्येकांनी किमान एक झाड .. लावून त्यांचे उत्तम संगोपन करावे असे भारतीय जनता पार्टीचे शहर मंडळ अध्यक्ष तथा माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी ग्लोबल इंग्लिश स्कूल येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपणाच्या कार्यक्रमांत म्हणाले.

शहरातील ग्लोबल इंग्लिश स्कूल येथे जागतिक पर्यावरण दिन भारतीय जनता पार्टी शहर मंडळ.नांदेड दक्षिणच्या वतीने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांचे आयोजक भारतीय जनता पार्टी शहर मंडळ अध्यक्ष तथा माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी केले होते.

या कार्यक्रमासाठी माजी नगरसेवक युवराज वाघमारे, नबीसाब शेख, अमोल व्यवहारे, ग्लोबल इंग्लिश स्कूलचे उपाध्यक्ष दिनेश मोटे, माजी तालुका उपाध्यक्ष नागनाथ पाटील चुडावकर,डी एन कांबळे,हाळद चे माजी सरपंच भिमराव पाटील शिंदे लक्ष्मण फुलवरे बबनराव नावदे ,गोविंद वड, पांडुरंग रहाटकर, ,टिकाराम कतुरे, व्यंकट दांगटे, , सतीश मोरे, विश्वनाथ भालेराव, विनय चदेवाड यांच्यासह अनेक भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते गजानन सुर्यवंशी म्हणाले की, भारतीय जनता पार्टी ही नेहमीच सामाजिक, शैक्षणिक राजकीय व धार्मिक कार्यात सदा अग्रेसर असते आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्त लोहा शहरातील ग्लोबल इंग्लिश स्कूल येथे वृक्षारोपण करुन इतरांना संदेश दिला झाडे लाव.. वृक्षांचे उत्तम संगोपन करा तरच निसर्गावरील पर्यावरणाचे संतुलन चांगले राहिल असा संदेश दिला.

# विद्युत सुरक्षेविषयी महावितरणच्यावतीने जनजागृती



**तभा वृतसेवा**
**उमरी , दि.०६ जून -**

विद्युत सुरक्षा सप्ताह महावितरण उमरी उपविभागीय कार्यालयाच्या वतीने दोन जुन रोजी विद्युत सुरक्षा सप्ताहानिमित छत्रपती शिवाजी महाराज चौक, नगर पालिका चौक, उमरी बसस्थानक येथे जाऊन प्रवाशी व ग्राहकांना विद्युत सुरक्षे विषयी माहिती देऊन जनजागृती करण्यात आली उमरी नगर पालिके समोर हातात फलक घेऊन जनजागृती करण्यात आली.

ग्राहकानो लाईट खाली अथवा खाबाला लाईटच्या ताराखाली जनावरे, बाधु नका अथवा कपडे वाळु नका वा-याने तारा तुटुन जिवित हानी होऊ शकते तुटलेल्या ताराची तात्काळ महाविरणला माहीती दया, खबरदारी म्हणून लाईटच्या खाबापासुन एक मीटर दुर कपडे व जनावरांना बाधा या सदर्भात उमरी महावितरण कार्यालयाच्या वतीने विद्युत सुरक्षे विषयी जनजागृती करण्यात आली.

यावेळी उपविभागीय कार्यालय उमरी येथील उपकार्यकारी आभियता शरद जगदाळे, कनिष्ठ आभियता चव्हाण, एम जे लखमोड,एस एन देशमुख,पि. एस तोटावाड,आनंद पगलवाड, किरण वट्टमवार, बी के गागळेगावे, बी सी शिदे, जाधव वनिता, गोविदवार लाईनमेन, विज वितरण चे कर्मचारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना होटाळा सौर प्रकल्प सुरू करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०६ जून -**

नायगाव तालुक्यातील महावितरणच्या ३३ केव्ही नरसी उपकेंद्र अंतर्गत होटाळा येथील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचा मंजूर सौर ऊर्जा प्रकल्प गायरान जमिनीवरील अतिक्रमण हटवून प्रकल्प उभारणी सुरू करावी अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे भटके विमुक्त आघाडी सदस्य दत्ता बन यांच्यासह सचिन पवार, राजेश पवार यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे केली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अंतर्गत नांदेड जिल्ह्यात अठरा प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत १८ ठिकाणी महानिर्मिती कंपनीस शासकीय गायरान २८८ एकर जमीन एक रुपया वार्षिक नाममात्र भाड्याने ३० वर्षासाठी दिली आहे.

# शिवस्वराज्याची प्रेरणा नव्या पिढीला नवचैतन्य देणारी: पालकमंत्री सावे




**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि.०६ जून -**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोककल्याणकारी स्वराज्याच्या प्रेरणेचा स्मृतीदिन म्हणजे शिवस्वराज्य दिन, आज नांदेड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दिलेल्या शुभेच्छा संदेशात नमूद केले की, शिवस्वराज्य दिन हे नव्या पिढीला प्रेरणा व नवचैतन्य देणारे स्मरण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी ६ जून १६७४ रोजी रायगडावर राज्याभिषेक करून स्वराज्याची स्थापना केली. महाराष्ट्र शासनाने २०२१ पासून हा दिवस 'शिवस्वराज्य दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन भगव्या ध्वजासह स्वराज्य गुढी उभारण्यात आली, शिवशक राजदंड व गुढीचे पूजनही करण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी माधव सलगर यांनी या वेळी पालकमंत्री महोदय यांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखवला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आपल्या भाषणात सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला सुशासनाचा आदर्श आजही प्रशासकीय कार्यपद्धतीसाठी दिशादर्शक आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी आपल्या मनोगतात नमूद केले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या लोककल्याणकारी धोरणांचा आदर्श घेत जिल्हा परिषद ग्रामीण विकासाच्या दिशेने ठोस पावले उचलत आहे.

या प्रसंगी महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान अंतर्गत जिल्हा परिषद प्रांगणात उभारलेल्या दोन गाळ्यांची चावी तिरंगा महिला प्रभाग संघाकडे सुपूर्द करण्यात आली. या गाळ्यांमध्ये महिला बचत गटांची उत्पादने विक्रीसाठी ठेवण्यात येणार असून दुसऱ्या गाळ्यात कॅन्टीन चालवले जाणार आहे. कार्यक्रमादरम्यान जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेच्या वतीने खिचडी, मसाला दूध व जिलेबीचे वाटप करण्यात आले. शाहीर रमेश गिरी व त्यांच्या संचाने शिवचरित्रावर आधारित पोवाडा व गीत सादर करून वातावरण शिवमय केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन पद्माकर कुलकर्णी व मिलिंद व्यवहारे यांनी केले.

या कार्यक्रमाला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे संचालक डॉ. संजय तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक नारायण मिसाळ, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, शिक्षणाधिकारी माधव सलगर, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, जिल्हा कृषी अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तहसीलदार सुरेखा नांदे यांच्या कारवाईत रेती उपसा मशीन ट्रॅक्टर सह ३० ब्रास रेती जप्त



**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.०६ जून -**

हदगाव तालुक्यातील मौजे कोथळा पैनगंगा नदी पात्रातून रेती उपसा यंत्र, ट्रॅक्टर सह ३० ब्रास रेती जप्त केल्याची कार्यवाही एकट्या महिला तहसीलदार श्रीमती सुरेखा नांदे यांनी आज दि. ५ रोजी दुपारी १२वा. सुमारास केली. या घटनेमुळे तहसील कार्यालयात एकच खळबळ उडाली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की , हदगाव शहराच्या उत्तरेकडे पैनगंगा नदी वाहते. अज्ञात काही लोक मशीनद्वारे नदीपात्रातून अवैद्य रेती काढत असल्याची गोपनीय माहिती तहसीलदार नांदे यांना मिळाली. यावरून क्षणाचाही विलंब न करता त्या घटनास्थळी आपली खाजगी गाडी घेऊन चालकासह त्या पोहोचल्या. तहसीलदार आल्याचे पाहताच मशीन चालक व मजूर फरार झाले. शेतमालक रघुनाथ वानखेडे यांच्या शेतातील स्वराज्य ट्रॅक्टर क्रमांक एम. ऐच. २६ बी .क्यू.९८०३ रेती उपसा मशीन, खोरे, यांच्यासह ३० ब्रास रेती जप्त करण्यात आली.ज्या ट्रॅक्टरवर गोपाळराव दिगंबर वानखेडे असे नाव होते. यानंतर सर्व साहित्य जप्त करून तहसील कार्यालयात जमा करण्यात आले असून जप्त करण्यात आलेली रेती शेतमालक रघुनाथ वानखेडे यांच्या ताब्यात देण्यात आली. एकट्या महिला तहसीलदारने घटनास्थळी जाऊन कार्यवाही केल्याची ही पहिलीच वेळ आहे . यामुळे महसूल विभागात एकच खळबळ उडाली असून रेती चोरांचे धाबे दणाणले आहे. तहसीलदार यांच्या आदेशावरून मंडळ अधिकारी विजय महाजन, तलाठी विश्वजीत वडकुते, पोलीस पाटील विजय वानखेडे व पोलीस घटनास्थळी तातडीने दाखल झाले.

## गुणवंत खेळडूंचा सत्कार

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि.०६ जून -**

नांदेड उत्तरचे आमदार बालाजी कल्याणकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आणि कै. शंकरसिंघ गाडीवाले यांच्या स्मरणार्थ समाजातील उद्योजक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडाक्षेत्रात उल्लेखणीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा तसेच गुणवंत खेळाडू विद्यार्थ्यांचा डोईजड अण्णा फाऊंडेशनच्या वतीने शाल, पुष्पहार, स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी डोईजड अण्णा फाऊंडेशन संचालक सुनिल अण्णा डोईजड, महाराष्ट्र परिट धोबी सेवा मंडळाचे जिल्हाध्यक्ष संतोष औंढेकर, जिल्हा उपाध्यक्ष कोंडिबा मांजरमकर, राजेंद्र टोके, शिवसेना जिल्हाध्यक्ष गंगाधरराव बडुरे, सहसंपर्कप्रमुख दर्शनसिंघ सिद्धू, संदीपसिंघ गाडीवाले, शहर प्रमुख उमेशभाऊ दिघे, शामभाऊ कोकाटे, गणेश आप्पा, वासुदेव समाज सेवा संघाचे अध्यक्ष रामकिसन डोईजड, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### भारतीय रिपब्लिकन पार्टी आठवले गटातर्फे जोरदार तिरंगा रॅली

**परभणी,/प्रतिनिधी :** जम्मु काश्मिर मधील पहलगाम या ठिकाणच्या पर्यटनस्थळावर पाकिस्तानी अतिरेक्यांनी जात व धर्म विचारुन अमानुषपणे केलेल्या हत्याकांडाच्या प्रत्युत्तरार्थ भारतीय सेनेने यशस्वी केलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्य दलास सॅल्यूट करण्याकरीता भारतीय रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटातर्फे शुक्रवार ६ जून रोजी शहरातून मोठी तिरंगा रॅली काढण्यात आली.

या संघटनेचे राज्य संघटक डी.एन. दाभाडे, अॅड. लक्ष्मणराव बनसोडे, माधवराव हातागळे, राणूबाई वायवळ, उत्तमराव वावळे, शेषराव नंद, निवृत्ती हत्तीअंबीरे, भगवान कांबळे, सतीश दामोधरे, कैलास दाभाडे, राहुल शिवभगत, भाऊराव सावणे, राम खिल्लारे, आप्पा गाडे, डी.एम. झोडपे, पांडुरंग आहिरे, शशिकांत गवळी, बाळासाहेब पैठणे, माधव सावरे, महादेव साळवे, अशोक जाधव, अनिल नरवाडे, प्रकाश खरे, यशवंत गायकवाड, सतीश शिंदे, बाळासाहेब कांबळे, प्रेमानंद बर्वे, विठ्ठलराव उजगरे, रामभाऊ बचाटे, मंगल सिंगरे आदी या तिरंगा रॅलीत सहभागी होते.

भारतीय सैन्य दलाने केलेल्या पराक्रमाचा या कार्यकर्त्यांनी जयघोष केला. भारतीय सैन्याचा अभिमान वाटावा म्हणून काढलेल्या या रॅलीतून या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केलेल्या जोरदार घोषणाबाजीने शहर दणाणले.

### सेलूत मसाला विक्रेत्याने केली आर्थिक विवंचनेतून आत्महत्या

**परभणी,/प्रतिनिधी :** सेलू येथील गोविंद वैजनाथ जाधव या ३३ वर्षीय तरुण मसाला विक्रेत्याने आर्थिक विवंचनेतून गुरुवार ५ जून रोजी दुपारी ४.३० वाजता गळफास घेवून आत्महत्या केली.

सेलू येथील विद्या नगर भागातील गोविंद वैजनाथ जाधव हे आपल्या हातगाड्यावर मसाला विक्रीचा व्यवसाय करीत होते. परंतु, व्यवसाय व्यवस्थित चालत नसल्यामुळे ते आर्थिक विवंचनेत होते. त्यातूनच जाधव यांनी विद्या नगर भागातील स्वतः च्या घरी गुरुवारी सायंकाळी ४.३० वाजेच्या सुमारास गळफास घेवून आत्महत्या केली. त्यांचे चुलत बंधू शाम काशिनाथ जाधव यांनी सेलू पोलिसांना या संदर्भात माहिती दिली. दरम्यान, या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### श्री शिवाजी पॉलिटेक्निकच्या ६० विद्यार्थ्यांना मिळाली रोजगाराची संधी

तृतीय वर्षाचा निकाल लागण्याआधीच नामांकित कंपनीमध्ये झाली निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री शिवाजी पॉलिटेक्निकच्या ६० विद्यार्थ्यांना त्यांच्या तृतीय वर्षातील अभ्यासक्रमाचा निकाल लागण्याच्या अगोदरच नामांकित कंपनीमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

तंत्रशिक्षण हे स्वयंपूर्ण बनवत आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव श्री शिवाजी पॉलीटेक्निक च्या प्रत्येक विद्यार्थ्याला आलेला आहे, याच श्री शिवाजी तंत्रनिकेतन मध्ये ९ एप्रिल २०२५ रोजी मीडिया प्रायव्हेट लिमिटेड अहिल्यानगर, या नामांकित कंपनीतर्फे कॅम्पस इंटरव्यू घेण्यात आले होते. तसेच बजाज, जॉन डियर, कॉलब्रो प्रायव्हेट लिमिटेड औरंगाबाद या कॅम्पस इंटरव्यू च्या माध्यमातून वयाच्या १९ व्या वर्षी विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. हे विद्यार्थी ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील असून त्यांना अल्पवधीतच ते आपल्या कुटुंबाचा आधार बनले आहेत. या विद्यार्थ्यांचा तृतीय वर्षातील अभ्यासक्रमाचा शेवटचा पेपर ३० मे २०२५ दिल्यानंतर ३१ मे २०२५ रोजी अहिल्यानगर मीडिया कंपनीतर्फे स्वातंत्र्य ट्रॅव्हल्स विद्यार्थ्यांना नेण्यासाठी पाठवण्यात आली होती. ०१ जून २०२५ रोजी त्यांना कंपनीमध्ये कामावर रुजू करून घेण्यात आले आहे.

हे विद्यार्थी परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गरीब होतकरू कष्टकरी पालकाचे असून या विद्यार्थ्यांना तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ.शाहिद ठेकीया ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रदीप रणखांब व सर्व विभागातील विभाग प्रमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले त्यांच्या या यशाबद्दल म.शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश दादा सोळंके, सचिव आ. सतीशराव चव्हाण, स्थानिक नियामक मंडळाचे अध्यक्ष अनिलराव नखाते यांच्यासह सर्व सदस्य तसेच प्राचार्य डॉ. शाहिद ठेकीया सर्व विभागातील विभाग प्रमुख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले.

### मंत्रालय कक्ष अधिकारी पायल ठाकूर यांनी साने गुरुजी वाचनालयास स्पर्धा परीक्षा ५० पुस्तके भेट



**पूर्णा,/प्रतिनिधी-** येथील मूळ रहिवासी असणाऱ्या व सध्या मुंबई येथे मंत्रालयात कक्ष अधिकारी या पदावर कार्यरत असणाऱ्या पायल प्रतापसिंह ठाकुर यांनी १ जून रविवार रोजी शहरातील साने गुरुजी सार्वजनिक वाचनालयास ५० स्पर्धा परीक्षा पुस्तके भेट स्वरूपात वाचनालयास ग्रंथपाल सतीश टाकळकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. पायल ठाकूर यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत २०२२ मध्ये मंत्रालयात अन्न व नागरी पुरवठा विभागात कक्ष अधिकारी म्हणून नियुक्ती झालेली आहे.त्यांनी आपल्या जवळील असलेले सर्व स्पर्धा परीक्षेचे उपयुक्त पुस्तके साने गुरुजी सार्वजनिक वाचनालयातील स्पर्धा परीक्षा विभागास दिली ग्रंथालयाच्या त्या नियमित वाचक होत्या ग्रंथालयाच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.यावेळी सोबत त्यांच्या भावजई पल्लवी अमितसिंह ठाकूर,पुतणी ओवी ह्या उपस्थित होत्या.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# एक शेतकरी, एक डिपी योजनेचा सेलू तालूक्यात झाला बोजवारा

**आँनलाईन रोहित्रची (डिपी) नोंद प्रत्यक्षात शेतात डिपी नाही, कंत्रांटदाराचे उखळ पांढरे, शेतकरी वंचित**

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी-** तालूक्यातील ब्राम्हणगाव (प्र.प.)येथील शेतक-याच्या शेतातील डिपीची आँनलाईन नोंद मात्र प्रत्यक्षात सदरिल शेतक-याच्या शेतात मात्र कंत्राटदाराने डिपी न बसवता तो डिपी इतरत्र पळविल्याचा आरोप शेतक-याने केला असून यामूळे परत एकदा महावितरणचा कारभार चव्हाट्यावर आला आहे. शासनाकडून शेतक-यांना एक शेतकरी एक रोहित्र योजना कार्यन्वित केली होती.सदरिल योजना सन २०२३ मध्ये शासनस्तरावरून बंद करण्यात आली. दरम्यान तालूक्यात या योजनेतून अनेक शेतक-यांना रोहित्र मंजूर झाले काही शेतक-यांच्या शेतात रोहित्र बसविण्यात आले तर अनेक शेतक-यांचे रोहित्र मंजूर होवू नही केवळ त्यांच्या शेतात रोहित्र बसविण्यात आल्याची आँनलाईन नोंदी आहेत प्रत्यक्षात मात्र शेतात रोहित्र नाही अशी परिस्थीती आहे.

संबधित कंत्राटदाराने त्याच्या आर्थीक फायद्यासाठी एका शेतक-याचे रोहित्र दूस-या शेतक-यास विक्री केल्याचा आरोप होत आहे.ब्राम्हणगाव (प्र.प.)येथील शेतकरी देवराव यशवंतराव डोईफोडे यांनी त्यांच्या गटनं ४९ या शेतात एक शेतकरी एक रोहित्र योजनेतंर्गत सन २०२२ मध्ये कोटेशन भरले होते त्यानूसार त्यांना रोहित्र मंजूर झाले मात्र केवळ रोहित्र महावितरणच्या साईडवर आँनलाईन दिसत आहे प्रत्यक्ष मात्र शेतक-याच्या शेतात कत्रांटदाराने रोहित्र न बसवता इतर कूठल्या तरी शेतक-याच्या शेतात स्वत:च्या आर्थीक फायद्यासाठी बसवून डोईफोडे यांचे नूकसान केले आहे.



यामूळे सदरिल शेतक-याला सोलार पंप देखील मिळत नसल्याने शेतात विहिर असून सूद्धा विहिरीचे पाणी शेतीला शेतक-याला देता येत नाही केवळ कंत्राटदाराच्या चूकीचा फटका शेतक-या ला बसत असून सन २०२२ ते २०२५ असे तिन वर्षे शेती पिकांना पाणी देण्याची आडचण शेतकरी डोईफोडे यांना येत असल्याने त्यांचे आर्थीक नूकसान झाले आसून तत्काळ शेतक-याची आडचण दूर करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

कंत्राटदाराचा परवाना रद्द करावा महावितरण कडून एक शेतकरी एक रोहित्र योजना राबविण्यात आली मात्र महावितरणचे कूठलेही लक्ष नसल्या कारणाने शेतक-यांना रोहित्र मंजूर होवूनही केवळ धनदांडग्याना कंत्रांटदाराने रोहित्र बसवून दिले यामूळे गरिब शेतक-यांचे नूकसान झाले आहे या नूकसानीस जबाबदार कोण आहे महावितरण की कंत्राटदार यांच्यावर योग्य कार्यवाही करून शेतक-यास न्याय द्यावा तसेच तालूक्यात अनेक शेतक-यांचे रोहित्र कंत्राटदाराने दूस-याच्या धशात घालण्याचा प्रकार केला असल्याने संबधित कत्रांटदाराचा परवाना रद्द करून महावितरणच्या संबधित कर्मचारी अधिकारी यांचे निलंबन व्हावी नसता कायदेशिर मार्गाने अंदोलन करणार.

**आनंद डोईफोडे**
माजी उप सभापती प.स. सेलू

## गंगाखेडात आज अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सवाचे आयोजन - सर्व पक्षीय धनगर समाज बांधवांच्या वतीने आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** गंगाखेड व पालम तालुक्यातील सर्व पक्षीय धनगर समाज बांधवांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी सार्वजनिक जयंती निमित्त शनिवार ७ जून रोजी दुपारी २ वाजता शहरातील राजमाता अहिल्यादेवी होळकर चौकात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून सायंकाळी ५ वाजता परळी नाका येथून अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत असलेल्या या जयंती महोत्सवाचे उद्घाटन जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी खासदार संजय जाधव, माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांच्यासह पाथरी विधानसभेचे आमदार राजेश विटेकर, धनगर समाजाचे ज्येष्ठ नेते विठ्ठलराव रबदडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार डॉ. मधुसूदन केंद्रे, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष संतोषराव मुरकुटे, लोकनियुक्त माजी नगराध्यक्ष विजयकुमार तापडिया, माजी नगराध्यक्ष रामप्रभू मुंडे, माजी सभापती बालासाहेब आळनुरे, जि.प.च्या माजी सदस्या करुणाताई कुंडगीर, माजी सदस्य मोहनराव गळाकाटू, किशनराव भोसले, प्रल्हादराव मुरकुटे, शंकरराव वाघमारे, रत्नाकर शिंदे, लक्ष्मणराव मुंडे, माजी सभापती शिवाजीराव निरदुडे, कृ.ऊ.बा. समिती सभापती साहेबराव भोसले, उपसभापती संभाजीराव पोले, नंदकुमार पटेल, पंचायत समिती माजी सभापती मगर पोले, माजी उपसभापती शांताबाई माने, पं.स. माजी सदस्य लक्ष्मण आप्पा मुंडे, माधवराव गायकवाड, गिरीष सोळंके, शेख अफजल, भाई तुषार गोळेगावकर, उद्धवराव सातपुते, एकबाल चाऊस, कृष्णा सोळंके, डॉ. सूर्यकांत मुंडे, राधेश्याम भंडारी, सुभाष नळदकर, बापू सातपुते, अनिल यानपल्लेवार, गोविंद यादव, उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, तहसीलदार उषाकिरण श्रृंगारे, मुख्याधिकारी जयवंत सोनवणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. यावेळी धनगर समाज बांधवांसाठी चौडी येथे आमरण उपोषण करणारे सुरेश बंडगर यांचा यावेळी विशेष सत्कार केला जाणार आहे.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती च्या कार्यक्रमास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन जयंती समितीचे मुख्य प्रवर्तक अॅड. संदीप आळनुरे, स्वागताध्यक्ष अभय कुंडगीर, अध्यक्ष बाबा पोले, सहस्वागताध्यक्ष जितेश गोरे, कार्याध्यक्ष प्रणित खजे, नियोजन समिती अध्यक्ष रामेश्वर आळनुरे, विजयराव घोरपडे, बाळासाहेब ढोले, नारायणराव कुंडगीर, उद्धवराव शिंदे, प्रल्हादराव शिंदे, जयवंत कुंडगीर, माधवराव शेंडगे आदींनी केले आहे.



## घरकुलासाठी मोफत वाळू वाटप शुभारंभ

**पोलीस ठाण्यातील जप्त वाळूचे घरकुलासाठी वाटप**

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** वाळू धोरण २०२५ च्या अनुषंगाने घरकुल लाभधारकांना घर बांधण्यासाठी प्रत्येकी ५ ब्रास मोफत वाळू वाटपाचा शुभारंभ शुक्रवार दि.६ जुन रोजी आमदार राजेश विटेकर यांच्या हस्ते सोनपेठ पोलीस ठाण्यात पार पडला.

यावेळी व्यासपीठावर पाथरी चे उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर, सोनपेठ चे तहसीलदार सुनील कावरखे, गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद चव्हाण,नायब तहसीलदार देवेंद्रसिंह चंदेल, माजी नगराध्यक्ष चंद्रकांत राठोड यांची उपस्थिती होती. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी वाळू मिळवण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती. वाळू अभावी अनेकांचे घरकुल बांधकाम रखडले होते.याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने नुकतेच २०२५ वाळू धोरण जाहीर केले आणि प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू केली आहे. सध्या सोनपेठ तालुक्यातील १०० घरकुल लाभधारकांना प्रत्येकी पाच ब्रास मोफत वाळूच्या पावत्या वाटप करुन योजनेस प्रारंभ करण्यात आला.यावेळी अवैध वाळू वाहतूक केलेल्या वाहनांतून जप्त करण्यात आलेली सोनपेठ पोलीस ठाण्यातील वाळू घरकुल लाभधारकांना मोफत देण्यात आली.सदर वाहनांना वाहतूक परवाना देऊन वाळू भरलेल्या वाहनांना प्रशासनाच्या वतीने हिरवा झेंडा दाखवून शासन योजनेला चालना दिली. तर मोफत वाळू ची पावती दिलेल्या घरकुल लाभधारकांना गोदावरी पात्रातून वाळू देण्यात येत आहे. मोफत वाळूच्या पावत्या मिळालेल्या लाभधारकांना ९ जून पर्यंत आपापली वाळू घेऊन जाण्याच्या सुचना देण्यात आल्या असून त्यानंतर उर्वरित घरकुल लाभधारकांना टप्याटप्याने वाळू देण्यात येणार असल्याचे तहसीलदार सुनील कावरखे यांनी सांगितले आहे.

## श्री.लक्ष्मी नारायण मंदिरात मुर्ती प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील रेल्वेस्थानक भागातील जिर्णोध्दार केलेल्या श्री लक्ष्मी नारायण मंदिरात श्री गणेशजी, श्री लक्ष्मी नारायण भगवान, श्री शिवजी व श्री हनुमानजी यांच्या मुर्तीची वेद विद्वान आचार्य यांचे साक्षीने ६ ते ८ जून या दरम्यान वेदमंत्रोच्चारात देवतांचे पुजन व यज्ञ करीत प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहन सोहळा संपन्न होणार आहे.

येथील श्री लक्ष्मी नारायण मंदिराच्या जिर्णोध्दाराचे काम श्री लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्ट तर्फे पूर्ण करण्यात आले आहे. आता त्या मंदिरात श्री गणेशजी, श्री लक्ष्मी नारायण भगवान, श्री शिवजी, श्री हनुमानजी देवतांचा ६ ते ८ जून या दरम्यान प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा होणार आहेत. या सोहळ्यास संत शिरोमणी पद्मश्री पुज्यश्री गणेश्वरशास्त्री महाराज द्रवीड (वाराणसी) हे उपस्थित राहणार आहेत. वेदविद्वान आचार्यांच्या साक्षीने, उपस्थितीत, वेदमंत्रोच्चारात देवदेवतांचे पूजन व यज्ञ होणार आहे. यावेळी वेदशास्त्रसंपन्न भागवताचार्य विष्णूशास्त्री रंगनाथ जोशी (बाळू गुरु असोलेकर) यांचीही उपस्थिती राहणार आहे. मंदिर पुजारी श्री.प. श्रीनारायण मदनलालजी शर्मा, श्री.प. व्यंकटेश श्रीनारायणजी शर्मा व श्री लक्ष्मी नारायण मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी, सदस्य व भक्त परिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.

शुक्रवार ६ जून रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ध्वजपुजन, दिपप्रज्वलन, चतुर्वेद स्वस्तिवाचन, पुण्याहवाचन, महापूजा, मुख्यदेवस्थापना, सायंकाळी ७.३० वाजता श्री सालासार भजन मंडळ नांदेड यांचा संगीतमय भजन संध्या हा कार्यक्रम होणार आहे. शनिवार ७ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत देव-देवतांचे पूजन, हवन, मंत्र पुष्पांजली, वगैरे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. सायंकाळी ७.३० वाजता मानवत येथील श्री सालासार सुंदर कांड मंडळाचा संगीतमय सुंदर कांड कार्यक्रम होणार आहे. तर रविवार ८ जून रोजी सकाळी १० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत देव देवतांचे पूजन, अवरिष्ट हवन, प्रोक्षण विधी, मूर्ति प्राणप्रतिष्ठान, महापुजा, यज्ञपूर्णाहुती, अमृतस्नान, महाअभिषेक व मंत्र पुष्पांजलीचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी १२.३० वाजता महाआरती व १.३० ते ४.३० पर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती श्री लक्ष्मी नारायण मंदिर ट्रस्टने दिली.

## छत्रपती संभाजीनगरातील बैठकीतून, मातंग समाजाचा ठरला १७ कलमी कृती कार्यक्रम

**परभणी ,/प्रतिनिधी-** आरक्षण वर्गिकरण होणार असलं तरीही मातंग दलितांचं प्रत्येक मूल शाळेत गेले पाहिजे, शिकल्यानंतर त्या प्रत्येक मुलाला संधी मिळाली पाहिजे. यासाठी सामाजिक न्यायाचा लढा वृध्दिंगत व्हावा यासह अन्य अपेक्षा व मागण्यांसाठी मातंग समाजाच्या प्रमुख संघटनांनी छत्रपती संभाजी नगरात ५ जून रोजी आयोजित केलेल्या एका बैठकीतून १७ कलमी कृती कार्यक्रम निश्चित केला.

महाराष्ट्रातील मातंग संघटना प्रमुखांची छत्रपती संभाजी नगर येथील सुभेदारी विश्रामगृहाच्या स्वागत कक्षात महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी बैठकीच्या अध्यक्षस्थानी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(ए) चे जिल्हाध्यक्ष तथा मातंग क्रांती मोर्चाचे संयोजक संजयभाऊ ठोकळ हे होते. या बैठकीत मुंबई, पुणे, नाशिक, नगर, लातूर, नांदेड, बीड, जालना, बुलढाणा, अकोला, नागपूर, परभणी, हिंगोली, वाशिम, सांगली, सातारा, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) आदी जिल्ह्यातून संघटना प्रमुख व पदाधिकारी सहभागी झाले होते.

बैठकीत काही विषयांच्या अनुषंगाने प्रामुख्याने चर्चा झाली. विशेषतः आरक्षण वर्गीकरण होणार असलं तरी मातंग दलितांचं प्रत्येक मूल शाळेत गेलं पाहिजे, शिकल्यानंतर त्या प्रत्येक मुलाला संधी मिळाली पाहिजे यासाठी सामाजिक न्यायाचा लढा वृद्धिंगत केला पाहिजे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार मिळाला पाहिजे. अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरण करण्यासंदर्भात राज्य सरकारकडून होत असलेली दिरंगाई यासंदर्भात आवाज उठवला पाहिजे. अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था(आर्टी) कार्यान्वित करण्यासंदर्भात राज्य सरकारकडून होत असलेला हलगर्जीपणा त्यातून होणारे मातंग विद्यार्थ्यांचे नुकसान यासंदर्भात सरकारला जाब विचारला पाहिजे. न्यायमूर्ती बदर समितीचा निष्क्रिय कारभार संदर्भात राज्य सरकार आढावा घेत नाही त्याचे कारण विचारले पाहिजे. क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग अभ्यास आयोगाने केलेल्या शिफारशीच्या संदर्भात सरकारने तात्काळ नव्याने शासन निर्णय पारित करून अंमलबजावणी सुरू करावी. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाला ठरल्याप्रमाणे १००० कोटी रुपये तात्काळ वितरित करण्यात यावेत आणि कर्जाची जामीन महाराष्ट्र शासनाने घ्यावी. सकल मातंग समाजात घुसलेल्या काही स्वार्थी आणि सत्तालोलूप ठगांची हकालपट्टी करण्याच्या कृती कार्यक्रम राबवला पाहिजे. होऊ घातलेल्या पावसाळी अधिवेशनावर लेटर बॉंब आंदोलनाची तयारी केली पाहिजे. सामाजिक न्याय दिनी २६ जून रोजी कोल्हापूर येथे गोलमेज परिषदेचे आयोजन करून आरक्षण वर्गीकरणाचा ड्रॉप छत्रपती शाहू महाजांच्या वारसांसमक्ष सादर झाला पाहिजे. आरक्षण वर्गीकरण ब्ल्यू प्रिंट निर्मिती करून बदर समितीला आणि राज्य सरकारला सादर करावी. मातंग समाजासाठी पिवळा झेंडा आणि त्या-त्या संघटनाचा विचारावर आधारित झेंडा असेल तर कुणीही कुणाचा तिरस्कार करणार नाही. दरवेळी आंदोलने करून समाजाला वेठीस धरण्यापेक्षा कार्यकर्ते उभे करण्याची प्रक्रिया सुरू केली पाहिजे. कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग सुरू करून कायद्याचे प्रशिक्षण कार्यकर्त्यांना दिले पाहिजे. लढाऊ कार्यकर्ते संघटित करून त्यांचे सक्षमीकरण करणे. मातंग अस्मिता संगोपन व संवर्धन करण्यावर भर देणे. उपजीविका आधारित गायरान, वन अर्थात जल, जंगल, जमीन विषय दुर्लक्षित होणार नाहीत याची काळजी घेणे यासह अनेक विषयावर सांगोपांग चर्चा झाली. राजकीय पक्षांच्या वळचणीला गेलेली मातंग चळवळ स्वयंपूर्ण बनवून ठरलेल्या लक्षाकडे घेऊन जाण्यासाठी पुढील काळात मुंबई विभाग, पुणे विभाग, कोकण विभाग, खानदेश विभाग, नागपूर विभाग, अमरावती विभाग आदी विभागात व्यापक बैठका आयोजित करून चळवळीत शिस्त निर्माण करण्याचे नियोजन करावे अशी चर्चा झाली आहे. य

ाप्रसंगी प्रा. डॉ. मिलिंद एकनाथ आवाड, संजय काशीराम इंचे, अशोकराव आल्हाट, डॉ. रामकृष्ण डोंगरे, भाऊसाहेब काळुंखे, पी. यु. आरसूड, यशराज इंचाळकर, अॅड. विलास साबळे, प्रा. प्रभाकर खंदारे, ज्ञानेश्वर साळवे, राहुल घोरपडे, नितीन आव्हाड, संतोष शंकरराव पवार, सुनील भानुदास मोटे (अण्णा), सुखदेव खाजेकर, शिवप्रसाद रमेश पुरी, शुभम ताराचंद लभाने, कडूबा विजय जाधव, अनंता भाले, सागर अशोक मोरे, विठ्ठल संजय मोरे, गणेश विजय माळे, वाल्मीक दाभाडे, एल. डी. कदम, अशोक उबाळे, किशोर कांबळे, विश्वदानंद वैराळ, अॅड. प्रेमकुमार लालझरे, हेमंत भगवानराव साळवे, अॅड. अंगद कानडे, बन्सीलाल दादा कांबळे, अमरजीत मुजमुले, परमेश्वर नवगिरे, कबीरानंद गुरुजी, संजय बोदडे, श्रावण हातागळे, अशोक ससाने, काशिनाथ सुलाखे पाटील, अण्णा धागाटे, देविदास गुडेकर, संजय चांदणे, सखाराम रणपिसे, मनोज कसारे, सुधाकर चांदणे, सतीश कावडे, केशव शेकापूरकर, प्रकाश वैराळ, शंकर भाऊ तडाखे, एस. पी. चव्हाण, रामचंद्र दावलवार, डॉ. एच.पी. बोयाळे, कॉम्रेड अंगद भोरे, अशोक पाटोळे, सुभाष आठवले, प्रकाश लोंढे, प्रा. डॉ. बी. एस. वाघमारे, प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे, कॉम्रेड गणपत भिसे आदी संघटना प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# बँकेचे बनावट नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट व फॉर्म नंबर ३५ दाखल केल्याप्रकरणी अंबाजोगाई पोलिसात वाहन चालक व एका पीयूसी सेंटर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.६ जून**

बँकेचे नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट व फॉर्म नंबर ३५ हे बनावट दस्तऐवज दाखल करून फसवणूक केल्याप्रकरणी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई पोलिसात वाहन चालक व एका पीयूसी सेंटर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याविषयी प्राप्त माहिती अशी की अंबाजोगाई तालुक्यातील सोमन वाडी येथील रहिवासी सौदागर दत्तू सोनवणे यांनी एम एच ४४ यु २९५३ हे वाहन चोरोमंडल इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड शाखा लातूर यांच्याकडून कर्ज काढून खरेदी केलेले असताना व या कर्जाची परतफेड न करता आहे या वाहनावर चोरोमंडल इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड शाखा लातूर यांचा बोजा असताना आरोपी सौदागर दत्तू सोनवणे रा. सोमणवाडी, ता. अंबाजोगाई, जि. बीड अ.क्र. २) सलीम शेख (सलीम पीयूसी) पुर्ण नांव व पत्ता माहित नाही यांनी २० जानेवारी २०२५ रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड. येथे वाहन क्रमांक MH.44.U.2953 या वाहना संदर्भातील नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट व फॉर्म नंबर ३५ हे बनावट दस्तऐवज तयार करुन त्यावर खोटी सही व शिक्का मारून ते दस्तऐवज बनावट असल्याचे माहित असताना देखील खरे दस्तऐवज असल्याचे भासवून उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाई या ठिकाणी सादर केले व सौदागर दत्तू सोनवणे व सलीम शेख यांनी स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी वाहनावरील उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई यांचे कडून कर्ज बोजा व परवाना (Permit) उतरवून सदरचे वाहन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे या कार्यालयात दुसऱ्या व्यक्तीस विक्री करुन शासनाची व बँक फायनान्स कंपनीची फसवणूक केली. ही फसवणूक लक्षात येताच अंबाजोगाई येथील उप प्रादेशिक कार्यालयातील अशोक सयाराम बोलचेटवार वय ३२ वर्ष यांच्या फिर्यादी वरून सौदागर दत्तू सोनवणे रा. सोमणवाडी, ता. अंबाजोगाई, जि. बीड व सलीम शेख (सलीम पीयूसी चालक) यांच्या तक्रारीवरुन अंबाजोगाई शहर पोलिसात गुरनं २८३/२०२५ कलम ३१८ (४),३३६ (३), ३४०(२), ३३६(२), ३१६(२), ३४१(१), ३(५) BNS. नुसार गुन्हा दाखल करण्यात आल्या असून पुढील तपास पोलीस निरीक्षक जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आह आहे.

# तंबाखू विरोधी दिनी विविध उपक्रम साजरे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ जून**

३१ मे रोजी बीड शहरातून राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम आरोग्य विभाग बीड भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रॅलीचे उद्घाटन केले.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण दिनाचे औचित्य साधून तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम याबद्दल अधिसेविका रमागिरी यांनी उपस्थित मार्गदर्शन केले.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. एल. आर. तांदळे वैद्यकीय अधिकारी हनुमंत पारखे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. सत्तेंद्र दबडगावकर,प्राचार्य डॉ. सुवर्णा बेद्रे, शासकीय नर्सिंग स्कूल,प्राचार्य मोरे, प्राचार्य दहीवाळ राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठाणचे संचालक तत्वशल कांबळे संबधित अधिकारी, उपस्थित होते.

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाचे सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामाची जनजागृती करून सामान्य नागरिकापर्यंत माहिती पोहोचविण्यासाठी दर वर्षी ३१ मे रोजी तंबाखू विरोधी दिन साजरा होतो. १ मे ते १५ जून पर्यंत ४५ दिवसांचे विशेष अभियान राबविण्यात येत असून या अभियानामध्ये सामाजिक जनजागृती उपक्रम, तंबाखूमुक्त शाळा, धुरमुक्त गाव, कोटपा कायदा २००३ ची प्रभावी अंमलबजावणी आणि तंबाखूमुक्त गाव असे विविध कार्यक्रम जिल्हा व राज्यस्तरावर तंबाखू नियंत्रण कक्ष आणि स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने राबविण्यात येत असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले आहे.

तंबाखू तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनामुळे होणाऱ्या आजारापासून सामान्य नागरिक व देश सुरक्षित राहायला हवा यासाठी तंबाखू विरोधी दिनानिमित्त जागतिक आरोग्य संघटना यांनी आकर्षणाचा मुखवटा उतरवूया तंबाखू आणि निकोटीन उत्पादना मागील उद्योगाच्या क्लृप्त्यारभ उघड करूया घोषवाक्य निवडले आहे. या घोषवाक्यचा अर्थ तंबाखू आणि निकोटीन उत्पादनाच्या जाहिरातीत वापरले जाणारे मोहक मुखवटे उताराने आणि लोकांची फसवणूक करणारे धोरणे उघडपणे समजावून सांगणे असा आहे.कोटापा कायद्याअंतर्गत जिल्ह्यातील शासकीय कार्यालयाची आकस्मित तपासणी करण्यात येणार आहे. तंबाखूच्या दुष्परिणामासोबत विविध माध्यमाव्दारे जनजागृती करण्यात येत आहे. तसेच विविध तंबाखू मुक्ती केंद्रामध्ये तंबाखू सेवन करणाऱ्या लोकांचे समुपदेशन करण्यात येणार आहे. यासाठी नागरिकांनी जवळच्या आरोग्य केंद्रामध्ये जाऊन मौखिक आरोग्य तपासणी करून घ्यावी. असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी केले आहे.

# अनिलदादा जगताप यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यादिनी बीडवासियांकडून प्रेम शुभेच्छांचा वर्षाव!

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ जून**



शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या अभिष्टचिंतन सोहळयादिनी जिल्हाभरातून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील मंडळींनी एकत्रित येऊन अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा जल्लोषात साजरा केला. अनिलदादा जगताप यांनी सर्व शिवसैनिकांना बॅनरबाजी नको, गरजवंतांना मदतीचा हात द्या असे अहवान केले होते. काल दि. ४ जून रोजी अनिलदादांच्या अहवानाला प्रतिसाद देत शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांनी मिळून विविध ठिकाणी वृक्षारोपण, अन्नदान, अनाथ आश्रमात किराणा वाटप, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, रेनकोट वाटप, गोरगरीब महिलांना साड्या वाटप तसेच रक्तदान शिबीर अशी विविध सामाजिक उपक्रम राबवत अनिलदादा जगताप यांचे अभिष्टचिंतन केले. तसेच बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शिवसेना मध्यवर्ती कार्यलय जालना रोड बीड येथे अनिलदादा जगताप यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. सायं ५.०० वाजल्यापासून ते उशिरा रात्रीपर्यंत बीड जिल्ह्यासह बाहेरच्या जिल्ह्यातून देखील अनिलदादा जगताप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मित्रपरिवार मोठ्या संख्येने येत होता.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचा १० जुन रोजी पुण्यात वर्धापन दिन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ जून**

राष्ट्रीय अध्यक्ष पद्मविभूषण मा. खा.श्री शरदचंद्र पवार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार दि. १० जून २०२५ रोजी वर्धापन दिन कार्यक्रम आयोजित केला आहे.जिल्ह्यातील मान्यवर नेते व पदाधिकारी निमंत्रित आहेत.अशी माहिती जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा २६ वा वर्धापनदिन १० जुन २०२५ सकाळी १० वा. ालगंधर्व रंगमंदिर नाट्यगृह शिवाजीनगर पुणे येथे संपन्न होणार आहे. या वर्धापन कार्यक्रमासाठी पक्षाचे विद्यमान-खासदार आमदार, माजी खासदार माजी आमदार, सर्व प्रदेश पदाधिकारी, सर्व जिल्हा निरीक्षक, जिल्हाध्यक्ष- कार्याध्यक्ष, सर्व फ्रंटचे अध्यक्ष व सेल राज्य प्रमुख, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, तसेच २०२४ निवडणुकीतील लोकसभा व विधानसभा उमेदवार, पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वर्धापन दिन कार्यक्रम होणार असून यावेळी माननीय शरदचंद्र पवार साहेब यांची मार्गदर्शन लाभणार आहे. जिल्ह्यातील सर्व निमंत्रित पदाधिकाऱ्यांनी या वर्धापन कार्यक्रमास पुणे येथे वेळेवर उपस्थित राहावे. असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

# महायुती सरकारच्या फसव्या घोषणेच्या विरोधात शिवसेनेचे क्या हुवा तेरा वादा आंदोलन-उल्हास गिराम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ जून**



राज्यात सत्ता मिळवण्यासाठी महायुती सरकारने निवडणूक प्रचारात अनेक फसव्या घोषणांचा पाऊस पाडला होता, पण सत्ता मिळताच या घोषणांकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष केले.महायुती सरकारच्या या फसवेगिरीचा जाब विचारण्यासाठी शिवसेनेचे ५ जून ते १२ जून पर्यंत क्या हुवा तेरा वादा असा प्रश्न करून गेंड्याची कातडी पांघरलेल्या महायुती सरकार ला जाब विचारणार असल्याचे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी म्हटले आहे.

गेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून शेतकरी सन्मान योजनेतून १५ हजार रुपये देऊ, लाडक्या बहिणींना १५०० रुपयात वाढ करून २१०० रुपये देऊ, शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांवरील ड्ठ्ठ्ढ अनुदानाच्या स्वरूपात परत करू, वृध्द पेन्शन धारकांना २१०० रुपये देऊ, शेतीला २४ तास वीज पुरवठा करू, शेती मालाला परवडेल असा हमीभाव देऊ, बी बियाणे आणि खताचे भाव कमी करू, अशा प्रकारच्या अनेक फसव्या घोषणा करून महायुती ने शेतकऱ्यांची मते लाटली, सत्ता मिळताच सोयीस्कर पणे या घोषणांकडे दुर्लक्ष केले,

सत्ताधारी तिन्ही पक्षांनी शेतकऱ्यांना तात्काळ कर्ज माफी देण्याची घोषणा केली होती कर्ज माफीच्या अपेक्षेत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली, या उलट शेतकऱ्यांनी ३१ मार्च पर्यंत थकबाकी भरावी असा फतवा काढला आधीच नुकसानीत आलेल्या शेतकरी अजूनही आर्थिक अडचणीत सापडला त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ झाली. गेल्या सात आठ महिन्यात जवळपास १००० शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपले जीवन संपवले असले तरीही महायुती सरकार मूग गिळून गप्प बसलेले आहे . अशात सरकारने शेती मालाचे हमीभाव जाहीर केला असून त्यात सोयाबीन चा हमी भाव हा गेल्या वर्षी पेक्षाही कमी दराने जाहीर करून शेतकऱ्यांची थट्टा केली आहे. ऐक रुपयात विमा योजना ही बंद करण्यात आली असून शेतकऱ्यावर हा अन्याय आहे.

# प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण साठी नवीन उद्दीष्ट प्राप्त बीड मतदारसंघातील पात्र कुटुंबांनी लाभ घेण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

Pradhan Mantri Awaas Yojna-Gramin
प्रधान मंत्री आवास योजना - ग्रामीण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ जून**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेसाठी नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले असून बीड तालुक्यासाठी तब्बल १२०२७ तर शिरूर कासार तालुक्यासाठी ४७९० घरकुलांचे नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे बीड मतदारसंघातील निकषपात्र कुटुंबांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.स्वतःचे पक्के घर नसलेल्या कुटूंबांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर बांधण्यासाठी अनुदान देण्यात येते. यावेळेस बीड मतदारसंघातील बीड व शिरूर कासार तालुक्यासाठी भरघोस उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे जास्तीत पात्र ठरलेल्या व यादीत नाव आलेल्या कुटुंबांनी आपले प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह ग्रामपंचायत मार्फत दाखल करून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. तसेच घरकुल प्रक्रिया पारदर्शक व्हावी व नागरिकांना यासंदर्भात कसल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याबाबत काळजी घेण्याच्या सूचनाही आ.क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

# संस्कार, चिकाटी आणि गुणवत्ता हीच माहेश्वरी समाजाची ओळख: गौरव इंगोले

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.६ जून**




संस्कार चिकाटी आणि गुणवत्ता हीच माहेश्वरी समाजाची खरी ओळख आहे. महाराष्ट्राच्या मातीशी हा समाज केव्हाच एकरूप झाला असून यांच्या गुणवतेचा मला खूप हेवा वाटतो असे प्रतिपादन माजलगाव चे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी केले.महेश नवमी निमित्त तालुका माहेश्वरी सभा आयोजित गुणवंत विध्यार्थी सन्मान सोहळ्यात ते मार्गदर्शन करत होते.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष माहेश्वरी सभेचे अध्यक्ष उमेश जेथलिया, प्रमुख मार्गदर्शक भा शि प्र चे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, श्री सिद्धेश्वर संकूलाचे पालक प्रकाश दुगड, राजस्थानी सेवा समाज बीड चे जेष्ठ संचालक ओमप्रकाश करवा,गोशाळेचे झुंबरलाल बियाणी, रोहित नावंदर तालुका सचिव गोपाल मानधने, व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी प्रकाश दुगड यांनी विदर्थ्यांना भावी आयुष्यातील संधी ओळखून मार्गस्थ व्हा म्हणून सांगितले.

कार्यक्रमाचे प्रतिमापूजन युवतीच्या हस्ते तर दीप प्रज्वलन मुख्य अतिथीनी केले. यावेळी सूत्रसंचालन संतोष जेथलिया व डॉ कमलकिशोर लड्डा यांनी केले प्रास्ताविक विनोद जाजू तर आभार नवलकिशोर काबरा यांनी मानले.महेश वन्दना पलक मानधने व राजनंदिनी जेथलिया यांनी व शिव तांडव स्वराज मालणी याने सादर केले.तर ऑपरेशन सिंदूर या विषयावर सुंदर रांगोळी श्री रांगोळी क्लासेस च्या सौ सुप्रिया मालणी, सौ सविता मुंदडा, कु वैष्णवी भूतडा, कु सिद्धी मानधने,गुंजन शिंदे वेदिका शिंदे यांनी काढली.तर माजलगाव येथील करवा परिवाराचे वतीने महप्रसाद आयोजित केला होता.करवा परिवाराच्या सर्व सदस्यांनी अतिशय परिश्रम घेतले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तालुका युवा महिला सभेच्या पदाधिकारी यांनी परिश्रम केले.

बुद्धिमान समाजाचे नेतृत्व करताना कसं लागतो- अमरनाथ खुर्पे

यावेळी मार्गदर्शन करताना अमरनाथ खुर्पे यांनी नेतृत्व करताना संघटन कौशल्य असणं खूप गरजेचे असते. बुद्धिमान आणि श्रीमंत समाजाचे नेतृत्व करताना खरा कसं लागतो. विशिष्ट चौकट तोडून माहेश्वरी सभा मागील दोन वर्षात काम करत आहे हे नक्कीच कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले

शोभा यात्रा

मागील दोन वर्षात वेगवेगळे प्रयोग करत या वर्षी महेश नवमीचि भव्य शोभा यात्रा शिवपालखी स्वरूपात टाळ मृदंग च्या तालात व महादेवाच्या तांडव नृत्याने काढण्यात आली. सई मालाणी व जानव्ही मालाणी यां बालकांनी महादेव पार्वतीचा देखावा सादर केला.स्वराज्य मालाणी या १४ वर्षाच्या मुलाने शिवतांडव चे वेगवेगळे प्रकार शोभयात्रेत सादर केले जे माजलगावकराचे खास आकर्षण ठरले.महिलांची संख्या लक्षणीय होती.

# घरकुल लाभार्थ्यांना हक्काची वाळू पोहोच : बोरदेवी येथे जिल्ह्यात सर्वात आधी घरकुल धारकाला वाळू मिळाली

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे अजुन एक लोकोपयोगी पाऊल!

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ जून**

दिनांक ६ जून रोजी नवीन शासन नियमानुसार महसूल विभागाने घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू उपलब्ध करून दिली . राजेगाव येथील सिंदफना नदीतील वाळू बोरदेवी येथील लाभार्थी कचरू भानुदासराव जाधव यांच्या जुन्या घरी टाकण्यात आली .

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू देण्याचा निर्णय रोजी घेतला होता . वाळू डेपोमधून वाळू उपलब्ध करून देण्यास क्षेत्रीय स्तरावर आलेल्या अडचणी , डेपोपद्धती व लिलाव पद्धती यामधील गुणदोषाबाबत विभागीय आयुक्त नाशिक यांच्या समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेऊन वाळू धोरण २०२५ च्या अनुषंगाने सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार मोफत वाळूचा शासन निर्णय प्रसिद्ध झाला.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सर्व जिल्ह्यात तातडीने पात्र घरकुल लाभार्थ्यांना वाळू पोहोच करावी यासाठी सुचना केल्या . बीड महसूल विभागाने जिल्हाधिकारी श्री विवेक जॉन्सन यांच्या आदेशाने योजना तयार केली . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः व्हिडीओ कॉन्फरंस द्वारे सर्व उपविभागीय अधिकारी , तहसीलदार , गटविकास अधिकारी यांना सविस्तर सुचना दिल्या . स्थानिक आमदार यांच्या हस्ते लाभार्थ्यांना पास वितरित कराव्या अशाही सुचना दिल्या .

जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी सविस्तर मार्गदर्शन केले . वाळूघाटांची माहिती घेतली . त्यानुसार मंडळ अधिकारी , तलाठी यांना त्या त्या घाटात वाळू आहे काय याबाबत चाचपणी केली . शासन निर्णयानुसार गट विकास अधिकारी यांनी घरकुल लाभार्थी यांची यादी तयार करुन सदरच्या यादीमध्ये प्राधान्यक्रम ठरवून तात्काळ आवश्यक असणाऱ्या घरकुल लाभार्थी यांना मोफत ०५ ब्रास वाळू उपलब्ध करुन त्यांना वाळू वितरीत करण्यासाठी निश्चित करुन देण्यात आलेल्या वाळू घाटातूनच वाळू दिनांक ०९.०६.२०२५ पर्यतच वाळू




उत्खनन करुन देण्यात यावी . तसेच ज्या तहसिलदार यांचे कार्यक्षेत्रात वाळूघाट नाही त्यांनी निश्चित केलेला वाळू घाट हा ज्या तालुका तहसिलदार यांचे कार्यक्षेत्रात आहे , त्या तहसिलदार यांचेशी समन्वय साधून घरकुल लाभार्थी यांना वाळू उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी . घरकुल लाभार्थी यांना वितरीत केलेल्या वाळूचा तपशील जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात यावा . तसेच अवैध उत्खनन होणार नाही याची दक्षता संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी घ्यावी . घरकुल लाभार्थी यांना महा-खनिज प्रणालीवरुन ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक पास (ई टी पी ) तयार करुनच वाळू वितरीत करण्यात यावी , अशा स्वरूपाच्या सुचना निर्गमित केल्या.तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि नायब तहसीलदार सुहास हजारे यांनी स्वतः वाळू घाटावर जाऊन पाहणी केली व वाहन आणि इतर यंत्रणेची व्यवस्था याची तजवीज होऊ शकते का, लाभार्थ्यांना जवळचा घाट (नदी) याबाबत सविस्तर माहिती घेतली. त्यानुसार सुर्डी थोट चे तलाठी पवन चव्हाण यांनी लाभार्थी कचरू भानुदासराव जाधव यांना महाखनिज पोर्टल वरून ई टी पी पास तयार करून दिला व बोरदेवी इथे वाळू पोहोच केली . यावेळी रजेगाव चे सरपंच लक्ष्मण आबुज , ग्राम महसूल अधिकारी पवन चव्हाण लाभार्थी , कचरु जाधव आणि बोरदेवी चे सरपंच रविंद्र आरसुल उपस्थित होते.घरकुल बांधकाम वाळू नसल्यामुळे थांबले होते पण आता ते पूर्ण होईल , त्यामुळे आमचे कुटुंब शासनाचे व जिल्हाधिकारी यांचे आभारी आहे असे म्हणत जाधव यांनी समाधान व्यक्त केले.

कशी मिळेल घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू ? :

शासन निर्णयानुसार पंतप्रधान आवास योजना , शबरी आवास योजना इ योजनाच्या लाभार्थ्यांना मोफत वाळू जवळच्या वाळू घाटातून म्हणजेच नदी , नाले ओढे येथून नियमानुसार आणता येते . पंचायत समिती मधील घरकुल विभागाने तहसील कार्यालयास लाभार्थी यादी आधार क्रमांक , मोबाईल क्रमांकासह सादर केल्यानंतर त्यांची यादी व्हेरिफाय केली जाते . त्यांनतर प्रत्यक्ष घाटावर जाऊन लाभार्थी , तलाठी महाखनिज पोर्टल वर आवश्यक माहिती भरतात . वाहनाचा क्रमांक , ड्रायव्हरचे नाव टाकल्यानंतर एक इलेक्ट्रॉनिक पास तयार होतो . त्यावर संपूर्ण तपशील असतो . त्यांनतर लाभार्थी वाहन निश्चित केलेल्या वेळेत त्याच्या बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी घेऊन जाऊ शकतो.बीड जिल्ह्यात सर्वच तालुक्यात अशा प्रकारे मोफत वाळू वाटप सुरु झाले असल्याने घरकुल धारकांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे .